
# शिक्षणातील परिवर्तनाच्या दिशेने



## रमेश पानसे

026

शिक्षणातील परिवर्तनाच्या दिशेने (२००४)
©रमेश पानसे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा आणि नवीमुंबई
शैक्षणिक व सामाजिक समिती, वाशी, नवी मुंबई द्वारा आयोजित
अकरावे विचारवेध संमेलन दि.२६, २७, २८ डिसेंबर २००३
या दिवशी वाशी येथे साजरे करण्यात आले.

**समकालीन शिक्षण : वास्तव आणि अपेक्षा** या विषयावर
दि. २६ डिसेंबर २००३ या दिवशी प्रा.रमेश पानसे यांनी दिलेले अध्यक्षीय भाषण आम्ही 'शिक्षणातील परिवर्तनाच्या दिशेने' या शीर्षकाखाली पुस्तकरूपाने प्रकाशित करीत आहोत.

देणगीमूल्य २० रुपये

**ग्राममंगल प्रकाशन**, स्नेहनगरी, ऐना, ता. डहाणू, जि.ठाणे ४०१६०७.

# शिक्षणातील परिवर्तनाच्या दिशेने

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा या संस्थेच्या वतीने गेली दहा वर्षे चालू असलेल्या विचारवेध संमेलनात हजर राहून माझे काही विचार मांडण्याची संधी मला दिल्याबद्दल, मी संयोजकांचे आभार मानतो. प्रत्येक संमेलनात एका सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयावर दोन-तीन दिवस जो विचारविनिमय होतो तो, आपल्या सर्वांच्याच विचाराला एक व्यापक परीघ प्राप्त करून देतो. या वर्षी आपल्या सर्वांच्याच दैनंदिन जीवनाशी जवळून संबंधित असलेला असा शिक्षणाचा विषय ठेवल्यामुळे मला अतिशय आनंद झाला आहे. कारण, हा माझाही जिव्हाळ्याचा विषय आहे. किंबहुना म्हणूनच अध्यक्षपदी निवड करून आपण माझा सन्मान केला आहे, असे मी मानतो. हे अध्यक्षपद स्वीकारत असताना, आपला या विषयावर बोलण्याचा काही अधिकार आहे, असा गैरसमज माझ्या मनात मुळीच नाही, हे मी अतिशय प्रामाणिकपणे आपल्या नजरेस आणू इच्छितो. खरं तर या स्थानावरून, मला माझा एक स्वार्थ साधता येईल, असे वाटल्यावरुन मी आपले हे आमंत्रण स्वीकारले आहे.

गेली चाळीस वर्षे मी विविध भूमिकांमधून शिक्षणक्षेत्रात वावरत आहे. त्यातही गेली वीस वर्षे मी बालशिक्षणाच्या एका दुर्लक्षित अशा क्षेत्रात कार्यकर्ता म्हणून जागतेपणी काम करीत आहे. या क्षेत्राला ना शिक्षणात महत्त्वाचे स्थान, ना समाजकार्यात स्वत:चे काही स्थान. माझी मात्र अशी खात्री झाली आहे की, हे क्षेत्र हे शिक्षणातील सर्वात महत्त्वाचे नि इतर शिक्षणाचा पाया असलेले असे क्षेत्र आहे. ही माझी जाण, महाराष्ट्रातील अनेक विचारवंतांपुढे, एकदमच मांडण्याची संधी या व्यासपीठामुळे मला मिळाली आहे, हा माझा फार मोठा कार्य-स्वार्थ आहे. अशी संधी दिल्याबद्दल मी पुनश्च आपले आभार मानतो.

■■

भारतात आणि महाराष्ट्रातही, एकीकडे शिक्षणाचा संख्यात्मक विस्तार होत असताना, आणि त्यातील प्रत्येक जण आज अस्तित्वात असलेल्या शिक्षणाच्या मांडवाखालून जात असूनही, शिक्षणाविषयी त्याने काढलेले सर्वसामान्य उद्गार हे असमाधानाचे असतात; हा सार्वत्रिकरित्या येणारा अनुभव आहे. हे असमाधान शाळेत लहानपणापासून मिळणाऱ्या अनुभवांबद्दलचे असेल किंवा ज्या स्तरावरचे परीक्षेतील यश मिळालेले असेल त्या यशाबद्दलचे असेल. किंवा मिळालेल्या नोकरीत किंवा करीत असलेल्या व्यवसायात, घेतलेले शिक्षण फारसे उपयोगी ठरत नसल्याबद्दलची ती खंत असेल. रोज दैनंदिन व्यवहार सुलभतेने व्हावेत यासाठी लागणारी नागरिकत्वाची बेगमीसुद्धा, भलेमोठे घेतलेले शिक्षण देत नाही किंवा अर्थकारण-राजकारण-समाजकारण यातील व्यवहारांमध्ये लागणारी किमान नैतिकताही शिक्षण निर्माण करीत नाही; या गोष्टी शिक्षणाकडे शंकास्पद दृष्टीने पाहण्यास उद्युक्त करीत आहेत. मला तर एकूण शिक्षण व्यवस्थेबद्दल जाणवणारे असमाधान आणखीही एक प्रबळ कारणामुळे आहे. ते आहे प्रत्यक्ष शिक्षणव्यवस्थेत उगाचच भरडले जाणाऱ्या विद्यार्थीविद्यार्थीनींबद्दल. एका अत्यंत कमकुवत अशा, पण समाजातील सर्वच घटकांनी कृत्रिमरित्या फार उच्चस्थानी नेऊन ठेवलेल्या परीक्षा नामक ध्येयासाठी झगडताना, विद्यार्थ्यांच्या तन-मनांची नि ऐन उमेदीच्या काळातील वेळाची होणारी परवड, मन अस्वस्थ करीत असते. या परीक्षांनी, एकीकडे, ज्यावर जीवनाची उभारणी व्हायची त्या ज्ञानाचे क्षेत्रच संकुचित करून ठेवले आहे. तर दुसरीकडे, परीक्षांच्या यशात आयुष्याची इतिकर्तव्यता मानून भ्रामक स्वप्नांमध्ये विद्यार्थ्यांना अडकवले आहे. परिणामत: एकीकडे, त्यांच्या स्वत:ची स्वतंत्र विचारशक्तीची वेल खुंटत जाते तर दुसरीकडे, परावलंबित्वाचा वृक्ष त्यांच्या वाढत्या वयाबरोबर फोफावत जातो. एक प्रकारचा समाजधारणेबद्दल विलक्षण उदासीन आणि आत्मकेंद्रित असा नवा सुशिक्षितांचा वर्ग, या शिक्षणव्यवस्थेतून घडवला जातोय. आणि हे लक्षण व्यक्तिगत पातळीवर अन्यायाचे तसेच, सामाजिक पातळीवर ते गुलामांचा वर्ग पोसणारे आहे.

व्यक्तिगत नि सामाजिक जीवन प्रगल्भ करणारे असे शिक्षण हवे असेल तर स्वतंत्रपणे विचार करु शकणारी, सामाजिक अन्यायांविरुद्ध संघर्ष उभा करण्याची ताकद असणारी आणि अनाठायी धार्मिक, वांशिक किंवा राजकीय हिंसाचाराला विवेकाने थोपवू शकणारी अशी सुजाण नागरिकांची पिढी निर्माण करावी लागेल. परंतु, अशा पिढीची निर्मिती करण्याची ताकद या आजच्या शिक्षणव्यवस्थेत नाही हे कळूनसुद्धा, असलेले शिक्षण नाकारण्यापेक्षा ते हाकारण्यातच आणि मूलभूत परिवर्तन करण्यापेक्षा त्यात वर्गीय सोयी करण्यातच आपण अडकलो आहोत. शिक्षणव्यवस्थेविषयी घोर असमाधान तर आहे पण, तरीही ते धरून तर ठेवले पाहिजे, अशा पेचात आपण अडकलो आहोत. हा पेच सुटणार कसा ?

शास्त्रीय शोधांच्या क्षेत्रात बराच काळ वावरल्यानंतर अल्बर्ट आईन्स्टीनने केलेले एक विधान आणि त्याकरवी दिलेला विचार मला दिशादर्शक वाटतो. आईन्स्टीनने म्हटले आहे,

''एखादी समस्या ज्या तऱ्हेच्या जाणीवेतून निर्माण झालेली असते, त्याच प्रकारच्या जाणीवांनी त्या समस्येची सोडवणूक होत नाही. तिच्या सोडवणुकीसाठी आपण जगाकडे नव्या दृष्टीने पाहायला शिकले पाहिजे.'' आपल्यालाही प्रश्नाच्या अस्तित्वात असलेल्या चौकटीबाहेर जाऊन तार्किक विचार करावा लागेल. असा वेगळ्या दिशेने विचार कसा करता येईल, याचे एक उदाहरण देतो.

मेडिकल कॉलेजेसच्या प्रवेशाच्या संदर्भात, लाखो रुपयांच्या शुल्काचा एक गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. शुल्क अल्प करणे हे कॉलेजेस्ना परवडत नाही, तर वाढलेले शुल्क प्रवेशेच्छूंना परवडत नाही. न्यायालयाने मध्यस्थी करुन किंवा सुवर्णमध्य काढून हा प्रश्न सुटणार नाही. अनेकांना डॉक्टर व्हायचे आहे. त्यासाठी शंभर टक्क्यांच्या जवळपास परीक्षांतून गुण मिळविण्याचा प्रयत्न करणारी आणि प्रत्यक्षात असे गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे, आणि ती ज्यांच्यासाठी स्पर्धा करताहेत त्या जागांची संख्या मर्यादित आहे, पुरवठा कमी - मागणी जास्त म्हणून वाढती किंमत; असा निर्माण झालेला पेच, कॉलेजेसमधील पाच-पन्नास जागा वाढवून सुटणार नाही. देशात, विशेषत: खेड्या-पाड्यांमध्ये वैद्यकीय सेवा अपुरी, अशी एकीकडे स्थिती आणि अशी सेवा देतील अशा डॉक्टरांची संख्या अपुरी अशी दुसरीकडे स्थिती, अशा वेळी डॉक्टरकीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी एखादे वर्ष खेड्यांत काम करण्याची सक्ती करुन हा वैद्यकीय सेवा पुरवठ्याचा प्रश्न ही सुटणारा नाही.

वैद्यकीय शिक्षणाच्या आणि व्यवसायाच्या बाबतीत एक विशिष्ट चौकट निर्माण झाली आहे. ही चौकट मोडून काढली तर त्यातील बरेचसे प्रश्न गळून पडतील.

आज वैद्यकीय-व्यवसाय, खूप पैसे देणारा व्यवसाय ठरलेला आहे. पैशांमुळे त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. पैसा आणि प्रतिष्ठा यांसाठी या व्यवसायात शिरण्याची इच्छा असलेले अक्षरश: अनेकजण आहेत, दोन-तीन वर्षाच्या बालकाला डॉक्टर करण्याची स्वप्ने पाहणारे अनेक पालक आहेत. या सगळ्यांना हे माहीत आहे की डॉक्टर होण्याची संधी सगळ्यांना मिळत नसते. कारण, कॉलेजेस्मधून असलेल्या जागा मर्यादित आहेत. अशावेळी निवड केली जाते; आणि निवडीचा सोपा, सोयिस्कर नि समर्थन करता येईल असा एकमेव निकष आहे तो म्हणजे प्रवेश परीक्षांमधील गुण. त्यामुळे परीक्षांतील गुणांचा ध्यास विद्यार्थी नि पालक घेत आहेत.

आपल्याकडे, परीक्षेत खूप गुण मिळवणाराला हुशार समजले जाते. (भ्रम क्र.१) हुशार मुलेच डॉक्टर होऊ शकतात ार्याने डॉक्टर होण्यासाठी फार तीव्र हुशारी लागते (भ्रम क्र.२) वैद्यकीय शिक्षणासाठी निव[illegible] करताना, हुशारींचा निकष हाच एकमेव निकष असू शकतो. (भ्रम

क्र.३) डॉक्टरांचे कौशल्य (इतर अनेक लहान-मोठ्या व्यवसायातील कौशल्यापेक्षा) तुलनेने अधिक असते आणि म्हणून त्यासाठी ग्राहकांना मोठी किंमत मोजावी लागते. (भ्रम क्र.४) समाजात, डॉक्टर होणे हेच सर्वात जास्त प्रतिष्ठेचे आहे. (भ्रम क्र.५) आणि म्हणून डॉक्टर होणे म्हणजे जीवनात यशस्वी होणे होय. (भ्रम क्र.६)

वैद्यकीय व्यवसाय आणि वैद्यकीय शिक्षण यांची व्यवहारात नि समाजमनात असलेली चौकट ही या विविध भ्रमांवर आधारलेली आहे. त्यामुळे हे भ्रम, त्यांची अंतर्गत तार्किकता हेच ज़ोवर आपले गृहीत असेल तोवर, प्रश्न सोडविण्याची आपली विचारपद्धती या चौकटीतच राहील, आणि मग, आईन्स्टीनने म्हटल्याप्रमाणे, उत्तरांची दिशा आपल्या हाती येणार नाही. साहजिकच, प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी एकीकडे धाडसीपणे हे भ्रम दूर करावे लागतील, तर दुसरीकडे अधिक उंचावर, डोंगरावर उभे राहून हा संपूर्ण प्रश्न आपल्या दृष्टीच्या- विचाराच्या परिप्रेक्षात आणावा लागेल.

समाजाला पुरेशा प्रमाणात वैद्यकीय सेवा प्राप्त झाली पाहिजे ही पहिली सामाजिक गरज आहे. ती घराजवळ आणि परवडणाऱ्या दरांत मिळाली पाहिजे. आज समाजात, अनेकांना अशी सेवा पुरविण्याचा व्यवसाय करण्याची इच्छा आहे, म्हणजे डॉक्टर होण्याची इच्छा आहे. त्या प्रत्येकालाच डॉक्टर होण्याची संधी मिळाली पाहिजे. समाजात, कुटुंबातून ज्या ज्या स्तरांवरची आजारपणे असू शकतात, त्या त्या स्तरांवरची आरोग्यसेवा सहजपणे उपलब्ध करू शकण्यासाठी, इतर क्षेत्रातील शिक्षणाप्रमाणेच वेगवेगळ्या स्तरांवरचे वैद्यकीय शिक्षणाचे अभ्यासक्रम उपलब्ध करावे लागतील. इंजिनियरिंगच्या शिक्षणातही (पदविका) डिप्लोमा आणि (पदवी) डिग्री अशा दोन स्तरांवर शिक्षण घेण्याची सोय असते. किंवा, विद्यापीठात शिक्षक होण्यासाठी एम.ए. (एम.एस.सी.) पी.एच.डी. कॉलेजमध्ये शिकविण्यासाठी एम.ए.एम.फील., माध्यमिक शाळेत शिकवविण्यासाठी बी.ए. (बी.एस्.सी.) बी.एड्., प्राथमिक शाळेत शिक्षक होण्यासाठी बारावी, डी.एड्. आणि बालवाडीत शिकविण्यासाठी शालान्त परीक्षा व एक वर्षाचे प्रशिक्षण, अशा प्रकारची उतरंड असते. अशी उतरंड वैद्यकीय शिक्षणात आणणे सहज शक्य आहे आणि उपयुक्तही आहे. सुतारकाम, शिंपीकाम वगैरेप्रमाणेच आणि इतकेच वैद्यकीय व्यवसायाचे स्वरूप तांत्रिक आहे. विशिष्ट आजार, त्यांची ठराविक लक्षणे, आणि त्यावर ठरून गेलेली औषधे माहीत झाली आणि सरावाने आजार समजण्याचे कौशल्य आले की पन्नास - साठ टक्के आजारांवर उपचार करण्याचे सामर्थ्य येऊ शकते. त्यासाठी दहावी व एक वर्षाचा सर्टिफिकीट कोर्स पुरेसा ठरेल. त्यानंतरच्या वरवरच्या स्तरांसाठी आणि कौशल्यांसाठी प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि संशोधन पदवी अशाप्रकारे शिक्षण देणारी वैद्यकीय विद्यालये निर्माण करता येतील. शेकड्यांनी करता येतील. वेगवेगळ्या पातळीवरील हजारो डॉक्टर्स

निर्माण होतील. आरोग्यसेवा सार्वत्रिक होतील, शिवाय रोजगाराच्या हजारो नव्या संधीही उपलब्ध होतील. विविध भ्रम-दूर होतील. आज, केवळ हितसंबंधियांनी टिकवून ठेवलेली वैद्यकीय व्यवसायाची मर्यादित केलेली संख्या आणि त्यामुळे व्यवसायाला आलेली श्रीमंती नि प्रतिष्ठा यांना अटकाव होऊ शकेल. वैद्यकीय महाविद्यालयांतून जाणून बुजून मर्यादित केलेली संख्या, तेथे पोचण्यासाठी चाललेली स्पर्धा, स्पर्धेसाठी चाललेली परीक्षांत गुण मिळविण्याची धडपड, त्यांतून निर्माण होणारे ताण आणि प्रवेशाभावी येणारे नैराश्य इत्यादी सामाजिक परिणाम कमी होऊ शकतील.

एक उदाहरण घेतले ते एका महत्त्वाच्या शिक्षणविषयक प्रश्नविषयीचे माझे मत आपल्याला कळावे आणि दुसऱ्या बाजूला मी एकूण शिक्षण व्यवस्थेकडे, व्यवस्थेच्या बाहेरुन विहंगावलोकन करणार आहे, हेही आपल्याला सांगावे यासाठी.

■■

माझ्या विषय मांडणीच्या संदर्भातील एक मर्यादा मी सुरुवातीलाच स्पष्ट करतो. आज, अगदी बालवाड्यांपासून ते विद्यापीठीय उच्च शिक्षणापर्यंत अनेक समस्या आहेत. तीन दिवसांच्या चर्चांमधून त्यांपैकी बहुतेकांविषयी विचार स्पष्टता होईल. माझ्या मांडणीसाठी मी विषय मर्यादित करून घेतला आहे. मी मुख्यत: बालशिक्षण आणि प्राथमिक शिक्षण या शिक्षणाच्या पायाभूत पातळीवर लक्ष केंद्रित करणार आहे. अनुषंगाने इतर विषयांना स्पर्श झाला तर होईल. मी असा निर्णय घेण्याची दोन कारणे आहेत. एक असे की 'शिक्षण कसे असावे' हा विषय या दोन पायाभूत स्तरांवर अत्यंत दुर्लक्षित असा राहिलेला आहे. शिक्षणाच्या दर्जाचा आणि शास्त्रीयतेचा सर्वांत गंभीर प्रश्न या स्तरांवर आहे. किंबहुना हा स्तर सुधारल्याशिवाय, पुढील शिक्षण सुधारणार नाही याची, निदान माझी तरी खात्री पटलेली आहे. याहून वरच्या स्तरांवरील शिक्षणातील कित्येक प्रश्नांची उत्तरे याच स्तरांवरील शिक्षणात दडलेली आहेत, असा माझा कयास आहे.

बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण या स्तरांवर लक्ष केंद्रित करण्याचे दुसरे कारणही पहिल्या कारणाइतकेच महत्त्वाचे नि त्याच्याशी संबंधित असेच आहे. बालवाडी-प्राथमिकच्या वयांतील मुले निसर्गत: कशी शिकतात यासंदर्भातील अलीकडे, म्हणजे गेल्या दहा-पंधरा वर्षांमध्ये संशोधनांना वेग आला आहे. त्यांतून सबंध शिक्षणशास्त्रालाच नवे वळण प्राप्त होत आहे. शिक्षणाची, म्हणजे शिक्षणाच्या पद्धतींची आणि काही प्रमाणात शिक्षणाच्या आशयाची नव्याने मांडणी केली जात आहे. अशावेळी, शिक्षणात परिवर्तन करू पाहणाऱ्या आपल्यासारख्यांना या नूतन विचार प्रवाहांच्या बाहेर राहणे हे परवडणारे नाही. या प्रवाहांचे काही धागे शिकणाऱ्या प्रत्येक बालकाशी जसे जोडलेले आहेत, तसेच ते दुसऱ्या बाजूस अगदी सामाजिक - आर्थिक अशा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय प्रश्नांशीही नाते सांगणारे आहेत. जर आपण, शिक्षण हे परिवर्तनाचे

माध्यम मानत असू तर या नवशोध प्रवाहांची दखल घेऊनच आपण आपल्या शिक्षणविषयक असंख्य प्रश्नांची चर्चा अधिक वास्तव पातळीवर करू शकू, अशी माझी भावना आहे. शिक्षणात मूलभूत परिवर्तन झाल्याशिवाय शिक्षण हे परिवर्तनाचे माध्यम बनू शकणार नाही, याची जाण आपण ठेवली पाहिजे.

एकदा या भाषणापुरता विषय मर्यादित करून घेतल्यानंतर मग, मी वर म्हटल्याप्रमाणे, आजच्या शिक्षणव्यवस्थेचे , व्यवस्थेच्या बाहेरून विहंगावलोकन करणार आहे, म्हणजे काय करणार आहे, हे थोडक्यात स्पष्ट केले पाहिजे.

पहिली गोष्ट, अशी की, जे शिक्षण विषय आपल्या नेहमीच्या बोलण्यांत, चर्चांमध्ये सामान्यत: येत नाहीत, म्हणजे अजूनही व्यापक प्रमाणात अपरिचित राहिलेले आहेत, ते प्रश्न आपल्यासमोर उभे करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. यातूनच, शिक्षणात अजूनही अव्यक्त असलेले प्रश्न आपल्यापुढे येतील असे वाटते.

दुसरे असे की, शिक्षणातील काही तात्विक नि काही व्यावहारिक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आज म्हणजे, एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला शिक्षणशास्त्र काय सांगते हे समजावून घेऊन, त्याच्या प्रकाशात असलेल्या प्रश्नांचे रुप न्याहाळणे उपयुक्त ठरेल, असेही मला वाटते.

तिसरे असे की, आपण बऱ्याचदा जेव्हा शिक्षणाविषयी बोलतो तेव्हा सर्वसामान्य पातळीवरुन विचार करीत असतो; आणि मग एखाद्या विशिष्ट विद्यार्थ्याच्या शिक्षणविषयक समस्या, या सर्वसामान्य आकलनाच्या संदर्भात पाहात असतो. मी येथे मात्र, शिक्षणाचा जो सुरुवातीचा बिंदू आहे, जो मध्यवर्ती बिंदू आहे त्या विद्यार्थ्याच्या आकलनापासून सुरुवात करून आजच्या शिक्षणव्यवस्थेच्या आकलनाकडे जाणार आहे. शिकणारे मूल कसे असते ? आणि शिकणारे मूल कसे शिकते ? या दोन प्रश्नांची उत्तरे शोधून मगच त्या उत्तरांच्या दिशेने आज अस्तित्वात असलेल्या शिक्षणव्यवस्थेचे, निगमन (Inductive) पद्धतीने, विश्लेषण करणार आहे.

आणखी एक गोष्ट अशी की आपण बऱ्याचदा, शिक्षणक्षेत्र, त्यामधील शिक्षक, विद्यार्थी यांच्याबाबत, फार आदर्शवादी भाषेत बोलत असतो. त्यामुळे विचाराच्या नि व्यवहाराच्या स्तरांवर शिक्षणाची वास्तवतेशी असलेली नाळ तुटते; आणि प्रश्न अधिकच बिकट होऊन बसतात. एका बालकाच्या पातळीवर, बालकाच्या नैसर्गिक विकास प्रक्रियेला अनुसरुन, नि त्याच्या वाढत्या वयानुसार शिक्षण व्यवहार कसा असायला हवा, एका शालेय वर्गाच्या स्तरावर, शिक्षण व्यवहाराची मांडणी कशी असायला हवी, त्यासाठी त्या वर्गात उभी राहणारी शिक्षिका, कोणत्या कौशल्यांनी समृद्ध असायला हवी, शाळेच्या पातळीवर शिक्षणरचना कशी असावी, तसेच,

गावाच्या पातळीवर शिक्षणव्यवहार कशातऱ्हेने एकसंघ असायला हवा, आणि अखेरीस, या सर्व व्यष्टीस्तरांवर (Micro levels) प्रत्यक्ष दैनंदिन व्यवहारात नेमके काय परिवर्तन झाले पाहिजे, आणि ते करण्याची गमके कोणती याविषयीचे विवेचन करणे हे मी, शिक्षण प्रयोगातील एक कार्यकर्ता, एक अभ्यासक म्हणून माझे कर्तव्य मानतो.

■■

आजपर्यंत शिक्षणाकडे पाहण्याची आपली दृष्टी ही 'वस्तुनिष्ठ' होती. वास्तविक, ज्ञानविषयक शास्त्राचा जो काही विचार चालू झाला, तेव्हापासून ज्ञान (आणि ज्याचे ज्ञान मिळवायचे ती वस्तू) ही एक मनुष्यबाह्य बाब मानली गेली. वस्तूरूप जगाचे खरेखुरे स्वरूप समजावून घेणे आणि ज्याला प्लेटो 'आयडिया' असे म्हणतो त्या, म्हणजे जिच्यात ती वस्तू सामावली आहे त्या कल्पनांचे स्वरूप आकळणे, ही ज्ञानग्रहणाची संकल्पना आजवर स्वीकारली गेली आहे. पाश्चिमात्य जगातील पुनरुज्जीवनाच्या काळापासून ते अगदी विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत, ज्ञानग्रहणाचा अर्थ असाच होता की, जगाच्या मूर्त वा अमूर्त स्वरूपाचे ज्ञान मिळविण्यासाठी, बुद्धिनिष्ठ पद्धतीचा अवलंब करुन, ज्ञानाचा साठा प्राप्त करायचा, त्यासाठी मग ज्ञानाची विशिष्ट विषयांमध्ये विभागणी करून, वर्गीकरणाच्या पद्धतीचा अवलंब करून, यंत्राच्या सुट्ट्या भागांचा अभ्यास करावा त्याप्रमाणे ज्ञानक्षेत्रांचा अभ्यास करण्यात येऊ लागला. या 'कार्टेशियन' पद्धतीमध्ये ज्ञानाचे तुकडे अभ्यासणे, त्यांचे परस्परसंबंध अभ्यासणे; त्यांच्या एकत्रीकरणाने होणारे साकलिक ज्ञान आत्मसात करणे अशा प्रकाराने ज्ञानग्रहणाच्या प्रक्रियांचा वस्तुनिष्ठ (Objective) पद्धतींनी वेध घेतला जात होता मानवाच्या ज्ञानप्राप्तीकडे पाहण्याचा हा एक तात्त्विक दृष्टिकोण आहे. या वास्तव नि भौतिक जगाला कार्यान्वित ठेवणारे काही निसर्गनियम आहेत, त्यांचा शोध घेता येतो, त्यांचे ज्ञान करुन घेता येते आणि माणसाला असे ज्ञान घेता येते असे गृहित यामध्ये आहे. या सबंध प्रक्रियेत ज्याने ज्ञान घ्यावयाचे त्या व्यक्तीला नेमकेपणाने स्थान कुठेच नव्हते.

शिक्षणव्यवस्थांमध्येही, म्हणजे शाळांमध्येही 'शिक्षका'चे काम ठरविले गेले. ते महत्त्वाचे मानले गेले. विविध बाबींविषयीचे ज्ञान अस्तित्त्वात आहे; ते ज्ञान शिक्षकाने आत्मसात केलेले आहे, ते ज्ञान त्याने विद्यार्थ्यांपर्यंत नेऊन पोचवायचे आहे; आणि ते कसे पोचवावे या विषयीच्या पद्धती ठरून गेलेल्या असून त्याही शिक्षकाने आत्मसात केलेल्या आहेत. त्यामुळे शाळांच्या वर्गातून, शिक्षकाकडून विद्यार्थ्याकडे अशी ज्ञानसंप्रेषणाची प्रक्रिया घडविली जाते. येथे ज्ञान ही देण्याची गोष्ट असते. आणि ते सर्वांनाच सारखेपणाने दिले जाते. यात व्यक्तीविषयी स्वीकारले गेले आहे ते एवढेच की, सारखेपणाने दिलेले हे ज्ञान घेताना मात्र, विद्यार्थ्यांच्या वकुबानुसार घेतले जाते. इथेच काय तो ज्ञानग्रहणाचा, ते ज्याने ग्रहण करावयाचे आहे त्या व्यक्तीशी संबंध गृहित धरलेला आहे. आणि तोही कर्मणी रीतीने (Passively).

या प्रकारची शिक्षणव्यवस्था घट्ट करणाऱ्या काही गोष्टीही एकोणिसाव्या नि विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत घडून आल्या आहेत.

■■

## वर्तनवादी विचारसरणीचा प्रभाव

मानसशास्त्राच्या क्षेत्रात झालेल्या काही प्रयोगांतून एक विशिष्ट विचारसरणी निर्माण झाली, जिला वर्तनवादी विचारसरणी (Behaviourist Approach) असे म्हणतात. आजची संपूर्ण शालेय शिक्षणव्यवस्था ही या वर्तनवादाचा (Behaviourism) परिपाक आहे.

आजच्या शिक्षणाचा, शालेय पातळीवरील जो ढाचा आहे, त्याचा इतिहास (अ) वसाहतवादी शिक्षणाशी संलग्न आहे; (आ) विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून मानसशास्त्रातील काही प्रयोगांशी नि त्यावर आधारित विचारांशी जोडलेला आहे. आणि (इ) मानसशास्त्राच्याच अंगाने बुद्धिमत्तेविषयी जो काही सर्वसामान्य विचार प्रगत झाला, त्याच्याशीही निगडीत आहे.

### *अ. भारतातील वसाहतवादी शिक्षण*

भारतात आधुनिक शिक्षणाचा पाया इंग्रजांनी घातला यात काही संदेह नाही. स्वातंत्र्योत्तर, ब्रिटिश शिक्षणव्यवस्थेचा जो काही वारसा आपण आजवर सांभाळला आहे, त्याचे प्रमुख वैशिष्ट्य कोणते असेल तर त्यावरील सरकारचे असलेले वर्चस्व. सरकारने शिक्षणाचे नियोजन करणे आणि शिक्षणव्यवस्था नियोजनबद्ध असणे या दोन्हीही गोष्टी ब्रिटनने जर्मनीकडून उचलल्या आहेत. इ.स.१८६६ च्या प्रशिया-ऑस्ट्रिया युद्धात प्रशियाने विजय संपादन केला आणि तेव्हा, प्रथमत:च शिस्तबद्ध अशा युद्ध शिक्षणाचे सामाजिक महत्त्व लक्षात येवून, योजनाबद्ध शिक्षणाच्या हेतूने, जर्मनीत १८७० साली प्राथमिक शिक्षणाचा कायदा करण्यात आला; त्याचेच रूपांतर पुढे लगोलग१८७६ साली, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यात करण्यात आले. या शिक्षणविषयक घटनांचा ब्रिटिशांच्या शिक्षणपद्धतीवर परिणाम होऊन एक, देशात शिक्षणाच्यासंदर्भात सरकारनेच सर्वतोपरी जबाबदारी घेऊन धोरणे आखावीत आणि दोन, तांत्रिक नि उद्योग-व्यापारविषयक शिक्षणाला प्रोत्साहन देऊन विकासाला चालना द्यावी, या गोष्टी ब्रिटिश सरकारने भारतात अवलंबिल्या. याशिवाय शाळांमधून धार्मिक शिक्षणाचा पुरस्कार तसेच शाळांतील शिक्षकांचे प्रशिक्षण शास्त्रीय पद्धतीने व्हावे, यासाठी शैक्षणिक सिद्धान्त व तत्वे शिकविण्याच्या पद्धती यांचे शिक्षण देण्यासाठी ट्रेनिंग कॉलेजांची व्यवस्था, याही बाबी ब्रिटिशांनी जर्मनीकडून उचलल्या होत्या.

मुळात, शिस्तबद्ध अशा युद्धशिक्षणाचा जो काही वसा इंग्लंडने घेतला त्याचे शैक्षणिक पर्यवसान दिसून येते ते शिस्तीच्या नावाखाली शालेय शिक्षणाला दिल्या गेलेल्या विशिष्ट अशा

वळणामध्ये. उदाहरणार्थ, वर्गांतून हारीने मांडलेली बाके, ओळीत बसणारी मुले आणि एकच गोष्ट, एकाच वेळी शिक्षकांकडून सर्वांनी शिकणे, शिक्षकांच्या आज्ञा नि विद्यार्थ्यांचा आज्ञाधारकपणा, सार्वत्रिक परीक्षा व गुणांवर दिली जाणारी बक्षिसे, शिस्त मोडल्यास शिक्षा आणि शिकणाऱ्यांच्यात स्पर्धा; मुलांचे गणवेश – अगदी मोज्या-बुटांसह; आणि अखेरीस ठराविक वेळी ठराविक गोष्टी करायला लावणारा अभ्यासक्रम. या शाळाशाळांत रुढ झालेल्या सर्व बाबी, विद्यार्थ्यांचे शिक्षण सैनिकी शिस्तीत नि शिक्षक – अधिकाऱ्यांच्या करड्या नजरेखाली, धाकात करू पाहतात. या अशा पद्धती आपल्या सर्वांच्याच ओळखीच्या आहेत.

शाळेच्या वर्गाबाहेरील शिक्षणव्यवस्था ठरविण्यात, १८५४ सालचा सर चार्लस् वुडचा खलिता महत्त्वाची पायरी होती. चार्लस् वुडस हा ईस्ट इंडिया कंपनीचा संचालक होता. १८५३ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या परवान्याचे नूतनीकरण करण्याचा प्रस्ता व ब्रिटिश सरकारसमोर होता. त्यावेळीच हिंदुस्थानातील शिक्षणाची जबाबदारी सरकारची आहे, असे ठरवून कंपनी सरकारने हे आपले कर्तव्य कसे पार पाडावे याविषयीची काही तत्त्वे ठरवून देण्यात आली होती. पुढच्याच वर्षीच्या वुडस्च्या अहवालाच्या आधारे प्रसृत करण्यात आलेल्या धोरणात, त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. वुडस्ने केलेल्या शिफारसी अशा होत्या :

१. पाच प्रांतांमध्ये शिक्षणखाती निर्माण करून ती 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' च्या अधिकारात ठेवायची. शाळांचे नियंत्रण, प्रशासन व पर्यवेक्षण यासाठी, त्यांच्या हाताखाली निरीक्षक (Inspector) नेमायचे.
२. लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन ठिकाणी विद्यापीठे स्थापन करावयाची.
३. प्राथमिक, महाविद्यालयीन व विद्यापीठीय पातळीवरील शिक्षणसंस्थांची क्रमवार रचना करणे, शाळांतून एतद्देशीय भाषांचे माध्यम वापरणे आणि एतद्देशीय शाळांचा पायाभूत शाळा म्हणून उपयोग करणे.
४. खाजगी शैक्षणिक उपक्रमांना उत्तेजन देण्यासाठी अनुदान पद्धती (Grants-in-aids) सुरू करणे, तसेच
५. शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

१८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा अडीचशे वर्षांचा कारभार संपून, इंग्लंडच्या राणीचा कारभार हिंदुस्थानात चालू झाला, पण शिक्षणविषयक धोरण मात्र १८५४ सालचेच चालू राहिले. लॉर्ड रिपन यांच्या कारकिर्दीत नेमलेल्या हंटर आयोगानेही प्रामुख्याने वुडस्च्या धोरणांची री ओढली होती. तरी त्याचे मुख्य लक्ष दिले होते ते प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराला. त्यातही

मागासलेल्या वर्गातील मुलांना प्राथमिक शिक्षणाच्या लाभाखाली आणण्याचा विचार प्रभावी होता. अर्थात, हंटर आयोगापुढे महात्मा फुले आणि पंडिता रमाबाई यांनी सदर केलेली निवेदने प्रसिद्ध असून त्यांत त्यांनी वंचितांच्या व स्त्रियांच्या शिक्षणाची केलेलीचर्चा सर्वश्रुत आहे. या आयोगानंतर 'शिक्षणाभोवती सरकारी दोऱ्या आवळण्याचे धोरण, सरकारने अंमलात आणले' अशी टीका प्रा.वा.ब.पटवर्धन यांनी आपल्या शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम या, आपल्याच भाषणांवर आधारित ग्रंथांमध्ये केली आहे.

यावरून लक्षात येईल की शिक्षणाचे सैनिकीकरण आणि शिक्षणाचे सरकारीकरण, अस शिक्षणाचे अंतर्बाह्य स्वरूप हा ब्रिटिश सरकारने आपल्या देशाला दिलेला वसा आहे. स्वातंत्र्योत्तर सरकारने, अर्थातच तो जपला आहे. वर्तनवादी शिक्षणव्यवस्थेचे हेच दोन बळकट खांब आहेत.

### *आ. बुद्धिमत्तेविषयी सर्वसामान्य समजूत*

'बुद्धिमत्ता' या विषयी माणसाला कित्येक शतके कुतुहल आहे. मानसशास्त्राचा जन्म तसा अलीकडचा आहे. परंतु, तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात अगदी प्लॅटो, ॲरिस्टॉटलपासून ते एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास असलेल्या इटार्ड पर्यंत सर्वांना या संकल्पनेने आकर्षित केले आहे. मानसशास्त्र हे तत्त्वज्ञान आणि शरीरशास्त्र यांपासून वेगळे असे एक स्वतंत्र शास्त्र म्हणून विकसीत होऊ लागल्यापासून मानवी 'बुद्धीमत्ते'विषयी अधिक शास्त्रशुद्ध विचार होऊ लागला.

फ्रान्सच्या विविध प्रदेशांतून कुटुंबे येऊन पॅरिसमध्ये जेव्हा गर्दी करू लागली. असे दिसून आले की या कुटुंबातील कित्येक मुलांना शाळेत शिकताना अडचणी येताहेत. तेव्हा मग, कोणती मुले शिकण्याच्या लायकीची आहेत, कोणती नाहीत, किंवा कोणती नीट शिकू शकतील किंवा कोणती शिकू शकणार नाहीत याचा शोध घेण्याच्या प्रयत्नांतून फ्रेंच मानसशास्त्रज्ञ अल्फ्रेड बिने याने १९०३ साली प्रथमतः 'बुद्धिमापन कसोट्या' तयार केल्या. पुढे बुद्ध्यांक मोजण्याची गणिती पद्धत जर्मन मानसशास्त्रज्ञ विल्यम स्टर्न याने १९१२ साली विकसीत केली. शालेय शिक्षणात, अशा बुद्धिमापन कसोट्यांनी 'हुषार' ठरविलेली मुले शाळांतील परीक्षांतून अधिक चांगल्या रीतीने उत्तीर्ण होतात आणि 'कमी बुद्धिमान' ठरलेली मुले तुलनेने मागे पडतात असे लक्षात येऊन या अशा प्रकारच्या बुद्धिमापन कसोट्या आणि बुध्यांकांचे निदान, या गोष्टी जगभर पसरल्या. बुद्धिमत्ता ही एक सर्वसामान्य अशी क्षमता असते. (G-factor) आणि ती एखाद्याला अधिक असते तर एखाद्याला कमी, आणि त्यानुसार त्यांची जास्त-कमी अशी शालेय शिक्षणातील कामगिरी असते. यावर श्रद्धा ठेवून, आजही, याच पद्धतीने विद्यार्थ्यांची वर्गवारी केली जाते, किंवा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वकुब ठरविणारे मूल्यमापन केले जाते.

'बुद्धिमत्ते'विषयीचे मानसशास्त्रज्ञांमधील कुतुहल केवळ त्याच्या मोजमापापुरते आणि त्यानुसार होणाऱ्या व्यक्ती-व्यक्तीमधील तुलनापुरते मर्यादित नाही. किंबहुना माणसा-माणसांमध्ये

असे बुद्धीच्या प्रमाणात दिसून येणारे फरक का उद्‌भवतात या प्रश्नांवर या क्षेत्रातील अनेक शास्त्रज्ञांचे लक्ष केंद्रित झाले आहे. गेले शतकभर विविध अभ्यासकांकरवी या प्रश्नाचा वेध घेतला जात आहे; आणि हे संशोधनक्षेत्र अत्यंत वादग्रस्त असे ठरलेले आहे.

बुद्धिमत्तांमधील दिसून येणारे फरक हे आनुवंशिक असतात असे मानणारा एक प्रभावी वर्ग मानसशास्त्रज्ञांमध्ये दिसून येतो. या दिशेने निष्कर्ष देणाऱ्या अभ्यासांचाही मोठा इतिहास आहे. केवळ बुद्धिमत्ताच नव्हे तर ज्या काही क्षमता माणसाकडे माणूस म्हणून, उत्क्रांतीच्या काळात जमा होत गेल्या आहेत, त्यापैकी किती नि कोणत्या निसर्गत:च म्हणजे जनुकांकरवी माणसाला प्राप्त झाल्या आहेत आणि किती नि कोणत्या या माणसाला त्याच्या आयुष्यातच, आजूबाजूच्या वातावरणातून, सामाजिक संपर्कातून आणि मानवी प्रयत्नांतून विकसित होत गेलेल्या संस्कृतीच्या संभारातून प्राप्त झाल्या आहेत, याचा शोध घेणाऱ्या मातब्बर तत्त्वज्ञ नि शास्त्रज्ञ यांच्यात अखंड वाद चालू आहेत. सृष्टीक्रम (Nature) की संवर्धन (Nurture) असा हा, थोडक्यात वादाचा मुद्दा आहे. आजच्या घडीला जनुक शास्त्रज्ञ हा वाद लढण्यात आघाडीवर आहेत.

बुद्धिमत्तेच्या संदर्भातील अनुवंशिकतेचा मुद्दा खूप महत्त्वाचा नि म्हणून गांभिर्याने न्याहाळण्यासारखा आहे. या संकल्पनेने सामाजिक स्तरावर वातावरण फार गढूळ केलेले आहे. बुद्धिमत्ता ही आनुवंशिक आहे, वांशिक फरक सरसरी बुद्धिमत्तेत आढळून येतात असे विचार ठामपणे आणि संख्याशास्त्रीय आकडेवारीच्या आधारे सिद्ध करणारे अभ्यास, हॉवर्ड गार्डनर यांनी, एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे, दर पंचवीस एक वर्षांनी मांडले जावेत अशी मागणीच जणू पुढे येते. सिरील बर्ट या आघाडीच्या मानसशास्त्रज्ञाने १९४३ ते १९४६ या काळात अनेक शोधनिबंध प्रसिद्ध करून, जुळ्या व्यक्तींच्या अभ्यासांतून असे दाखवून दिले की माणसाच्या बौद्धिक विकासात वातावरणापेक्षा अनुवंशिकतेचा वाटा कितीतरी मोठा असतो. (पुढे १९७१ मध्ये सिरील बर्ट यांचे निधन झाल्यावर त्यांच्या या आणि एकूणच संशोधनावर विलक्षण खोटेपणाचे आरोप केले गेले. आणि जमा केलेल्या आकडेवारी पासून ते त्यांनी नेमलेल्या सहाय्यक महिलांपर्यंत अनेक गोष्टी चक्क खोट्या होत्या, असे मान्य करण्यात आले !)

बर्ट यांच्या कितीतरी आधी म्हणजे अगदी विसाव्या शतकाच्या सुरुवातीस १९१२ मध्ये गोडार्ड यांचा 'कमकुवत मनांच्या संदर्भात' अनुवंशिकतांचे असलेले स्थान दाखवून देणारा अभ्यास प्रसिद्ध झाला. (या अभ्यासाचा अनुवाद १९१४ मध्ये जर्मनीत प्रसिद्ध करण्यात आला होता. त्याची नवी आवृत्ती १९३३ साली, म्हणजे हिटलरच्या नाझी पक्ष अधिकारावर आला तेव्हा प्रसिद्ध करण्यात आली आणि गोडार्ड यांचा असा काही हेतू नसतानाही, त्यांच्या निष्कर्षांचा संबंध हिटलर आणि त्यांनी केलेल्या ज्यूंच्या मानवी हत्याकांडाशी जोडला गेला !) गोडार्ड यांनी पुढील काळात मात्र आपले निष्कर्ष चुकीचे असल्याचे सांगायला सुरुवात केली.

मानसशास्त्रज्ञ आर्थर जेनसेन याने १९६९ मध्ये एक मोठा वादग्रस्त लेख प्रसिद्ध करून 'बौद्धिक कामगिरीला आपण कितपत उठाव देऊ शकतो ?' असा सवाल केला. अमेरिकेत मागासलेल्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या बालशाळांमधून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांबाबत त्याने शंका प्रदर्शित केली होती. त्याचे म्हणणे असे होते की अशा प्रयत्नांचा फारसा काही उपयोग नसतो. (कारण, बुद्धिमत्ता ही वांशिकतेने मिळालेली असते !)

या विषयावर पुन्हा एकदा शास्त्रीय अभ्यासाने ठाम प्रतिपादन करणारा अभ्यास 'द बेल कर्व्ह' या नावाने दहा वर्षांपूर्वी (१९९४ मध्ये) प्रसिद्ध झाला आहे. आणि अमेरिकन समाजातील बुद्धिमत्तेविषयीच्या फरकांची कारणमीमांसा करणारा हा ९०० पानी अहवाल मानसशास्त्रज्ञांच्या जगात सध्या गाजत आहे.

रिचर्ड हर्नस्टीन आणि चार्लस् मरे यांनी या अहवालात असे म्हटले आहे की, निसर्गाने दिलेल्या बुद्धिमत्तेसहित सर्व संपदेमध्ये विषमता आढळून येतात, हे वास्तव आहे. माणसाला प्राप्त होणाऱ्या बुद्धिमत्तेमध्ये अनुवंशिकतेचा वाटा ८० टक्क्यांपेक्षा जास्त नसतो, पण, ४० टक्क्यांपेक्षा कमीही नसतो, हेच मुळी या अभ्यासकांचे एक गृहीत होते. आणि त्यांनी आकडेवारीच्या अभ्यासांतून हे गृहित सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या अभ्यासातील सगळ्यात वादग्रस्त भाग आहे तो, कमी बुध्यांक आणि समाजातील गरिबी, शाळांतील गळती, बेकारी, कुटुंबातील घटस्फोट आणि गुन्हेगारी अशा बाबी, यांचा लावलेला संबंध. एशियन अमेरिकन, अमेरिकन आणि अफ्रिकन अमेरिकन यांच्या बुद्ध्यांकांमध्ये वांशिक भेद आहेत, असे प्रतिपादन करून हा अभ्यास, सरकारला या गोष्टी विचारात ठेवून कल्याणाची धोरणे आखण्याची सूचना करतो.

थोडक्यात असे की, मानसशास्त्राच्या क्षेत्रातील एक ठळक असलेला विचारप्रवाह असा की, बुद्धिमत्ता ही अनुवंशिक असते; ती बालकांना त्यांच्या आईवडिलांकडून जनुकांकरवी प्राप्त होते: बुद्धिमत्ता ही बुद्ध्यांकाच्या रूपाने मोजता येते आणि ती सामान्यत: अपरिवर्तनीय असते. या निष्कर्षांचे शैक्षणिक पर्यावसान असे घडून आले की, आपण आजवर मानत राहिलो की, हुशार आई-बापांची मुले हुशार ठरतात; ही हुशार मुले शाळांतून उत्तम गुण मिळवून यशस्वी होतात, आणि आयुष्यातही, सामान्यपणे, हीच मुले पुढे जाण्याची शक्यता अधिक असते. बुद्ध्यांकानुसार शाळेत, वर्गात काही मुले हुशार असतात तर काही कमी बुद्धिमान आणि काही तर चक्क 'ढ' असतात. जी मुले, कमी हुशार किंवा 'ढ' असतात, त्यांच्यातूनच गळती होते; अशा मुलांवर शिक्षक फारसे लक्ष केंद्रित करू इच्छित नसतात, कारण, ही मुले अखेरीस फारसे यश मिळविणारी किंवा देणारी नसतात. आज अस्तित्वात असलेल्या शिक्षणव्यवस्थेचे हे चित्र आहे.

### इ. मानसशास्त्राचा वर्तनवादी दृष्टिकोण

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला मानसशास्त्रज्ञाने तत्त्वज्ञानाचा तंबू सोडून स्वतंत्र शास्त्र म्हणून विकसीत होण्याकडे घोडदौड सुरु केली. आणि त्याचवेळी मानसशास्त्राला 'शास्त्र' म्हणून उभे करण्याच्या प्रयत्नात, साहजिकपणे, वर्तनवादी दृष्टिकोण या शास्त्राला आपलासा करावा लागला. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाला मानसशास्त्रातील वर्तनवादाचे अर्धशतक असे आपल्याला म्हणता येईल.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस मानसशास्त्रात प्रामुख्याने आत्मचिकित्सेची (Introspection) संशोधन पद्धती प्रचलित होती. व्यक्तीने एखाद्या चित्राकडे किंवा घटनेकडे पाहून आपल्या मनात कोणत्या भावभावना उचंबळून येतात, त्यांचा शोध घेणे, त्या स्पष्ट करणे, त्यांची चिकित्सा करणे आणि मग मानसशास्त्रज्ञांनी, त्याकरवी व्यक्तीच्या मनाचा ठाव घेणे, अशा तऱ्हेची काहीशी ही पद्धती होती. अर्थात् या पद्धतीच्या अंगभूत मर्यादा होत्या. व्यक्तीला अशातऱ्हेने प्रतिसाद देण्याचे नि आत्मपरीक्षण करण्याचे कौशल्य असायला हवे. आणि समजा असले तरीही त्याचे अर्थान्तरण करताना वेगवेगळे मानसशास्त्रज्ञ एकच प्रतिपादन करतील याची खात्री देता येणार नाही.

जॉन वॅटसनचा पहिला ग्रंथ 'सायकॉलॉजी फ्रॉम द स्टॅंडपॉईंट ऑफ बिहेवियरिस्ट' हा १९१९ साली प्रसिद्ध झाला आणि त्याने, आत्मचिकित्सेच्या पद्धतीच्या मर्यादा सांगून, चक्क असे जाहीर केले की, अशा व्यक्तिगत तोंडी प्रतिसादांना मानसशास्त्रात फारसे स्थान असता कामा नये. आणि त्याचे प्रमुख कारण म्हणजे, या प्रतिसादांची वस्तुनिष्ठतेने चिकित्सा करता येत नाही, ते तपासता येत नाहीत. वॅटसनच्या म्हणण्याप्रमाणे ''मानसशास्त्रीय अभ्यासाचे उद्दिष्ट हे आहे की, जेव्हा वास्तविके (data) वा नियम अशाप्रकारचे असतात की त्याला उत्तेजना (Stimulus) दिली तर त्याला प्रतिसाद काय असेल याचा मानसशास्त्र अंदाज करू शकेल. किंवा वेगळ्या शब्दात, जर प्रतिसाद माहीत झाला तर त्याला प्रभावीपणे कारण ठरलेली उत्तेजना कोणती ते सांगता येईल;'' थोडक्यात असे की, निरीक्षणयोग्य अशा वास्तविकांना, म्हणजे माणसाच्या बाबतीत निरीक्षणयोग्य अशा वर्तनाला मध्यवर्ती ठेवूनच त्यायोगे मानवी मनाचा शोध घेता येईल, ही भूमिका वॅटसनने घेतली. जेम्स मझूर यांनी वॅटसनचे तर्कशास्त्र सिलॉजिझमच्या भाषेत सांगितले आहे ते असे :

- आम्हाला मानसशास्त्रज्ञ हे शास्त्र असायला हवे आहे
- आणि शास्त्रे ही केवळ निरीक्षणयोग्य बाबी हाताळतात.
- म्हणून, मानसशास्त्राने केवळ निरीक्षणयोग्य बाबी हाताळल्या पाहिजेत.

अशाप्रकारे, निरीक्षणयोग्य बाबीच मानसशास्त्रात उत्तेजना किंवा प्रतिसाद म्हणून येऊ

शकतात, असे वॅटसनने प्रतिपादन केले. परिणामत:, तत्कालीन मानसशास्त्रात निरीक्षणयोग्य बाह्य वर्तनावर भर देण्यात येऊन, शिकणे म्हणजे वर्तनात बदल घडवून आणणे, असे म्हणून शिक्षणाची निरीक्षणयोग्य अशा वर्तनबदलाशी सांगड घालण्यात आली.

या वर्तनवादी मानसशास्त्राचे आणखी एक वैशिष्ट्य असे की यामध्ये वर्तनवादी अंगाने जे काही प्रत्यक्ष प्रयोग करण्यात आले, ते कुत्रा, उंदीर, ससा, कबुतरे अशा प्राण्यांवर करण्यात आले होते. (माणसावर प्रयोग करण्याला अर्थातच वास्तव आणि नैतिक अशा अनेक मर्यादा होत्या !)

इवान पावलो हा शरीरक्रियाविज्ञानाचा अभ्यासक (Physiologist) होता. या रशियन वैज्ञानिकाचे प्रयोगकार्य प्रामुख्याने पचनक्रियेच्या संदर्भात चालू होते. (या कार्यासाठी पावलोला १९०४ सालचे मेडिसीनचे नोबेल पारितोषिक प्राप्त झाले !) अन्न समोर आल्यावर लाळ गळणे हा कुत्र्याचा नैसर्गिक प्रतिसाद. पण, या विषयीचे प्रयोग करताना मात्र, ज्या कुत्र्यावर हे प्रयोग पुन्हा पुन्हा करण्यात आले त्याच्याबाबतीत, अन्न देण्यापूर्वीही, कुठल्यातरी वेगळ्याच उत्तेजनेने – म्हणजे अन्न देणारा जवळ येताना दिसला तरी – त्याची लाळ गळू लागे. पावलो या बाह्य प्रतिसादाच्या घटनेने थरारला आणि त्याच्या लक्षात आले की, नैसर्गिक उत्तेजनेच्या जागी एखादी कृत्रिम उत्तेजना निर्माण करूनही हवा तो प्रतिसाद प्राप्त करता येतो. (Stimulus Substitution). या अचानक लागलेल्या शोधाचा स्वत: पावलोवरच इतका प्रभाव पडला की पुढील आयुष्य त्याने मानसशास्त्राला आणि त्यामधील या प्रकारच्या प्रयोगांना (Classical Conditioning) वाहून घेतले.

पावलोच्या प्रयोगाचे नि त्यातील निष्कर्षाचे शैक्षणिक महत्त्व असे की त्याने शिक्षणविषयक विचारांना एक मानसशास्त्रीय दिशा दिली. माणसाच्या वर्तनात बदल घडवणे हे जर शिक्षणाचे कार्य असेल तर असा बदल विशिष्ट बाह्य उत्तेजना निर्माण करुन करता येतो; असा निर्वाळा मिळाला. यशाचे, बक्षिसाचे आकर्षण दाखवून किंवा भीतीचा – शिक्षेचा धाक घालून विद्यार्थ्यांना शिस्त पाळायला, अभ्यास करायला लावता येते, असा याचा अर्थ आहे.

पावलोच्या विचारांची एक मर्यादा अशी आहे की, त्याचे निष्कर्ष हे प्रामुख्याने उत्तेजनेला मिळणाऱ्या 'नैसर्गिक प्रतिसादा'शी संबंधित असे आहेत. बऱ्याचदा अशा होणाऱ्या प्रतिक्रिया या प्रतिक्षित क्रिया असतात. माणसाच्या अनेक क्रिया या गुंतागुंतीच्या नि उच्च स्तरांवरच्या असतात. तसेच असा काही प्रतिसाद द्यायचा किंवा नाही याची निवड व्यक्ती करीत असते. म्हणजे प्रतिसाद हे ऐच्छिक असू शकतात.

त्यामुळे प्रश्न असा उभा राहतो की अशा प्रकारच्या ऐच्छिक प्रतिसादारूपी वर्तनात कसा बदल घडवून आणता येईल ? अमेरिकन मानसशास्त्रज्ञ एडवर्ड थॉनडाईक याने प्राण्यांवरील

केलेल्या आपल्या प्रयोगांतून या प्रश्नाचे उत्तर शोधून काढले. त्याने एक महत्त्वाचे तत्त्व दिले. ते म्हणजे, वर्तनाला बळकटी आणण्याचे तत्त्व (Principle of reinforcement). १८९८ सालच्या त्याच्या प्रयोगातील निष्कर्ष पुढे म्हणजे वर्तनवादी विचारसरणी वॅटसनने मांडल्यानंतर अतिशय उपयुक्त ठरले. त्याच्या या प्रयोगात, भुकेल्या मांजरीला एका पेटीत कोंडून ठेवल्यात आले, आणि तिने त्यातून आपली सुटका करवून घेतल्यानंतरच तिला (बक्षीस म्हणून ठेवलेले) अन्न प्राप्त झाले. थॉर्नडाईकने असे दाखवून दिले की पेटीतून सुटण्यासाठी विविध प्रयत्न मांजर करीत असे. यत्न-प्रमाद पद्धतीने ती आपल्या सुटकेचा मार्ग शोधून काढत असे. अशाप्रमारे, आपला प्रश्न आपण सोडविणे आणि यातूनच मानसिक पातळीवर प्रश्न सोडविण्यासाठी लागणारे धागे जुळवणे, याला थॉर्नडाईक 'शिकण्याची प्रक्रिया' म्हणून संबोधतो. प्रश्न सोडविण्याची क्षमता प्राप्त करणे म्हणजे शिकणे, अशी शिक्षणाबाबत नवी दृष्टी त्याने दिली. त्याने असेही दाखवून दिले की ज्या जुळणीमधून समाधानकारक उत्तर मिळते त्याची पुनरुक्ती केली जाते. (Law of effect). अर्थात थॉनडाईकपेक्षाही, थॉनडाईकच्या तत्त्वांना आकार देण्याचे श्रेय स्किनर या मानसशास्त्रज्ञाला दिले जाते.

स्कीनरने थॉर्नडाईकच्या प्रयोगात सुधारणा केली. त्याने कबुतराला पेटीत ठेवल्यावर अशी किल्ली समोर ठेवली की जी पुन्हा पुन्हा चोचीने दाबून अन्नाचा हवा असलेला ट्रे मिळविता यायचा. आणि एकदा कबुतराला ही युक्ती कळली की ते त्याची पुनरावृत्ती करू शकत असे. याचा अर्थ असा की कबुतराला हवी तेव्हा कळ दाबून प्रतिसाद केव्हाही मिळवता यायचा आणि त्याला हव्या तेवढ्या वेळा तो मिळवता यायचा. ही स्वेच्छा प्रतिक्रिया होती (Operant Conditioning) अशा प्रकारच्या अनेक प्रयोगांती स्कीनरने वागणुकीविषयीच्या काही सर्वसामान्य तत्त्वांची मांडणी केली. अर्थात, आता, केवळ नैसर्गिक प्रतिक्रियांवर अवलंबून नसल्यामुळे ही तत्त्वे मनुष्यासहित वेगवेगळ्या प्राण्यांना आणि वेगवेगळ्या वर्तनांच्या संदर्भात लागू पडणारी अशी, हाती आली होती. स्कीनरने, 'शिकण्या'ची व्याख्या अपेक्षित वर्तनाच्या संदर्भात केली. माहिती-ज्ञान आणि त्यातून उत्पन्न होणारे वर्तन यांच्यासंदर्भात निश्चिती असेल तर ते विशिष्ट वर्तन आत्मसात झाले की त्यासाठी लागणारी ज्ञानाची तयारी झाली आहे, असे गृहित धरता येऊ लागले.

शिक्षणात आता खूप निश्चितता येऊ शकली. शिक्षणाची व्याख्या निश्चित झाली. 'वर्तनातील अपेक्षित बदल म्हणजे शिक्षण' अशा व्याख्येच्या पायावर आता शिक्षणाची व्यवस्था उभी करता येऊ लागली. विद्यार्थ्याला एका एका पायरीने पुढे नेता येणे शक्य झाले. पुनरावृत्ती करून ज्ञान बळकट करता येऊ लागले. पुनरावृत्तीसाठी घोकंपट्टी करण्यापासून ते उत्तरे तोंडपाठ आणि गृहपाठ करायला लावण्यापर्यंतची तंत्रे शिक्षणात स्थिर झाली. वर्तनवादी दृष्टिकोणातून शाळांचा व्यवहार जेव्हा चालतो तेव्हा तेथे शिक्षकाचे स्थान मध्यवर्ती असते. त्याला अपेक्षित असा वर्तनबदल त्याने विद्यार्थ्यांमध्ये घडवून आणायचा असतो. त्यामुळे ज्ञानाचा प्रवाह हा शिक्षकाकडून विद्यार्थ्याकडे असा एक दिशेने जात असतो. शिक्षक विद्यार्थ्याला ज्ञान आत्मसात

करायला प्रेरित करीत असतो; त्यासाठी उत्तेजना उभ्या करतो नि विद्यार्थी त्याला कोणता प्रतिसाद द्यायचा ते शिकतात. प्रश्नोत्तरे पाठ करून परीक्षा पास करतात. यासाठी बक्षीसे (Positive reinforcement) व शिक्षा (Negative reinforcement) अशा गोष्टींचा वापर केला जातो. परीक्षांना अंतिम महत्त्व प्राप्त होते.

आजची शालेय व्यवस्था आणि वर्गातील शिक्षणपद्धतीही अशी वर्तनवादी तत्त्वज्ञानाने प्रभावीत अशी पद्धती आहे.

■■

## शिक्षणविषयक रचनावादी विचारसरणी

ज्या काळात माणसाच्या मन:प्रवृत्तीचा अंदाज घेणे हे प्रत्यक्ष मेंदूमधील घडणाऱ्या घटना तपासून करणे शक्य नव्हते, त्या काळात, माणसाच्या वर्तनाकरवी त्याच्या मनोव्यापांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला गेला; आणि या दिशेनेही शिक्षणाचे शास्त्र बरेच पुढे गेले.

परंतु विसाच्या शतकाच्या उत्तरार्धात ज्ञानग्रहणविषयक खूपच वेगळ्या अंगांनी नवनवे संशोधन मानसशास्त्रात होऊ लागले. आकलनविषयक (Cognition) नवे विचार पुढे येऊ लागले; आणि वैचारिक स्तरावर तरी वर्तनवादाला आव्हान दिले जाऊ लागले. शिक्षणातील परिवर्तनाची स्वप्ने पाहणाऱ्यांनी हा वास्तव इतिहास समजावून घेणे अगत्याचे आहे.

### *ज्ञानउत्पत्तीशास्त्राचा नवविचार*

वर्तनवादी विचारसरणीला छेद देणारा आणि त्यामागील ज्ञानप्राप्तीच्या संकल्पनेलाच आव्हान देणारा स्वीस मानसशास्त्रज्ञ (मूळचा प्राणीशास्त्रज्ञ) जीन पियाजे (१८९६-१९८०) हा होय. शरीरविज्ञानावर आधारलेला असा ज्ञानग्रहणाचा सिद्धांत (Biological theory of knowledge) देऊन त्याने मानसशास्त्रात एक नवा विचारप्रवाह आणला. पियाजेच्या या विचारप्रणालीला ज्ञानउत्पत्तीशास्त्र (Genetic epistemology) असे संबोधले जाते. प्रत्यक्षात ज्ञाननिर्मिती कशी होते, आणि प्रत्येक मूल आपल्या ज्ञानाचा विकास कसा करते, याचा शोध घेण्यासाठी त्याने स्वत:च्या तीन मुलांच्या वाढीच्या अगदी सूक्ष्म नोंदी ठेवून अभ्यास केला.

याचबरोबर बुद्धिमापनाच्या क्षेत्रात पायाभूत काम करणारा बिने आणि त्याचा सहकारी सायमन यांच्या पॅरीसमधील प्रयोगशाळेत बुद्धिमान कसोट्यांमध्ये विद्यार्थ्यांनी ज्या चुका केलेल्या होत्या, त्या चुकांचे विश्लेषण करताना, पियाजेला, त्यात वयानुरुप अशा काही संरचना आढळल्या. एकाच वयोगटातील मुले सामान्यत: एकाच प्रकारच्या चुका करतात, हे जेव्हा दिसून आले तेव्हा शारीरिक वय, व त्या वयापर्यंतचा शारीरिक विकास यांचे बौद्धिक विकासाशी काही नाते असावे असे त्याला वाटले; आणि पुढे सुमारे अर्धशतक त्याने याचा शोध घेण्यात घालविले.

मानवी वर्तनाबाबतची जी काही तत्कालीन स्पष्टीकरणे होती ती पियाजेला अत्यंत अपुरी वाटली; बालकाच्या ज्ञानग्रहणाची प्रक्रिया समजावून घ्यायला ती पुरेशी वाटली नाहीत. त्यातही विशेषत: मानसशास्त्रात यासाठी अवलंबलेला यांत्रिक दृष्टिकोण त्याने स्वीकारला नाही.

जन्मल्यापासून मुलाची शिकण्याची प्रक्रिया सुरू होत असते. ती पुढे अखंड चालू राहते. नवनवीन गोष्टी आत्मसात करण्याची बालकाची जैविक शारीरिक क्षमता जसजशी वाढते, तसतसे मूल अधिकाधिक शिकत जाते. या शिकण्यासाठी तसतशी तयारी बालकाच्या मेंदूमध्ये होत जाते. बालक आपले आपणच भोवतालच्या जगाची ओळख करून घेते, आजूबाजूच्या व्यक्तींचा, वस्तूंचा परिचय करून घेते. टप्प्याटप्प्याने तो परिचय वाढवत नेते, आणि अशा तऱ्हेने आपल्या ज्ञानाची रचना मूल आपली आपणच करीत जाते. ही ज्ञानग्रहणाची प्रक्रिया बालकाच्या अंतर्गत कसकशी घडत जाते, याचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न पियाजेने केला आहे.

मुले आपली आपण शिकत असतात कारण, ती निसर्गत:च कृतिशील असतात; तद्वतच, अपल्या विकासाचा मार्गही ती आपला आपणच आखत असतात. हा विकासमार्ग 'एकदिशा' मार्ग असतो. व्यक्तिनिष्ठतेकडून वस्तूनिष्ठतेकडे, मूर्ताकडून अमूर्ततेकडे जाणारा, समग्रतेकडून त्याच्या सुट्या भागांकडे जाणारा आणि सोप्या सुगम गोष्टींकडून गुंतागुंतीच्या कठीण गोष्टींकडे जाणारा असा असतो.

बालकाविषयीचे म्हणजे त्याच्या बौद्धिक विकासाविषयीचे विश्लेषण करीत असताना पियाजे, 'वैश्विक बालका'ची (Universal Child) कल्पना मांडतो. याचा अर्थ असा की त्याचे हे विश्लेषण - विवेचन सर्वच बालकांना सामान्यपणे लागू पडते. स्थळ-काळ-वर्ग-वंश-लिंगभेद अशा कोणत्याच बाबींमुळे बालकाच्या विकासमार्गात बदल होत नसतो. पुढे पियाजेने विकासाचे टप्पे स्पष्ट केले आहेत; आणि जगातील प्रत्येकच बालक या टप्प्यांमधून पुढे पुढे जात असते असे दाखवून दिले आहे. वैश्विक बालकाच्या ज्ञानग्रहणाच्या प्रक्रियेविषयी बोलणे म्हणजे सर्वच बालकांच्या नैसर्गिक ज्ञानग्रहण प्रक्रियेविषयी निदान करणे होय.

बालकाला जन्मजात मिळालेली ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, शिकण्याची क्षमता नि ऊर्मी यांच्या सहाय्याने आजूबाजूच्या वातावरणाशी बालकाच्या सतत क्रिया-पतिक्रिया चालू असतात आणि त्यांतून बालकाच्या मनात काही बौद्धिक संरचना तयार होत जातात. बालक जेव्हा एखादा अनुभव प्रथमत:च घेते - तो अनुभव एखाद्या व्यक्तीचा, दृष्याचा, घटनेचा, कोणताही असेल तेव्हा, त्याची विशिष्ट अशी प्रतिमा (Schema) बालकाच्या मनात उमटते. हे विविध माहितीचे परस्परसंबंधित घटित असते. हे बालकाचे त्या वस्तू-व्यक्तीचे 'ज्ञान' असते. या ज्ञानाच्या विकासात दोन प्रक्रिया अनुस्युत असतात. जेव्हा एखादा नवीन अनुभव घेतला जातो तेव्हा तो आधीच्या प्रतिमेशी ताडून पाहिला जातो. जुळवून घेतला जातो. आधीच्या प्रतिमेत तो जिरवला जातो (Accomodation). पुन्हा नवनवे अनुभव अशाप्रकारे आधीच्या प्रतिमांशी (Schemata)

ताडून पाहून घडणाऱ्या प्रक्रियांतून एकावर एक अशी ज्ञानाची रचना होत जाते. (Adaptation). अशी जी ज्ञानाची रचना होते ती म्हणजे बुद्धिमत्ता असते, असे पियाजेचे म्हणणे आहे. याचसंदर्भातून पियाजेने संतुलनाची (Equilibrium) संकल्पना मांडली आहे. वातावरणाशी झालेल्या संपर्कातून येणारा प्रत्येक अनुभव व्यक्तीच्या मानसपातळीवर चाललेल्या बौद्धिक क्रिया-प्रतिक्रियांमध्ये एक प्रकारचे असंतुलन निर्माण करतो, आणि मग जुळवणुक (Assimilation) किंवा घडवणूक (Accomodation) या अंतर्गत प्रक्रियांतून पुन्हा एक समतोल अवस्था निर्माण होते. शैक्षणिक दृष्ट्या ही संकल्पना खूप महत्त्वाची आहे. काही मुले तार्किक गणिती बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात वेगाने पुढे सरकतात तर काही मुले मागे पडतात, याचे स्पष्टीकरण पियाजेच्या संतुलनाच्या प्रक्रियेत आढळून येते.

या बुद्धिमत्तेचा म्हणजे बुद्धीचा विकास कसकसा पायरी पायरीने होत जातो हे, पियाजेने, वयोमानानुसार असणाऱ्या चार अवस्थांच्या मांडणीने सांगितले आहे.

१. संवेदनकारक अवस्था (Sensomimotor Stage) - वयाच्या दुसऱ्या वर्षापर्यंतची ही अवस्था. या अवस्थेत बालक आपल्या कर्मेंद्रियांच्या सहाय्याने भोवतालच्या वातावरणाशी देवाण-घेवाण करीत असते; व मिळणाऱ्या अनुभवांतून जगाविषयीच्या संकल्पना बांधत जाते; जगाची ओळख करून घेत जाते. हे सर्व कार्य अर्थातच प्रामुख्याने भाषापूर्व अवस्थेतील बौद्धिक कार्य असते. या अवस्थेच्या अखेरच्या काळात मूल भाषा आत्मसात करू लागते.

२. क्रियापूर्व अवस्था (Preoperational Stage ) - दोन पासून वयाच्या सहाव्या सातव्या वयापर्यंतची ही अवस्था व्यक्तीच्या शिक्षणाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची अवस्था असते कारण, पियाजेच्या म्हणण्यानुसार, ज्याला आपण 'विचार' (Thought) म्हणतो, तो या अवस्थेत अस्तित्वात येतो. मुले पहिल्यांदाच अदृश्य, न पाहिलेल्या गोष्टींच्याही मानस प्रतिमा तयार करू लागतात. ही गोष्ट पुढील काळातील बौद्धिक विकासाच्या दृष्टीने जेवढी महत्त्वाची आहे, तेवढीच महत्त्वाची आणखी एक गोष्ट आहे; ती म्हणजे या वयात विगमनात्मक विचार (Deductive reasoning) करता येत नसतो. प्रौढांपेक्षा असणारे असे हे फार मोठे वेगळेपण आहे. बालकाने जशी पाहिली जशी जाणवली तशीच ती वस्तू किंवा घटना त्याच्या विचारात उमटते. या वयातील बालक आत्मकेंद्री (Egocentric) असते, त्यामुळे त्याचा विचार हा त्याच्यापासून सुरू होऊन त्याच्याचपर्यंत येऊन पोचतो. विशिष्टाकडून विशिष्टाकडे अशीच त्याची गती असते. (Transductive Thinking)

३. मूर्तक्रियात्मक अवस्था (Stage of Concrete Operations) - वय वर्षे ७ ते ११ ही वयोवस्था मागील अवस्थेइतकीच महत्त्वाची असते; कारण, या वयात मूल प्रत्यक्ष अनुभवाचे रुपांतर अमूर्त संकल्पनांमध्ये किंवा तार्किक विचारामध्ये करू लागते; कारण, त्यांना आता

विगनात्मक तार्किकतेचा वापर करता येऊ लागतो. चिन्हांकित भाषा, प्रतिके या बाबींचे आकलन होते. त्यांचा उपयोग करता येतो. आत्मकेंद्रितता कमी होऊन मूल अधिक सामाजिक बनते अधिक वास्तवतेकडे झुकते.

४. औपचारिक क्रियात्मक अवस्था (Formal Operational Stage) - वय ११ ते १५. आता अधिक अमूर्त पातळीवरील शक्यतांचा विचार करता येतो. अमूर्त पातळीवर तार्किक विचार करण्याची क्षमता पक्की होते. अमूर्त स्तरावरून प्रश्न सोडविण्याची क्षमता वाढते. विगनात्मक - निगमनात्मक विचारांची तार्किकता परिणत होऊ लागते. बौद्धिक स्तरावरील विचारांची ही सर्वात वरची पातळी असते.

पियाजेच्या म्हणण्यानुसार, बालकाची शारीरिक, बौद्धिक, भावनिक वाढ ही अशी विशिष्ट वयाशी संबंधित असते; आणि वयाच्या थोड्याफार फरकाने, पण सर्वच मुले या अवस्थांतून जात असतात. एवढेच नव्हे तर, एका अवस्थेतील तयारी पूर्ण झाल्याशिवाय दुसऱ्या अवस्थेत ती शिरत नाहीत; एकदम उडी मारून ती पुढे जात नाहीत.

एका अवस्थेतून दुसऱ्या - म्हणजे अधिक वरच्या - अवस्थेत शिरण्यासाठी चार घटकांचा मेळ आणि परस्पर सहयोग आवश्यक असतो. एक, परिपक्वता, शारीरिक वाढ व मानसिक वाढ आणि मूल ज्या अवस्थेत आहे ती अवस्था; दोन, बाह्य वातावरणाशी संपर्कात येणाऱ्या वस्तू व घटनांशी निबिद्ध असे कृतिशील अनुभव; तीन, सामाजिक अभिसरण किंवा इतरांशी - विशेषत: इतर समवयस्क मुलांशी संपर्क आणि चार, वरील तीनही बाबी एकत्र आणण्याची संतुलनाची प्रक्रिया, की जिच्यामधूनच प्रतिमांची निर्मिती म्हणजेच ज्ञानग्रहणाची प्रक्रिया घडून येते. पियाजेच्या 'ज्ञानउत्पत्ती शास्त्रा'नुसार ज्ञान म्हणजे एखादी निर्मित अशी 'साठा' करण्यायोग्य वस्तू नाही तर ती एक नैसर्गिक 'प्रक्रिया' आहे; त्यामुळे साहजिकच तिचे स्वरूप स्थिर घटकाचे (Static) असे नाही तर ते प्रवाही (Dynamic) असे आहे, असे म्हणता येईल. त्यामुळे शिकण्याची प्रक्रिया ही सातत्याने चालणारी, सतत ज्ञाननिर्मिती करणारी प्रक्रिया ठरते; निम्नस्तरावरुन उच्चस्तरावर जाण्याची तिची दिशा आहे. माणसाची ज्ञानलालसेची उपजत असलेली भूक भागविणारी प्रक्रिया म्हणजे शिकण्याची प्रक्रिया आहे. आणि या प्रक्रियेत सततच्या कृतीला, कृतीतून - बाह्य मानवी नि भौतिक संपर्काला, संपर्ककरवी जमा केलेल्या अनुभवांना पायाभूत असे स्थान आहे.

'मुले प्रौढांसारखा विचार करीत नाहीत' या पियाजेने दिलेल्या सैद्धांतिक विचाराविषयी, आईन्स्टीनने असे उद्‌गार काढले आहेत की, ''हे इतकं साधं (तत्त्वज्ञान) आहे की, केवळ अफाटप्रतिभेच्या माणसाल [illegible] हे सुचू शकेल.'' मुले प्रौढांसारखा विचार करीत नाहीत हे सत्य, हा विसाव्या शतकातील [illegible]क महान शोध मानायला हवा, त्याने, एकीकडे, जगातील प्रत्येक मुलाला न्याय मिळण[illegible]र आहे तर दुसरीकडे, त्याच्यामुळे सबंध शिक्षणाचा पायाच बदलून जाणार

आहे. आज, मुलांनी प्रौढांसारखं वागावं असं पालकांना, शिक्षकांना, शाळा व्यवस्थापकांना वाटत असतं. प्रौढांपेक्षा वेगळी वागत असतील तर मुले चुकताहेत, बेशिस्त आहेत, आज्ञाधारक नाहीत अशा दोषांची झूल मुलांवर चढविली जाते. वास्तविक मुले बेशिस्त नसतात, त्यांनी सदैव आज्ञाधारक असण्याची गरज नसते आणि चुकण्याचा तर त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे, ही जाण आपल्याला पियाजे देतो. जीन पियाजेच्या फार पूर्वी अशाच एका जीन जॅक्स रुसोने म्हटले होते की, ''अगदी शहाणीसुरती माणसंसुद्धा, मुलं शिकण्याच्या कोणत्या अवस्थेत आहेत याचा विचार न करता, माणसाला काय काय माहीत असायला हवं यावर लक्ष केंद्रित करतात. ते नेहमीच बालकामधील प्रौढाचा शोध घेत जातात, मात्र प्रौढ होण्यापूर्वीचे बालक कसे असते याचा विचार करीत नाहीत.''

रूसोचे हे विधान गंभीरपणे घेण्याची संधी तत्कालीन समाजाने घालविली कारण, त्यावेळी हे विधान स्वप्नाळू वाटले होते. आज दोनशे वर्षांनंतर जेव्हा पियाजे सांगतोय की, 'मुलं प्रौढांसारखा विचार करीत नाहीत' त्यावेळी त्याला बळकट सैद्धांतिक आधार आहे. ''आपल्याला आता असे आढळून आले आहे की, शिक्षण ही काही शिक्षकाने करावी अशी गोष्ट नाही, तर माणसात उत्स्फूर्तपणे उद्‌भवणारी ती नैसर्गिक प्रक्रिया आहे. शब्द ऐकून शिक्षण होत नाही, तर आपल्या भोवतालच्या परिसराशी कृतिशील संबंध ठेवण्याच्या अनुभवांतून, मूल, ते आत्मसात करते. शिक्षकाचे काम बोलणे हे नाही, तर विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या खास वातावरणात, विविध सांस्कृतिक उपक्रम करण्यासाठी, हेतूपूर्ण योजनांची मालिका तयार करणे हे त्याचे काम आहे.'' मादाम मॉंटेसोरीबाईंनी तत्कालीन मानसशास्त्र, आरोग्यशास्त्र, शरीरविज्ञान, वंशशास्त्र अशा अनेक शास्त्रांचा पडताळा पाहून आणि प्रत्यक्ष, लहान मुलांच्या शिक्षणाचे प्रयोग करून काढलेले हे उद्‌गार सुमारे शंभर वर्षांपूर्वीचे आहेत. (मॉंटेसोरीबाईंच्या विचारांना प्रत्यक्षात उतरवण्याची संधी मात्र गिजुबाई बधेका, ताराबाई मोडक, सरलादेवी साराभाई व त्यांचे अनेक सहकारी यांनी घेऊन, प्रत्यक्ष प्रयोग, प्रशिक्षण, प्रचार, प्रसार अशा मार्गांनी शैक्षणिक परिवर्तनाची एक चळवळ भारतात - विशेषत: गुजरात नि महाराष्ट्रात - उभी केली. तीही आता क्षीण झाली.) रूसोप्रमाणेच मॉंटेसोरींनी जी काही शिक्षणप्रक्रिया मांडून ठेवली आहे तिला आता आजच्या मानसशास्त्रीय नि मज्जाशास्त्रीय संशोधनांचा बळकट आधार मिळाला आहे.

त्यामुळे आता तरी ही संधी घेण्याचा आपण गंभीरपणे विचार करू या; अन्यथा शाळाशाळांमधील त्या लहानग्या विद्यार्थ्यांच्याच भवितव्याला धोका आहे आणि त्यांच्यातून दडलेल्या भावी समाजालाच धोका आहे.

पियाजेच्या या बालविकासाच्या अवस्था शालेय शिक्षणाशी जोडून, शिक्षणरचना कशी असावी याचा एक ढाचा ठरवता येऊ शकतो. यासाठीच किंबहुना, जरा अधिकच विस्ताराने पियाजेचे विचार याठिकाणी मांडले आहेत. अर्थात् पियाजेने, मूल हे प्रौढांपेक्षा वेगळे असते हे

एक सत्य सांगितले. आणि त्याचबरोबर ते वेगळे म्हणजे नेमके कसे असते, त्याच्या ज्ञानग्रहणाच्या प्रक्रियेत किती नि कोणकोणते घटक समाविष्ट असतात, आणि बालकाचा विचार मध्यवर्ती ठेवून शिक्षण केले जावे, अशी एक दिशाही त्याने शिक्षणातील लोकांना देऊन ठेवली आहे.

या दिशेने वाटचाल करायची तर आपली विचारशिदोरी आणखी भरून देणाऱ्या दोन बाबी आपण लक्षात घ्यायला हव्यात. एक आहे, गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये झालेले मेंदूविषयक संशोधन आणि दुसरी आहे ती बुद्धिमत्तेच्या संदर्भात नव्याने झालेली सैद्धांतिक मांडणी. या दोन्ही घटनांना फार मोठा शैक्षणिक अर्थ आहे, म्हणून त्याचा आढावा घेणे इष्ट ठरणार आहे.

ज्यावेळी वर्तनवादी विचारसरणीचा जन्म झाला, त्याचा व्यापक प्रसार नि स्वीकार झाला त्यावेळी मानवी मेंदूच्या चलनवलनाविषयी पुरेशी माहिती उपलब्ध झालेली नव्हती. त्यामुळे मानसशास्त्राच्या नि म्हणून शिक्षणशास्त्राच्या प्रांगणात 'मेंदूपासून वर्तनापर्यंत' अशी मांडणी न होता 'वर्तनाकडून मेंदूकडे' अशी मांडणी करावी लागली. आता मात्र चित्र पालटू शकते. मेंदूचे संशोधन करणाऱ्या मज्जाशास्त्रात आणि मग त्याकरवी मानसशास्त्रात अनेक नवी संशोधने होऊन, माणसाच्या शिकण्याच्या प्रक्रियेविषयी अधिक अधिकृत माहिती उपलब्ध झाली आहे. त्याचा शिक्षणविषयक विचारांवर आणि व्यवहारांवर असर होणे अगदी साहजिक आहे. जगातल्या अनेक राष्ट्रांना तसा तो करवून घेण्यास आणि त्या अंगांनी शिक्षणात मूलभूत परिवर्तन करायला देखिल सुरूवात केली आहे. शिक्षणाला नवा आशय देणाऱ्या या मेंदूविषयक संशोधनातील केवळ काही तुकडे येथे मांडले आहेत; तसेच आपल्या दृष्टिने अधिक महत्त्वाचे असणारे, या संशोधनांचे शैक्षणिक पर्यवसान मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

### *मज्जाशास्त्रातील संशोधन आणि शिक्षण*

माणसाच्या मेंदूविषयी व त्याच्या कार्याविषयीचे आकर्षण शास्त्रज्ञांना नेहमीच होते. परंतु प्रत्यक्ष मेंदूच्या अंतर्गत रचनेचे फोटो काढण्याचे तंत्र विकसित झाले ते क्ष-किरण (x-ray) तंत्र अवगत झाल्यानंतर. १९०७ साली प्रथमतः वेगवेगळ्या कोनांतून घेतलेले एक्सरे फोटो एकत्र करून मेंदू, एकसंध पाहण्याचा प्रयत्न झाला. या तंत्राला एक्स-रे कॉम्प्युटेड टोमोग्रॅफी (CT) असे म्हणतात. त्यानंतर रक्तामधून काही रेडिओ ॲक्टिव्ह सबस्टन्स टोचून खास कॅमेऱ्याने फोटो घेतले गेले. या तंत्राला पॉझिट्रॉन एमिशन टोमोग्रॅफी (PET) म्हणतात. संगणक तंत्राचा शोध लागल्यानंतर मात्र इतर क्षेत्रांप्रमाणेच या क्षेत्रातही क्रांतिकारक बदल झाले. १९८० साली विकसीत झालेले मॅग्रेटिक रेझो॰॰न्स इमेजिंग (MRI), मॅग्रिटोएन्सिफॉलॉजी (MEE), सिंगल फोटोन एमिशन कॉम्प्युटेड टोमोग्रॅफी (SPECT) अशी नवनवी तंत्रे विकसीत होऊन मेंदू कार्यरत असताना मेंदूचे फोटो घे॰॰ शक्य झाले. मेंदूतील वेगवेगळी कार्य करणारे वेगवेगळे भाग आता

स्पष्ट होऊ लागले. फोटो इमेजिंगच्या या तंत्रांमुळे मेंदूच्या कार्याविषयी आणि अगदी जन्मापासून बालपणात कसकसे बदल मेंदूत होत जातात याविषयी स्पष्टता होऊ लागली आहे. तसेच, बालकाच्या शिकण्याचा नि मेंदूतील पेशींच्या कार्यांचा कसकसा संबंध आहे हे आता उलगडू लागले आहे.

जन्मतःच प्रत्येक बालकामध्ये अक्षरशः कोट्यवधी न्यूरॉन्स्-पेशी असतात. परंतु त्यांना कार्यरत करण्यासाठी लागणारी बांधणी जन्मापूर्वी पूर्ण झालेली नसते. आणि ती वयाच्या आठव्या वर्षापर्यंत पूर्ण होतही नाही. किंबहुना म्हणूनच माणसाचे मूल अनेक वर्षे अनेक गोष्टींबाबत परावलंबी असते. आणि जन्मानंतर जसजसे मूल शिकत जाते तसतसे त्याचे परावलंबित्व कमी होत जाते. (इतर प्राण्यांमध्ये त्यांच्या पिल्लांचे परावलंबित्व असे दीर्घकालाचे नसते, कारण जन्मापूर्वीच मेंदूची बांधणी बऱ्याच अंशी पूर्ण झालेली असते. माणूस मात्र याबाबतीत प्राण्यांपेक्षा वेगळा असतो.) या पेशींची कार्यक्षमता अफाट असते. आणि बालक जसजसे दैनंदिन जीवनात विविध अनुभव घेत जाते, तसतशी पेशींची बांधणी घडून येते नि पेशी कार्यरत होतात; बळकट होत जातात. ज्याप्रकारचे अनुभव एखाद्यास आजिबातच प्राप्त होत नाहीत, त्या प्रकारच्या कार्यांसाठी लागणाऱ्या पेशी कार्यरत न होता नाहीशा होतात. उदाहरणार्थ, असे म्हटले जाते की जगामध्ये अस्तित्वात असलेल्या हजारो भाषांमधून सुमारे शंभर स्वर अस्तित्वात आहेत. नवजात बालकाला या सर्वच स्वरांचे ज्ञान नि वापर करण्याच्या क्षमता त्यांच्या मेंदूतील पेशीत असतात. परंतु मूल ज्या घरात जन्म घेते, त्या घरातील आणि आजूबाजूच्या वातावरणातील भाषा जेव्हा ते आत्मसात करू लागते, तेव्हा त्या भाषेत असणारे सर्व स्वर सहजतेने आत्मसात करू लागते, त्याचबरोबर ज्या भाषांचे शब्द त्याच्या कानांवरही कधी पडत नाहीत, त्या भाषांतील विशिष्ट स्वर उच्चारण्याची उपजत असलेली बरीचशी क्षमता आपोआपच नाहीशी होते. कालांतराने मोठेपणी ती नवी भाषा शिकताना त्यातील स्वरांचे सूक्ष्म उच्चार भेद करायला खूप कठीण जाते.

ज्या पेशींना सराव मिळत नाहीत त्या नाहीशा होतात. प्रौढापेक्षा लहान बालकाच्या मेंदूमध्ये जवळ जवळ दुप्पट न्यूरॉन्स-पेशी असतात; पुढे अशाप्रकारे त्या कमी कमी होत जातात.

पियाजेने जी ज्ञानग्रहणाची प्रक्रिया सांगितली आहे त्यात अनुभवांना खूप महत्त्व दिले आहे. इथे, त्याचे आणखी एक महत्त्व लक्षात येते. अनुभवांच्या खाद्यानेच पेशींचे पोषण होत असते, त्यांची परस्परांशी होणारी जोडणी बळकट होत असते, आणि ज्ञानग्रहणाच्या क्षमताही अनुभवाने समृद्ध केल्या जात असतात. अनुभवांच्या प्रमाणात पेशींचे जाळेही कार्यक्षम होते. प्रत्येक नवीन अनुभवाबरोबर मेंदूतील जाळ्यात तत्संबंधीबदल होऊन या त्यांच्या जाळ्याची संरचना बदलते.

ज्याप्रमाणे बालकांच्या मेंदूला अनुभवांचे खाद्य सतत मिळायला हवे, तद्वतच त्यांच्या

अवयवांची सतत हालचाल होत राहणे, हे डावा नि उजवा मेंदूचा भाग - म्हणजे त्यातील पेशी - यांच्या परस्पर सहयोगासाठी आवश्यक असते. लहान मुले स्वभावतःच हालचालखोर असतात; आणि त्यांना सतत गप्प बसून ठेवले नाही, शाळांतील बाकांमध्ये तासन तास जखडून ठेवले नाही तर, साधारणपणे पाचव्या वर्षापासून होणारे उजव्या-डाव्या मेंदूमधील चलनवलन परिणामकारक रीतीने होत जाते. व पुढे ९-१०-११-१२ वर्षांपर्यंत हा परिणाम कायमस्वरूपी घडून येतो. अमूर्त विचार प्रक्रियेसाठी हे घडणे आवश्यक असते. शाळांमधून शिकत असताना, मुलांना हालचालींची मोकळीक ठेवली त्यांच्या, उठण्या-बसण्यावर उगाच शिस्तीची बंधने लादलेली नसली तर बालकांचे मन अभ्यासावर चांगल्या रीतीने केंद्रित होते. त्यामुळे चांगल्या शाळा हल्ली वर्गांमधील बाकांचे अडसर दूर करू लागल्या आहेत.

स्मृती (Memory) ही सुद्धा विकसीत होणारी गोष्ट आहे. असे म्हटले जाते की साधारणपणे पंधराव्या वयाला मानवी मेंदूत एकाचवेळी सात घटक लक्षात ठेवण्याची क्षमता असते. (-, + २) आणि यासाठी आधीच्या काळात मेंदूची या दिशेने वाढ होत जावी लागते. साधारणतः तिसऱ्या वयाला एक घटक (One Memory Space) स्मृतीची क्षमता असते. आणि दर दोन वर्षाला एक एक घटक स्मृतीने क्षमता वाढत जाते. यामुळे सातव्या वयापर्यंत तीन आणि नवव्या वर्षापर्यंत चार, अशी ही स्मृती वाढत जाते. त्यामुळे या वयांमधील मुलांच्या शिक्षणात पाठांतरावर जोर देणे आणि त्या त्या वयाला योग्य असतील त्यांपेक्षा अधिक स्मृतीक्षमतांसाठी परीक्षा द्यायला लावणे योग्य नसते. अनेक शिक्षण तज्ज्ञांनी या स्मृतीविकासास पोषक ठरणारी अशी स्वयंशिक्षणाची अनेक साधने मात्र शोधून काढली आहेत. उदाहरणार्थ, सामान्यपणे पाचव्या-सहाव्या वयापर्यंत मुले एकाच वेळी दोन गुण वैशिष्ट्यांच्या आधारावर (रंग आणि आकार किंवा आकार व आकारमान इ.) वर्गीकरण करू शकतात; त्यामुळे या क्षमतांची दखल घेणारे आव्हानात्मक खेळ, शैक्षणिक साधने मुलांसमोर ठेवली जातात. याच वयाला साधारणपणे, लिहिणे-वाचणे सुरू करणे इष्ट असते. कारण, शरीरातील सूक्ष्म स्नायू (मनगटामधील सहा स्नायू) मेंदूमधील डाव्या-उजव्या भागांचे परस्पर सहकार्य, स्मृती क्षमतेची तयारी, डोळ्यांमधील नजर केंद्रित करण्याची क्षमता या सर्व गोष्टींची पूर्वतयारी नीटपणे झालेली असते. साधनसंपन्न बालवाडीत स्वयंशिक्षणाच्या साधनांवर खेळलेली मुले कोणी न शिकवताही लिहा-वाचायला शिकतात ही फारसे आश्चर्य करण्याची बाब नाही.

बालकाच्या ज्ञानग्रहणाच्या प्रक्रियेत असे काही कालावधी प्रत्ययाला आले आहेत की त्या विशिष्ट कालावधीत विशिष्ट बाबींच्या ज्ञानाची रचना वेगाने नि प्रभावीपणे होते. साहजिकच हे विशिष्ट कालावधी (यांना तांत्रिक भाषेत 'संधींची गवाक्षे' windows of opportunity असे म्हणतात.) हेरून, त्या विशिष्ट बाबींच्या विकासासाठी आवश्यक असे कृतिशील अनुभव प्राप्त

करून द्यायचे असतात; घरांतून नि शाळांतून तशा संधी भरभरून पुरवायच्या असतात. उदाहरणार्थ मज्ञाशास्त्रज्ञांनी असे दाखवून दिले आहे की, मूल २ ते ४ महिन्याचे असते तेव्हा नजर स्थिर करणाऱ्या त्याच्या मेंदूतील पेशी कार्यान्वित होऊ लागतात; आठव्या महिन्यापर्यंतचा काळ हा याबाबतीतील उच्चकालावधी असतो. आणि पुढे वयाच्या दुसऱ्या वर्षापर्यंत ही क्षमता पूर्णत्वाला जाते. मात्र बौद्धिक विकासाप्रमाणेच यासाठीही कृतिशील अनुभव देण्याची गरज असते. दुसरे उदाहरण भाषेचे. भाषा चांगल्यारीतीने आत्मसात होण्याचा कालावधी असतो तो साधारणपणे पावणे दोन वर्षांपासून ते तीन साडे-तीन वर्षांपर्यंत. सामान्यपणे तीन-साडेतीन वर्षाचे मूल बऱ्यापैकी 'भाषाप्रभू' झालेले असते. या कालावधीत बालकाच्या भाषाशिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरवायचे असते. मूल भाषा शिकते ते अंतर्गत प्रेरणेने, उत्स्फूर्तपणे. नोम चॉम्स्की म्हणतो त्याप्रमाणे, बालकामध्ये भाषेचे व्याकरण आत्मसात करण्याची क्षमता तर उपजतच असते. मेंदूच्या रचनेत, ब्रोका विभागात त्यांची क्षमता असणाऱ्या पेशी या कालावधीत कार्यक्षम होतात. अशावेळी बालकाला भाषा शिकण्यासाठी बाह्य प्रेरणाची खूपच गरज असते. कारण, भाषा ही पूर्णतः सामाजिक गोष्ट आहे, आणि समाजसंपर्काशिवाय भाषा आत्मसात करता येत नाही. भाषा शिकण्यासाठी तीन बाबींची आवश्यकता असते. एक, भाषा ऐकणे, दोन, भाषा बोलून पाहणे, आणि तीन, कृती-वस्तू-व्यक्ती घटना अशांच्या मूर्त अनुभवांची अर्थपूर्ण भाषेसाठी प्राप्ती. संबंधित प्रौढांची जबाबदारी असते ती या अनुभवांच्या संधी जाणीवपूर्वक पुरविण्याची. त्यासाठी पालकांना नि बालवाडी-अंगणवाडीतील शिक्षिकांना हे ज्ञान आणि त्यासंबंधातील कौशल्य असण्याची गरज असते. अर्थात् हे भाषा शिक्षण वेगवेगळ्या अंगांनी वयाच्या सातव्या-आठव्या वर्षापर्यंत चालूच असते. त्यामुळे सुचवावेसे वाटते ते असे की प्राथमिक शाळेत, चौथीपर्यंत शाळांमधील अधिकतम वेळ हा भाषा शिक्षणासाठी द्यायला हवा. आणि भाषाशिक्षणाची भिस्त केवळ एका क्रमिक पुस्तकावर टाकू नये. केवळ वाचण्याच्या संधींपेक्षाही अधिक-कितीतरी अधिक संधी, मुलांना, बोलण्याच्या, अभिव्यक्तीच्या मिळाल्या पाहिजेत. जे जे मुले आत्मसात करतात ते ते बोलल्याने पक्के होते. बोलल्याने केवळ बोलता चांगले येते असे नव्हे, तर बोलण्याने, कल्पनाशक्तीला प्रेरणा मिळते, बोलल्याने धीटपणा अंगी येतो, बोलण्याने भावनांचे विरेचन होते, बोलण्याने दुसऱ्याशी सहकार करण्याची क्षमता वाढते, बोलण्याने, विचारशक्ती विकसीत होते. शिवान मानसशास्त्रज्ञ व्यागोटस्की म्हणतो त्याप्रमाणे भाषा हे विचार करण्याचे अत्यंत प्रभावी असे साधन आहे. आपण विचार करतो तो भाषेकरवी आणि विचार लिहून वा बोलून व्यक्त करतो तोही भाषेकरवी. त्यामुळे सुशिक्षित होण्याचे भाषा हेच एकमेव आणि अत्यंत प्रभावी साधन आहे आणि जगात हवेसारख्या पसरलेल्या ज्ञानाच्या विश्वात प्रवेश करण्याचे तेच प्रमुख साधन आहे. त्यामुळे केवळ लिहिता वाचता येणे म्हणजे भाषा येणे नव्हे, भाषेला असलेल्या सर्व सांस्कृतिक संदर्भासह भाषा आत्मसात होणे हे महत्त्वाचे आहे. आणि अशी सर्वतोपरी भाषा आत्मसात करण्याचे सर्वात चांगले वय आहे ते दहा-बारा

वर्षांपर्यंतचे वय. या वयातील शिक्षणाची संपूर्ण रचनाच भाषाभिमुख असली पाहिजे. कारण, भाषा हेच इतर कोणतेही विषय शिकण्याचे प्रभावी साधन आहे. मुंबईतील होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राने, प्राथमिक-माध्यमिक शाळांतील मुलांना गणित-विज्ञान हे विषय कठीण का जातात, याचा जेव्हा शोध घेतला तेव्हा त्यांना त्याचे कारण मुलांना भाषा नीट येत नाही, यामध्ये आढळले.

अत्यंत अल्पवयात किंवा बालवाड्यांतून अथवा प्राथमिक शाळांतून, मातृभाषेबरोबरच इंग्रजीसारखी परकी भाषा शिकण्याचा जो एक गोंधळाचा प्रश्न निर्माण झाला आहे, त्याचे, अलीकडच्या मेंदूविषयक संशोधनाच्या सहाय्याने थोडेसे विवेचन करणे इष्ट ठरेल असे वाटते. (यापूर्वी वेगळ्यासंदर्भात याचा उल्लेख येऊनही गेला आहे !)

मेंदूविषयक संशोधनाच्या एक निष्कर्ष असा की, भाषा शिकण्याचा जो अत्युच्च कालावधी असतो (साधारणपणे पावणे-दोन, दोन वर्षांपासून ते तीन-साडेतीन वर्षांपर्यंत आणि पुढेही साधारणपणे आठ वर्षांपर्यंत) त्या कालावधीत मुले केवळ एकच नव्हे तर अनेक भाषाही वेगाने आत्मसात करू शकतात. ज्या ज्या भाषा सतत त्यांच्या कानांवर पडतात, डोळ्यांना दिसतात, त्या त्या भाषिकांशी संपर्क येऊन, बोलायला मिळतात, त्या त्या भाषा मुले वेगाने आत्मसात करतात. थोडक्यात ज्या ज्या भाषा त्यांच्या दैनंदिन जीवनात हरघडी ऐका-बोलायला मिळतात त्या त्या भाषा आपोआप आत्मसात होतात. कारण, अशा भाषा आत्मसात करण्याच्या क्षमता त्यांच्या मेंदूमध्ये उभ्या असतात.

परंतु अशाप्रकारे भाषा 'आत्मसात' होणे वेगळे आणि भाषा 'शिकणे' वेगळे. भाषा वातावरणातून जेव्हा येते तेव्हा ती सहजपणे आत्मसात होते, आणि भाषा जेव्हा शिकविली जाते तेव्हा ती, प्रयत्नपूर्वक शिकावी लागते. एवढेच नाही तर, परकी भाषा जेव्हा अशी शिकून शिकायची असते तेव्हा ती, एका भाषेकरवी दुसरी भाषा शिकण्याची गोष्ट ठरते; आणि मग ती येण्यासाठी पहिली भाषातरी पक्की आत्मसात झालेली अशी असावी लागते. अन्यथा, जे पालक (आणि शिक्षक - शाळा आणि निर्णय घेणारे मंत्री) जे पहिली भाषा नीट आत्मसात न होता, दुसरी भाषा शिकवण्याचा अट्टाहास धरतात तेव्हा मुलांची स्थिती, ज्याला इंग्रजीत (Non-nons) असे म्हणतात, तशी होते. हीही भाषा नाही आणि तीही नाही, अशी स्थिती होते. कारण, (उदाहरणार्थ), मराठी भाषिक पालक आपल्या पाल्याला इंग्रजी यावे म्हणून त्याच्याशी मराठी बोलण्याचे टाळतात, त्याला मराठी वाचू देत नाहीत की, त्याला मराठीत बोलण्यासही मना करतात. परिणामतः स्वभाषेचा सरावच नसल्याने त्या भाषेत केवळ बोलणेच नव्हे तर त्या भाषेतील अफाट शब्दसंग्रहापासून ते आपल्या पाल्याला दूर ठेवतात, त्या त्या भाषेतील सांस्कृतिक श्रीमंतीपासून दूर ठेवतात, त्या भाषेत करावयाच्या अभिव्यक्तीपासून दूर ठेवतात आणि याचमुळे मुलांची विचारशक्ती, स्वतंत्रविचार शक्तीच खुंटते. अशी मुले सामान्य व्यवहार

करतात पण खोलवरचे प्रश्नसोडविण्याच्या मागे असलेले विचारप्रक्रियेचे संचितच हरवून बसतात. सामाजिक संपर्क ही क्षीण करतात. मॅक्सिन बर्नसन यांनी मौजेच्या एका अंकात (दिवाळी २००३) एका लेखात म्हटल्याप्रमाणे, स्वभाषेपासून दूर जाणारे विद्यार्थी, स्वतःच्या भोवतालच्या समाजाचे प्रश्न आकलन करून घेण्यासही असमर्थ ठरतात. त्यांचे या अशा वास्तव प्रश्नांशी काही देणे-घेणे नसते. पर्यायाने हे विद्यार्थी प्रश्नांच्या सोडवणुकीत सहभागी होण्याऐवजी हे प्रश्न तीक्ष करणाऱ्यांच्यांच मालित जाऊन बसतात. असे विद्यार्थी समाजपरिवर्तनाच्या कोणत्याही विधायक वा संघर्षात्मक चळवळींच्या दृष्टीने निरुपयोगी ठरतात. हे सामाजिक दूरत्व निर्माण करण्याशी जर शिक्षणाच्या माध्यमाच्या निवडीचा असा संबंध असेल तर भाषेविषयीचा विचार हा शिक्षणातील एक आघाडीचा प्रश्न ठरतो असे मला वाटते.

*बहुविध बुद्धिमत्तांचा विचार*

मज्ञाशास्त्रीय नि मानसशास्त्रीय संशोधनांतून अलीकडेच प्रत्ययाला आलेल्या एका, पण अतिशय महत्त्वाच्या गोष्टीचाही उल्लेख करायला हवा. आता असे लक्षात आले आहे की, आजवर जी समजूत आपण उराशी धरून ठेवली आणि जिच्या आधारावर वर्गातील शिक्षणातील विषमताही सोसली, तशी बुद्धिमत्ता ही 'एक', आनुवंशिक नि अपरिवर्तनीय अशी गोष्ट नाही. तर, बुद्धिमत्ता या अनेक असतात, आणि प्रत्येकाला जन्मतःच म्हणजे उपजतच या बुद्धिमत्तांच्या कमी-अधिक प्रमाणांचा एक विशिष्ट असा पट प्राप्त झालेला असतो. महत्त्वाची गोष्ट अशी की माणसाच्या चेहऱ्याप्रमाणेच हा बुद्धिमत्तांचा पटही प्रत्येकाचा वेगळा असतो. याचा अर्थ असा की कुणाला भाषिक बुद्धिमत्ता तीव्रतेने प्राप्त झालेली असेल तर कुणाला तार्किक-गणिती बुद्धिमत्ता. कुणाला सांगितिक तर कुणाला शारीर-स्नायुविषयक बुद्धिमत्ता निसर्गाने बहाल केलेली असेल. कुणाला अवकाशविषयक बुद्धिमत्तेचे प्रखर लेणे प्राप्त झालेले असेल तर कुणाला आंतर-व्यक्ती बुद्धिमत्तेचे. कुणी व्यक्ती-अंतर्गत बुद्धिमत्तेने भारलेला असेल तर कुणी निसर्गविषयक बुद्धिमत्तेने प्रेरित असेल. प्रत्येकाला जो काही या विविध बुद्धिमत्तांचा पट प्राप्त होतो, त्यात सर्वच बुद्धिमत्ता असतात, पण त्यांची तीव्रता कमी-अधिक असल्यामुळे, व्यक्ती कोणत्या बुद्धिमत्तेने ओळखली जाईल, किंवा कोणत्या बुद्धिमत्तेच्या अंगाने साऱ्या जगाची ओळख करून घेईल, हे त्या त्या बुद्धिमत्तांच्या तीव्रतेने ठरेल. बुद्धिमत्ता जेवढ्या विविध तेवढे ज्ञानग्रहणाचे किंवा जग जाणून घेण्याचे दृष्टिकोण वेगवेगळे आहेत. पण, एक गोष्ट, आपण शिक्षणातील लोकांना लक्षात घ्यायला हवी की, शालेय वर्गात कुणीही 'ढ' नसतो. एखादा एखाद्या विषयात हुषार असतो तर दुसरा कुठल्यातरी दुसऱ्या विषयात 'ढ' असतो. आणि हा दुसरा, त्याला मिळालेल्या बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात हुषार असतो, तर अन्य कुठल्या तरी बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात 'ढ' असतो. त्यामुळे केवळ विशिष्ट अशाच म्हणजे तार्किक-गणिती नि भाषिक बुद्धिमत्तेच्या आधारावर उभी राहिलेली शिक्षण व्यवस्था काहींना पुढे जायची संधी देते तर ती काहींना मात्र चक्क नाकारते. कारण, या

शिक्षणव्यवस्थेने हे लक्षातच घेतलेले नाही की, प्रत्येकाला म्हणजे प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेला साजेसे असे शिक्षणाचे विविध मार्ग असू शकतात, आणि तसे मिळाले तर प्रत्येकजणच हुषार आहे, प्रत्येकजणच बुद्धिमान आहे.

बर्नार्ड व्हॅन लियर फौंडेशन (द हेग, नीदरलँडस्) या संस्थेने १९७९ साली, 'द हार्वर्ड ग्रॅज्युअेट स्कूल ऑफ एज्युकेशन'ला पाचारण केले ते, माणसात असलेली बीजरूप शक्ती नि तिचा उपयोग, याबाबतच्या शास्त्रीय माहितीच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी. हा अभ्यास 'झीरो प्रॉजेक्ट' या नावाने करण्यात आला. मानवातील अव्यक्त शक्तीबाबत प्रॉजेक्टने विविधांगी दृष्टिकोण स्वीकारला. त्यांनी, इतिहास, तत्त्वज्ञान, सर्व नैसर्गिक व सामाजिक शास्त्रे यांचा धांडोळा घेतला. या प्रकल्पांतर्गत अभ्यासाचा पहिला अहवाल, हॉवर्ड गार्डनर यांनी, आपल्या 'फ्रेम्स ऑफ माईंड' या ग्रंथाद्वारे १९८३ साली प्रसिद्ध केला. यात मुख्यतः माणसाच्या बौद्धिक शक्तीचा विचार करण्यात आला. हा अभ्यास मानसशास्त्रीय मज्जाशास्त्रीय संशोधन, जीवशास्त्रीय संशोधन आणि वेगवेगळ्या संस्कृतींमधील ज्ञानाचा वापर व विकास यांवर आधारलेला आहे. 'फ्रेम्स' मध्ये गार्डनरने, बुद्धिमत्तेच्या पारंपरिक संकल्पनेपासून फारकत घेतली आहे. बुद्धिमत्ता ही एक सर्वसामान्य अशी माणसाची क्षमता असून, ती प्रत्येकाला कमी-अधिक प्रमाणांत लाभलेली असते, ही आजवरची कल्पना नाकारून, गार्डनरने, अशी भूमिका मांडली की, मानवी बुद्धीचा पुरेसा वेध घ्यायचा असेल तर आपल्याला अधिक व्यापक नि सार्वत्रिक अशा मानवी क्षमता विचारांत घ्याव्या लागतील.

गार्डनरने याच ग्रंथात 'बुद्धिमत्ते'ची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. पुढे 'मल्टिपल इंटलिजन्सेस - द थिअरी इन प्रॅक्टिस' या आपल्या १९९३ सालच्या ग्रंथात गार्डनर यांनी आपली व्याख्या सुधारून घेतली. तर पुनश्च १९९९ सालच्या आपल्या 'इंटलिजन्स रिफ्रेम्ड' या ग्रंथात त्यांनी अधिक सुधारित अशी 'बुद्धिमत्ते'ची व्याख्या सादर केली आहे. ''प्रश्न सोडवणुकीसाठी किंवा विशिष्ट संस्कृतीत काही मूल्य असलेल्या अशा वस्तूनिर्मितीसाठी, विशिष्ट संस्कृतीच्या चौकटीत कृतिशील करता येईल अशी, माहितीवर प्रक्रिया करणारी जैव मानसिक बीजरूप क्षमता म्हणजे बुद्धिमत्ता होय.'' अशी ही व्याख्या आहे. म्हणजेच, एक, बुद्धिमत्ता ही जैव-मानसिक अशी बीजरूप क्षमता आहे; दोन, ही क्षमता मिळालेल्या माहितीवर प्रक्रिया करीत असते; तीन, ही प्रक्रिया विशिष्ट संस्कृतीच्या चौकटीत कृतिशील केली जाते; आणि चार, यामुळे, वस्तूनिर्मिती किंवा प्रश्न सोडवणे अशी कार्ये घडून येतात.

गार्डनर यांच्या मते, बुद्धिमत्ता म्हणजे, पाहता येईल किंवा संख्येत मोजता येईल अशी वस्तू नाही; तर ती मेंदूमधील बीजरूप अशी क्षमता आहे. तिला चालना देता येईल किंवा नाही आणि देता येत असेल तर कशी, हे, विशिष्ट संस्कृतीत कशाला महत्त्व आहे यावर, तसेच,

यासाठी कितपत संधी आहेत आणि मुख्य म्हणजे, त्याविषयीचा व्यक्तीचा (अथवा कुटुंबाचा, शिक्षकाचा वा अन्य कोणत्या) निर्णय झाला आहे की नाही, यावर अवलंबून आहे.

गार्डनरच्ये या विविध बुद्धिमत्तांचे आठ प्रकार नमूद केले आहेत, त्यांचा उल्लेख यापूर्वी केलेलाच आहे.

या सिद्धांताचा दावा असा आहे की, प्रत्येक प्रकारची बुद्धिमत्ता ही इतर बुद्धिमत्तांपेक्षा वेगळी असते; मेंदूमधील तिचे स्थान अलग असते. तसेच, एखाद्याला प्राप्त झालेली एखादी बुद्धिमत्ता ही दुसऱ्या कुठल्यातरी बुद्धिमत्तेच्या कौशल्यातून प्राप्त करता येत नाही. मात्र, ज्याला जी बुद्धिमत्ता प्राप्त झालेली असेल ती त्याची सबलता असून तिच्या सहाय्यानेच ती व्यक्ती जगाची ओळख अधिक नेटकेपणाने करून घेऊ शकते. मात्र, एखादे विशिष्ट काम करताना एकाच वेळी अनेक बुद्धिमत्तांचा समन्वय करून ते काम निपटता येईल.

आज, गार्डनर व त्यांचे सहकारी शालेयपूर्व वयातील मुलांच्या बौद्धिक प्रवृत्तींचे मूल्यमापन करण्याच्या नवीन पद्धती नि साधने विकसीत करीत आहेत. त्यांचे गृहित असे आहे की, लहान मुलांच्या व्यक्तिगत बलस्थानांचा (उपलब्ध बुद्धिमत्तांचा) नि उणीवांचा (उपलब्ध नसलेल्या बुद्धिमत्तांचा) अंदाज हा त्यांना खेळताना वा कामात मग्न असताना पाहून, त्यांचे अवलोकन करून घेता येतो. अर्थातच, सर्व प्रकारच्या बुद्धिमत्तांच्या अभिव्यक्तीला वाव मिळेल, त्यांतून त्यांचा कल व्यक्त होईल अशा संपन्न वातावरणातच हे करता येईल. अशाप्रकारच्या प्रयोगांच्या व अभ्यासांच्या आधारे व्यक्तिगत शैक्षणिक संधी नि त्यांचे विविध पर्याय यांना पुढे वाव कसा द्यायचा हे ठरविता येईल, असे गार्डनर यांचे मत आहे. त्यांच्या यासंदर्भातील सर्वच पुस्तकांतून या बहुविध बुद्धिमत्तांच्या सिद्धांताच्या आधारे, कोणत्याही शिक्षण परिस्थितीमध्ये वापरता येईल असा ढाचा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी या सिद्धांताचा विचार मध्यवर्ती ठेऊन, अनेक शाळांमध्ये प्रयोग करून, शिक्षणाच्या अंगानेच सैद्धांतिक नि उपयोजित विचार बांधण्याचा प्रयत्न चालविला आहे.

■■

## मज्जा–मानसशास्त्रीय संशोधन व शिक्षणविषयक तत्त्वे

मेंदूविषयक उपलब्ध संशोधनातील जे तुकडे येथे दिले आहेत, त्यापेक्षाही कितीतरी अधिक प्रमाणात शिक्षणाला उपयुक्त असे संशोधन झाले आहे. त्यातून निदान तीन मुद्दे ठळकपणे जाणवतात.

एक, एकूण शिक्षणात आठ-नऊ वर्षांपर्यंतचे शिक्षण, म्हणजे बालशिक्षण नि प्राथमिक शिक्षण हे स्तर सर्वात जास्त महत्त्वाचे आहेत.

दोन, या वयातील मूल ज्या शाळांतून जात असेल, त्या शाळा शास्त्रशुद्ध पद्धतींनी नि स्वयंशिक्षणाच्या शैक्षणिक साधनांनी संपन्न अशा असाव्या लागतील; आणि

तीन, या वयांतील मुले शाळांपेक्षाही अधिक वेळ घरांशी निगडित असल्यामुळे, घरातील पालकांचे, पाल्यांच्या शिक्षणाविषयीचे शिक्षण आवश्यक आहे. जशा बालकेंद्री शाळा हव्यात, तशी बालकेंद्री घरेही असावी लागतील. आज अडचण अशी आहे की आजच्या कोणत्याही स्तरावरील कोणत्याही प्रकारच्या शिक्षणात, उद्याला पालक म्हणून जी भूमिका जवळजवळ प्रत्येकालाच करायची असते, तिची तयारी करून घेणारी अशी ज्ञान-कौशल्यांची बेगमी पुरविली जात नाही; त्यामुळे पालक प्रबोधन करणाऱ्या 'पालकशाळा' या अनिवार्य आहेत.

मेंदूविषयक संशोधन, बुद्धिमत्तांविषयीचा शैक्षणिक सिद्धांत आणि पियाजेचा मूल कसे शिकते याची प्रक्रिया सांगणारा विचार, यांच्या आधारावर, लहान वयातील शिक्षणाविषयीची काही तत्त्वे येथे मांडता येतील. तसेच या तत्त्वांच्या आधारावर जी नवी शिक्षणरचना आकार घेऊ शकेल तिचेही वर्णन करता येईल.

**शिक्षणविषयक काही तत्त्वे**

१) मेंदूविषयक नव्याने जी जाण आपल्याला आली आहे, त्यावरून एका गोष्टीला नव्याने दुजोरा मिळाला आहे. ती म्हणजे, विशेषकरून बाल्यावस्थेत, ज्ञानसंपादनाच्या प्रभावी प्रक्रियेसाठी 'अनुभवां'चे स्थान फार मोठे, किंबहुना अनिवार्य असे आहे. कृतिशील अनुभव हाच, म्हटले तर, आकलन प्रक्रियेसाठी कळीचा मुद्दा आहे.

२) मेंदूमधील पेशींची विशिष्ट बांधणी किंवा संरचना पुरेशी नाही; तिच्यातील विविध क्षमतांच्या केंद्रांना सतत उत्तेजित ठेवतील असे ज्ञानेंद्रियांचे नि मानस प्रतिमा निर्मितीचे अनुभव, अगदी बालपणापासून देण्याची आवश्यकता आहे. तसे दिले गेले तर क्षमता विकास पावतात. आणि न दिल्यास, म्हणजे वापर न केल्यास त्या क्षमता गळून पडतात.

३) मेंदूचे कार्य एखाद्या यंत्राप्रमाणे होत नाही. त्यातील वेगवेगळी केंद्रे नि त्या केंद्रांची मज्जातंतूंची विशिष्ट जाळी, स्वतंत्रपणे कार्यान्वित होत असतात. आणि त्यातून वेगवेगळ्या बुद्धिमत्तांची किंवा क्षमतांची कार्ये चालू राहतात. त्यामुळे, एखादी मुलगी किंवा मुलगा विशिष्ट बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात तेज आढळेल तर दुसऱ्या कुठल्या क्षमतेच्या बाबतीत मंद असलेला जाणवेल.

४) काही विशिष्ट क्षेत्रातील लहान वयातील कृतिशीलता इतर क्षेत्रांची कार्यक्षमता दुणावणारी ठरू शकेल. याबाबत अजून अभ्यास होणे गरजेचे असले तरीही एक गोष्ट, सामान्यपणे

सिद्ध झाली आहे ती अशी की, बालकांना लहान वयात संगीताचे धडे दिले, एखादे वाद्य वाजवायला प्रवृत्त केले तर या सांगितिक अनुभवांचा चांगला परिणाम इतर बुद्धिमत्तांच्या विकासाबाबत दिसून येतो.

५) भावनिक विकासाचे स्थान बालशिक्षणात महत्त्वाचे मानले पाहिजे. प्रेममय, सौहार्दाची वागणूक, सहकाराची भावना, परस्परांच्या भावनांशी एकरूप होणे, सहानुभूती, करुणा या गोष्टींचा मन:पटलावर होणारा परिणाम दीर्घकालीन असतो. साधारणपणे, दहा बारा संख्येपर्यंतच्या मुलांच्या गटातच अशा प्रकारचा भावनिक विकास प्रभावीपणे साधता येतो.

६) सर्वच मुले विकासाच्या विविध टप्प्यांमधून अनुक्रमाने जात असली तरीही, त्यासाठी त्यांना विकासानुरूप अनुभवांचा पुरवठा करावा लागतो, शिवाय वेगवेगळी मुले विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर असताना, त्यांना द्यावयाचे अनुभव वेगवेगळे असावे लागतात.

७) प्रत्येक बालकाला उपजत लाभलेल्या बुद्धिमत्तांचा पट वेगवेगळा असतो, आणि त्यांचा शोध घेणे हे वयाच्या सातव्या - आठव्या वर्षापर्यंत शक्य असते. ज्याला ज्या बुद्धिमत्ता तीव्रतेने प्राप्त झालेल्या असतात, त्या क्षेत्रात काम करण्याचा त्याचा कल असतो, त्यात त्याला गती असते आणि रसही असतो.

८) लहान वयातच मुलांच्या सबलता नि निर्बलता ओळखणे फायद्याचे असते. सबलता ओळखून त्यानुसार त्याला कोणत्या प्रकारच्या अनुभवांची विशेष गरज आहे हे ठरवता येते, तर दुर्बलता माहीत झाल्याने, आवश्यक तर त्यांवर वेळीच उपाययोजना करता येते.

९) शाळांतील एकच अभ्यासक्रम, एकाच पद्धतीने, एकाच वेळी सर्व विद्यार्थ्यांना शिकविणे, आणि त्या सर्वांचे एकाच वेळी, एकाच पद्धतीने मूल्यमापन करणे, ही गोष्ट विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी आहे. तीत परिवर्तन करून, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करायचे असेल तर शिक्षणाचे व्यक्तिविशिष्टीकरणही करावे लागेल.

१०) मूल संस्कृतीच्या विकासाच्या ज्या टप्प्यावर या जगात प्रवेश करते, त्या टप्प्यापर्यंतच्या संचित अशा सांस्कृतिक बाबींचा लाभ आपसुखच त्याला मिळतो. तसेच, जन्मापासून विस्तारत जाणारे संबंधित व्यक्तींचे जग, बालकाच्या आकलन प्रक्रियेत महत्त्वाचा वाटा उचलत असते.

११) बालकाचे आजचे शिक्षण हे त्याच्या उद्यासाठीचे शिक्षण असते. त्यामुळे ते त्याच्या

भावीकालाशी जोडलेले असते. बालकाच्या निसर्गदत्त बुद्धिमत्ता, आणि भावीकालातील त्याच्या अपेक्षित गरजा नि बदलती परिस्थिती यांचा मेळ घालूनच व्यक्तीशिक्षणाचा विचार करणे शक्य होते.

१२) शेवटी, फ्राईडने म्हटल्याप्रमाणे, हेही ध्यानात ठेवले पाहिजे की, बाल्यावस्थेतील पहिली पाच वर्षे बालकाच्या भावी आयुष्यावर निर्णायक परिणाम करणारी असतात; आणि नंतरच्या काळातील विरोधी घटनाही त्यात फारसा बदल करत नाहीत. बालशिक्षणाचा आजवरचा इतिहासही हेच सांगत आला आहे.

या सर्वसामान्य तत्त्वांच्या आधारावर जी शिक्षणाची पद्धती साकल्याने ठरते तिला रचनावादी शिक्षणपद्धती असे म्हटले जाते.

शिक्षण ही रचनावादी कृती आहे, हा रचनावादी शिक्षणपद्धतीचा गाभा आहे; तर मूल आपले आपण शिकत असते, हे संशोधनातून निघालेले जे सारभूत तत्त्व ते या शिक्षणविषयक दृष्टिकोनाचे गृहित आहे. मूल प्रौढांपेक्षा वेगळे असते, आणि म्हणून त्याची शिकण्याची धाटणीही वेगळी असते; अमूर्तापेक्षा मूर्त गोष्टींद्वारे शिकणे तसेच ऐकून शिकण्यापेक्षा पाहून नि करून शिकणे ही त्याच्यासाठी अधिक उपयुक्त ठरणारी पद्धती असते. अशा तऱ्हेच्या शिकण्यातून मुले जगाची ओळख करून घेत असतात; आशय शोधीत असतात. त्यामुळे ज्या ज्या अनुभवांचा आशय मुले शोधू पाहत आहेत अशा, त्यांच्या परिचयातील, त्यांच्या परिसरातील गोष्टींपासून शिकण्याची सुरुवात व्हावी लागते. स्वत:चा आशय स्वत:च निर्माण करणे, हा प्रत्येकाचा शिकण्याचा हेतू असतो; त्यामुळे दुसऱ्याने निर्माण केलेला आशय पढवून किंवा पाठ करून परिणामकारक शिक्षण होत नाही. शिक्षकाचे कार्य असे मुलांना पाठ करायला लावून शिकविण्याचे नाही. शिक्षकाने, विविध घटनांमधील परस्पर संबंध शोधण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त केले पाहिजे. त्यासाठी अर्थातच, शिक्षकाने आपल्या रूढ पद्धतीत बदल करून, मुलांना बोलायला, अभिव्यक्त करायला, स्पष्टीकरण करायला, विचार करायला, विश्लेषण करायला, अंदाज करायला शिकविले पाहिजे. तशा संधी शाळांतून निर्माण केल्या पाहिजेत. शिक्षण ही व्यक्ती-अंतर्गत घडून येणारी प्रक्रिया असल्यामुळे मूल्यमापन हाही शिकण्याच्या प्रक्रियेचाच भाग असला पाहिजे. त्यानेच शिक्षणाचे यथार्थ मोजमाप होऊ शकते; विद्यार्थ्याला आपल्या शिक्षणाचा दर्जा नि पायरी कळायला त्याने मदत होते. रचनात्मक शिक्षणपद्धतीत मुख्य भर आहे तो विद्यार्थ्यांवर. शिक्षकावर नाही. शिक्षक हे येथे सहाय्यकाच्या भूमिकेत असतात. ते केवळ विद्यार्थ्यांना प्रश्नांचा शोध घ्यायला नि संकल्पनांचे ज्ञान मिळवायला उद्युक्त करतात, प्रेरणा देतात.

शिक्षणाविषयीचा हा अलीकडच्या काळात बदललेला दृष्टिकोण हा आपल्याला अधिक चांगल्या शिक्षणाकडे घेऊन जाणारा आहे; किंबहुना आता शिक्षणात परिवर्तन करून वर्तनवादी

दृष्टिकोणाच्या जागी रचनावादी दृष्टिकोण अंगिकारल्याशिवाय आपण आजच्या शालेय शिक्षणाकडून फारशा अपेक्षा करू शकणार नाही.

■■

आत्तापर्यंत येथे मांडलेली भूमिका अशी आहे की, वर्तनवादी दृष्टिकोणातून अस्तित्वात आलेली शिक्षणपद्धती - शिक्षणव्यवस्था बदलून तिच्या जागी, रचनावादी दृष्टिकोणातून मांडली गेलेली, आणि जिला बळकट मानसशास्त्रीय-मज्जाशास्त्रीय संशोधनांचा आधार आहे अशी शिक्षणपद्धती-शिक्षणव्यवस्था, आणली पाहिजे. शालेय पातळीवरील शैक्षणिक परिवर्तनाचा हा अर्थ आहे. असे संपूर्ण शिक्षणाकडे पाहण्याचे परिप्रेक्ष्य बदलले तर आपण आजच्याच शैक्षणिक प्रश्नांकडे, म्हणजे त्यांच्या सोडवणुकीकडे वेगळ्या अंगाने पाहू शकतो.

या भाषणासाठी जो मर्यादित विषय मी समोर ठेवला आहे, त्या, मुलांच्या सुमारे चौदा वर्षांपर्यंतच्या शिक्षणाच्या म्हणजे बालशाळा नि प्राथमिक शाळांच्या संदर्भात असणाऱ्या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध आपण घेण्यासाठी, या नवसंशोधनाधारित दृष्टिकोणातून पाहू या. मला ठळकपणे जाणवणारा बालशिक्षणाविषयीचा प्रमुख प्रश्न असा, की अजूनही हे शिक्षणक्षेत्र आणि त्याचे मानवीजीवनात असलेले पायाभूत महत्त्वच सामान्यपणे समाजाला माहीत नाही. तर प्राथमिक शिक्षणातील तीन प्रश्न सर्वात महत्त्वाचे आहेत. ते म्हणजे, मुलांना शाळेत 'येती' करण्याचा प्रश्न, आल्यावर तेथे सतत काही वर्षे 'टिकती' करण्याचा प्रश्न आणि टिकल्यानंतर त्यांना 'शिकती' करण्याचा प्रश्न. हे तीनही प्रश्न एकत्रितरित्या सुटण्याचा मार्ग आत्तापर्यंत वर्णन केलेल्या रचनावादी दृष्टिकोणातून केलेल्या शिक्षणातून प्राप्त होऊ शकतो. हे आणि याच्या अनुषंगाने उद्भवलेले प्रश्न अधिक सविस्तरपणे विचारात घ्यायला हवेत.

## बालशिक्षण विषयक प्रश्न

बालशिक्षणाबाबतचा मूलभूत आणि सार्वत्रिक स्वरुपाचा प्रश्न असा की बालशिक्षणाच्या शास्त्रशुद्धतेचा आणि दर्जाचा आग्रह धरणारे असे कोणतेच धोरण आज अस्तित्वात नाही. बहुसंख्य बालशाळा या प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमच खाली ओढून, ज्या वयात जे आणि ज्या पद्धतीने मुलांनी शिकू नये ते (अभ्यासक्रम) आणि त्या (औपचारिक) पद्धतींनी शिकण्याचेच बहुसंख्य बालकांच्या नशिबी येत आहे आणि त्यामुळे, मुलांचे चक्क नुकसान केले जात आहे. शासनाच्या, शाळांच्या, शिक्षकांच्या या अज्ञानकटात पालकही फशी पडत आहेत. वास्तविक, एकीकडे, या ज्ञानक्षेत्रात नेमके शास्त्रीय शिक्षण आणि त्यासाठी लागणाऱ्या उपयुक्त शिक्षण पद्धती व साधने सहज उपलब्ध आहेत. तर दुसरीकडे, या सर्वांपासून फारकत असणारा समाज या ज्ञानजलापासून वंचित राहत आहे. हे शिक्षण सर्वच बालकांपर्यंत कसे पोचवावे हा पहिला प्रश्न आहे, तर शाळांना शास्त्रीय रूप कसे द्यावे, शिक्षकांना प्रशिक्षणाचे महत्त्व कसे

पटवून द्यावे आणि पालकांना, चांगले बालशिक्षण म्हणजे काय असते याचे बाळकडू कसे पाजावे हा, बालशिक्षण चळवळी समोरचा आणखी एक प्रश्न आहे. कारण, हा प्रश्न सोडविण्यासाठी लागणारे कार्यकर्त्यांचे आणि समाजजागृतीचे बळही अलीकडेच उभ्या राहिलेल्या चळवळीकडे नाही.

### *बालशिक्षणाकडे दुर्लक्ष*

भारतात आणि महाराष्ट्रातही बालशिक्षणाच्या शास्त्राकडे जवळजवळ पूर्णत: दुर्लक्ष होत असले तरी त्याचा एकूण इतिहास मात्र खूपच मोठा आहे.

सहा - सात वर्षांपर्यंतचे बालकांचे वय हे केवळ संवेदनशील असते, ते परावलंबी असते इतकेच महत्त्वाचे नाही तर ते आयुष्यभरच्या तयारीचे सर्वात महत्त्वाचे वय असते, याची प्रखर जाणीव, इतिहासात, अनेक शिक्षणतज्ज्ञांनी दिलेली आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी, प्लेटोने असे म्हणून ठेवले आहे की, अल्पवयीन मुलांना खास प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तींच्या हाती सोपवून, त्यांचे घराबाहेर शिक्षण करावे. सहा वर्षाच्या आतल्या मुलांना औपचारिक शिक्षण न देता अनौपचारिक पद्धतीने कृतिशील संधी देऊन त्यांचे शिक्षण करावे असे कोमेनिअसनेही (इ.स.१५९२ ते १६७०) म्हणून ठेवले आहे. अशाच कृतिशील शिक्षणाचा आग्रह लॉकनेही (इ.स.१६३२-१७०४) धरला आहे. मुलाला बालशिक्षणात केंद्रस्थानी मानण्याचा सल्ला रुसोने (१७१२-१७७८) दिला आहे. प्रयोगशील पॅस्टॉलॉझी (१७४६-१८२७), मुले आपली आपण शिकत असतात नि त्यांना 'यत्न-प्रमाद' पद्धतीने शिकू द्यावे असा धडा आपल्याला देतो. तर त्याच्याच काळातील तत्त्वचिंतक कांट (१७२४-१८०४) मुलांच्या शिक्षणात मुलाचे 'मूलपण' लक्षात ठेवण्याचा सल्ला देतो. पॅस्टॉलॉझीच्या प्रयोगातून प्रेरणा घेऊन रॉबर्ट ओवेन (१७७१-१८५८) आपल्या कारखान्यातील मुलांसाठी 'बालकेंद्री' शाळा काढतो, तर पॅस्टॉलॉझीचा दुसरा प्रत्यक्ष शिष्य फ्रेडरिक फ्रोबेल (१७८२-१८५२) मुलांच्या उपजत प्रवृत्तींना वळण देऊन नि निर्मितीक्षमतेला वाव देऊनच त्यंचा विकास करता येतो, असे ठामपणे प्रतिपादन करतो. एवढेच नव्हे तर यासाठी प्रत्यक्ष शैक्षणिक साधनेही विकसीत करतो. मादाम मॉंटेसोरी (१८७०-१९५२) या तर शास्त्रीय बालशिक्षणाचे पूर्ण तत्त्वज्ञानच आपल्या हाती देतात. तसेच बालशिक्षणाचा शास्त्रीय व्यवहारही, त्याच्या बारकाव्यांसह नि साधनांसह मांडून देतात. आणि बालशिक्षणाच्या या दिग्गजांनी मांडलेल्या सिद्धांतांना अलीकडच्या काळातील मानसशास्त्र आणि मज्जाशास्त्र शास्त्रीय आधार पुरवून बळकटी आणतात.

सहा-सात वर्षांपर्यंतच्या बालकांचे शिक्षण अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने पण भारतीय संस्कृतीला साजेसे असे देण्यासाठी गिजुभाई बधेका (१८८५-१९३९) आणि ताराबाई मोडक (१८९२-१९७३) यांनी कार्य आरंभले आणि अर्धशतकापेक्षाही अधिक काळ त्याचा पाठपुरावा

केला. त्याचा प्रसार-प्रचार केला. (ताराबाई मोडक यांनी १९३३ साली सुरु केलेले शिक्षणपत्रिका हे मासिक अखंडपणे आजही चालू आहे. हे त्याचे एक्काहत्तरावे वर्ष आहे !) त्यांचा वारसा घेऊन आजही काही सेच्छाकार्य संस्था शास्त्रीय शिक्षणाचा आग्रह धरून प्रयोग, प्रशिक्षण, प्रसार, प्रकाशने आणि प्रत्यक्ष चळवळ (महाराष्ट्र बालशिक्षण परिषद) या मार्गांनी शास्त्रीय बालशिक्षण जनमानसात आणि शिक्षणव्यवहारात उतरवू पाहात आहेत.

भारतात शिक्षणावर प्रामुख्याने सरकारचा कब्जा असला तरी अजूनपर्यंत शास्त्रीय बालशिक्षणाचा विचार आणि त्यावर आधारीत असा व्यवहार यांपासून सरकार अनेक योजने दूरच आहे. एवढेच नाही तर सरकारची गतीच उलटी आहे. भारतीय राज्यघटनेत पंचेचाळीसाव्या कलमात मोफत नि सक्तीचे शिक्षण देण्याची सूचना ही १४ वर्षांपर्यंतच्या मुलांबाबत आहे म्हणजे, यात सहा वर्षांपर्यंतचे बालशिक्षाचे वय अनुस्युत आहे. पण, अलीकडेच घटनादुरुस्तीने फक्त ६ ते १४ या वयोगटाला शिक्षणाचा मूलभूत हक्क देण्याचा विचार केला गेला, आणि अगदी निर्दयपणे, सहा वर्षांपर्यंतचे वय दुर्लक्षित केले आणि घटनेतूनही वगळण्यात आले. शासनाला शिक्षण कळत नसल्याचा हा गंभीर दाखला.

लॉर्ड कर्झन हा एकमेव व्हाईसरॉय असा होता की त्याने बालशिक्षणाचे महत्त्व ओळखून आपल्या कारकिर्दीत फ्रोबेलचे विचार आणि फ्रोबेलच्या शिक्षणपद्धती शाळा-शाळांतून आणण्याचा प्रयत्न शतकापूर्वी केला होता. सरकारला बालशिक्षणाचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न तर, भारतात आजवर निर्माण करण्यात आलेल्या जवळजवळ प्रत्येक शिक्षणविषयक समितीने केला आहे. राज्यसभेचे एक सदस्य वि.सी.सरवटे यांनी ऑगस्ट १९५५ मध्ये राज्यसभेत बालशिक्षण संबंधात ठराव आणला होता. यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात तर असे म्हटले होते की, ''आपल्या देशातील अज्ञान व दारिद्र्य या गोष्टी लक्षात घेता इतर देशांपेक्षाही येथे पूर्व प्राथमिक शिक्षण देणे अत्यंत जरुरीचे आहे.'' सार्जंट समितीचा अहवाल (१९४४), जे.पी.नाईक एकसूत्रीकरण समिती (१९५८-६०), बालसंगोपन समिती अहवाल (१९६१-६२), केंद्रीय शिक्षण - कोठारी आयोग (१९६४-६६), गंगाशरण समिती (१९६८), शैक्षणिक साधने निर्मिती कृतिगट (१९६७-६९), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६), शालेय शिक्षण सुधार समिती (१९८४-८६), पंचायतराज मूल्यमापन समिती (१९८६), राममूर्ती आयोग (१९९०), प्राथमिक शिक्षण आयोग (१९९०), प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण कार्यगट अहवाल (१९९२-९३), यशपाल समिती (१९९२-९३). या सर्व समित्यांनी भारतात बालशिक्षमाचे असलेले महत्त्व विशद केले आहे, आणि त्यासाठी शिफारसी केल्या आहेत.

जून १९५७ मध्ये नियुक्त केलेल्या 'पाणंदीकर' समितीने तर, चार खूपच महत्त्वाच्या शिफारसी केल्या होत्या.

१. बालशिक्षणासाठी एक स्वतंत्र बोर्ड असावे.

२. बालशिक्षणातले तज्ज्ञ आणि शासकीय पर्यवेक्षक यांनी संयुक्तपणे बालशाळांची तपासणी करावी.

३. ग्राह्य खर्चाच्या ३३.५० टक्के अनुदान बालशाळांना दिले जावे.

४. पूर्व प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षण केंद्राचा दर्जा प्राथमिक प्रशिक्षण केंद्राच्या समान असावा.

या आणि अशा प्रकारे सर्वच समित्यांनी बालशिक्षणाबाबत त्याचे महत्त्व सांगून त्याविषयी शिफारसी केलेल्या आहेत. परंतु सरकारने नेहमीच त्या दुर्लक्षिल्या आहेत.

### *महाराष्ट्र शासन व बालशिक्षण*

महाराष्ट्रात बालशिक्षणासाठी सरकारला अनुकूल करून घेण्याचे काही ठळक प्रयत्न झाले आहेत.

ताराबाई मोडक यांनी जानेवारी १९५२ मध्ये, तत्कालीन मुंबई राज्याच्या विधानसभेत बालशिक्षणविषयक ठराव आणण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. १९५० ते १९५७ या काळात, सरकारमान्य असा बालअध्यापन शिक्षणक्रमही अस्तित्वात होता. पुढे तो बंद करण्यात आला. त्यानंतर थेट १९९५ पर्यंत महाराष्ट्रात बालशिक्षणाविषयी शासकीय स्तरावर अज्ञान व अनास्था यांचा मिलाफ झाला होता.

नोव्हेंबर १९९४ पासून, महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या रूपाने 'शास्त्रीय बालशिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा'चा आग्रह धरणारी चळवळ महाराष्ट्रात सुरू झाली. शासनाने बालशिक्षणात लक्ष घालावे अशा आशयाच्या ठरावाला, तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी त्वरीत प्रतिसाद देऊन, प्रा.राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली 'राज्यस्तरीय बालशिक्षण समिती'ची नियुक्ती केली. समितीने आपला अहवाल जानेवारी १९९६ मध्ये महाराष्ट्र सरकारला सादर केला; आणि तो पूर्णत: स्वीकारत असल्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी केली. फार पूर्वी, म्हणजे जून १९५७ मध्ये नियुक्त केलेली पाणदीकर समिती आणि १९५८ ची जे.पी.नाईक समिती, या दोन्ही समित्यांनी राष्ट्रातील बालशिक्षणाची दिशा सांगणारी तीन सूत्रे देऊन ठेवली होती.

१. बालशिक्षणाच्या संदर्भात, शासनाने मार्गदर्शकाची भूमिका घ्यावी आणि तिच्या अमलबजावणीसाठी एक स्वतंत्र मंडळ निर्माण करावे;

२. बालशिक्षणाचे, म्हणजे बालशाळा चालविण्याचे आणि शिक्षकवर्ग तयार करण्यासाठी प्रशिक्षण संस्था चालविण्याचे काम खाजगी संस्थांकडे असावे.

३. शासनाने, खाजगी संस्थांना बालशिक्षणासाठी उदार अनुदाने द्यावीत.

हीच तीन सूत्रे प्रमाण मानून राम जोशी समितीने आपल्या पंधरा शिफारसी केल्या आहेत. मात्र शासनाने हा अहवाल कधीही प्रसिद्ध केला नाही.

तरीही शासनाने एक गोष्ट केली. या अहवालातील फक्त एका शिफारसीच्या म्हणजे बालशाळेतील प्रवेशाविषयीच्या शिफारसीच्या आधारे, आधी अध्यादेश काढला आणि मग त्याचे रूपांतर एप्रिल १९९७ मध्ये कायद्यात केले. शालेयपूर्व शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या मुलाखती घेण्यास बंदी, त्यावर आधारीत देणग्यांना बंदी, प्रवेशासाठी शाळेजवळच्या विद्यार्थ्यांना अग्रक्रम आणि कोणत्याही प्रकारच्या पुस्तकांच्या सक्तीला बंदी असे या कायद्याचे विशेष होते. अशाप्रकारे अपुरा का होईना - पण बालशिक्षणविषयक कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य होते. परंतु, शासन याबाबत ठाम कधीच नव्हते. शासनाने पुढल्याच वर्षी म्हणजे एप्रिल १९९८ मध्ये हा कायदा एक वर्षासाठी स्थगित केला; १९९९ साली पुन्हा एक वर्षासाठी या स्थगितीला मुदतवाढ दिली. तदनंतर २००० साली तर, हायकोर्टात या कायद्याविषयीचे प्रकरण असतानाच, आपण केलेला कायदाच मागे घेतला; रद्द केला. महाराष्ट्र शासनाला बालवयातील शिक्षणाचे महत्त्व नाही की, लाखो ग्रामीण विद्यार्थ्यांना शास्त्रीय बालशिक्षण प्राप्त होऊ न देण्याचा हा डाव आहे, हेच कळत नाही.

### *बालशिक्षण नसलेल्या अंगणवाड्या*

केंद्र सरकारच्या 'एकात्मिक बालविकास सेवा योजने' अंतर्गत, महाराष्ट्रात दीड-दोन लाख अंगणवाड्या उघडण्यात आल्या आहेत. आणखी कितीतरी उघडल्या जात आहेत. शासनाचा दावा असा आहे की या अंगणवाड्या आरोग्य सेवांबरोबरच, नि पोषक आहाराबरोबरच सकस बालशिक्षणही बालकांना देतात. आणि म्हणूनच शासनाने आणखीही एक उफराटे पाऊल टाकले आहे ते म्हणजे अंगणवाड्या उघडल्यामुळे, त्या त्या भागातील बालवाड्या बंद होतील हे पाहण्याचे.

समाज परिवर्तनाच्या चळवळीत अग्रभागी असणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना मी जाहीरपणे सांगू इच्छितो की, अंगणवाड्या या बालकांचे शास्त्रीय बालशिक्षण करीत नाहीत. सरकारचा तसा दावा असेल तर तो केवळ शासकीय 'फसविण्याचा धंदा' आहे, हे लक्षात घ्यावे. राम जोशी समितीने, शास्त्रीय बालशिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या किमान गोष्टींची मांडणी करून दिली आहे. उदाहरणार्थ,

१. रामजोशी समितीने बालशिक्षण करणारी शिक्षिका किमान शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि एक वर्षाचे प्रशिक्षण झालेली असावी, असे म्हटले आहे. याउलट, अंगणवाडी सेविका मात्र याहूनही अल्प शिक्षण असलेली आणि काहीही सेवापूर्व शिक्षण नसलेली अशी चालते.

२. अंगणवाडी सेविकांना ७२ दिवसांचे सेवांतर्गत शिक्षण केव्हा तरी दिले जाते. या शिक्षणासाठी केलेल्या एकूण तासांच्या (४३२) विभागणीत बालशिक्षणाला फक्त ८३ तास मिळतात. (राम जोशी समितीने सुचविलेला किमान निकष १३९६ तासांचा आहे !)

३. या सेवांतर्गत शिक्षणात प्रात्यक्षिकांसाठी ६८ तास मुक्रर केलेले आहेत. (रामजोशी समिती सूचना किमान ७२५ तासांची आहे !) परंतु, अशा प्रात्यक्षिकांसाठी, शासकीय प्रशिक्षण केंद्राकडे स्वत:च्या बालवाड्याच नाहीत. स्वत:च्या 'प्रयोगशाळा'च नाहीत.

४. याहूनही गंभीर बाब अशी की अंगणवाडी प्रशिक्षण केंद्रांमधून नेमलेल्या अध्यापकांमध्ये बालशिक्षणाचा माहीतगार कोणीच नसतो, आणि तशी तरतूदही केलेली नाही.

अंगणवाड्या या प्रामुख्याने शहरी झोपडपट्ट्या आणि ग्रामीण विभागात काढल्या जातात. म्हणजे गरीब, मागासलेल्या आर्थिक-सामाजिक गटांतील मुलांना त्यांचा लाभ मिळावा असा हेतू असतो. आरोग्यविषयक कार्यही बऱ्यापैकी, या अंगणवाड्यांकरवी केले जाते, परंतु पायाभूत असे बालशिक्षण करण्याची क्षमता मात्र या अंगणवाड्यांमध्ये नसल्यामुळे, पुन्हा वंचित मुलांचेच नुकसान होते. शहरी, उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय, सुशिक्षित समाजातील मुलांसाठी दर्जेदार बालशिक्षणाची सोय, केजी, मॉंटेसोरींच्या रूपाने खाजगीरित्या अस्तित्वात आहे. या बालशाळा बंद करुन त्यांनाही अंगणवाड्या देण्याची शामत शासनात नाही. परिणामत: श्रीमंत नि गरीब या दोन समाजगटांमधील बालकांच्या शिक्षणातील विषमता कमी होण्याऐवजी वाढतच आहे. ही शैक्षणिक विषमताच, पुढे, सामाजिक-आर्थिक विषमतेत परावर्तीत होत असते. त्यामुळे मागासविद्यार्थ्यांवर होणाऱ्या याही अन्यायासाठी न्यायालयांकडे दाद मागावी लागणार आहे काय ?

## प्राथमिक शिक्षणविषयक प्रश्न

आज शाळा-कॉलेजांतून जे शिकवले जाते त्याला 'शिक्षण' म्हणण्याची प्रथा आहे. आणि हे तथाकथित शिक्षण गतिरुद्ध झाले आहे अशी आपली खंत आहे. शिक्षणाकडे रचनावादी दृष्टिकोणातून पाहिले की लक्षात येते, की शिक्षणाचा पाया मानसशास्त्र हा आहे; आणि म्हणून मानसशास्त्राला आधारभूत असलेली शरीरविज्ञान आणि मज्जाशास्त्र म्हणजे मेंदूविषयक शास्त्रे ही शास्त्रेही शिक्षणाचा पाया ठरवत असतात नि संशोधनानुरूप त्यात बदलही करीत असतात. यामध्ये व्यक्तीने 'कसे शिकावे', याची दिशा हे सारे संशोधन देते आणि म्हणून ते महत्त्वाचे आहे. पण 'काय शिकायचे' म्हणजेच शिक्षणाचा आशय काय असावा ही गोष्ट मात्र समाजजीवनाशी निगडीत असते. म्हणजे असे की शिक्षणाला-स्वयंशिक्षणाला लागणारे अनुभवविश्व हे समाजवास्तवातून येत असते; यावे लागते. एवढेच नव्हे, तर समाजवास्तवाशी

जुळवून घेऊन जगण्याची क्षमता शिक्षणाने द्यायची असते. हे समाजवास्तव मात्र आजचे नव्हे तर उद्याचे (अपेक्षित) वास्तव असते; आणि या अर्थाने शिक्षणाचा आशय हा भाविकालाभिमुख असावा लागतो. म्हणजे पुन्हा असे की वर्तमान समाजवास्तव आणि भविष्यकालीन समाजवास्तव या दोन्हींनी शिक्षणातील आशयाला दिशा मिळत असते. (शिक्षणाचे हे जे दुहेरी संबंध आहेत, त्यांना शिक्षणाची 'सेंद्रीय रचना' असे म्हणता येईल !)

शिक्षणाचे एवढेच कार्य असते तर शिक्षणात तात्कालिक गरजांनुसार सुधारणा करीत करीत आपण ते जीवनाशी सुसंगत ठेऊ शकू; किंबहुना म्हणूनच, १९४४ च्या सार्जंट समितीपासून ते १९६४-६६ च्या कोठारी कमीशनपर्यंत आणि नंतरच्या १९८६ शैक्षणिक धोरणापर्यंतच्या सर्वच समित्यांनी अशा सुधारणा सुचवत सुचवतच शिक्षण काही प्रमाणात प्रवाही ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून वेळोवेळी, शिक्षणात सर्वच स्तरांवर काही ना काही बदल होत गेले, पण ते पुरेसे गतिमान झाले नाही.

*शिक्षणाची गतिरुद्धता*

गतिमानता हा शिक्षणाचा एक अविभाज्य गुण आहे; असायला हवा. एकीकडे विविध शास्त्रीय संशोधनाच्या सिद्ध गोष्टींना आत्मसात करीत शिक्षणाने आपल्या पद्धतीत बदल करीत गेले पाहिजे. तर दुसऱ्या बाजूला बदलत्या सामाजिक वास्तवाच्याच दिशेने नव्हे, तर सामाजिक वास्तव बदलण्याच्या दिशेने आपली आगेकुच वेगाने केली पाहिजे. गेल्या साठ वर्षांत आपल्या देशातील शिक्षणात वेळोवेळी बदल होऊनही ते परिणामत: गतिरुद्ध राहिले आहे. याचे कारण आता आपल्या हाती येऊ शकेल. आजच्या शिक्षणाने आपली गती ना पायाभूत अशा शास्त्रीय संशोधनाशी मिळती-जुळती ठेवली आहे, ना ती, एक समाज म्हणून असलेल्या (आणि बदलत्या) समाजगरजांशी मिळती-जुळती राहून समाजपरिवर्तनासाठी सज्ज झाली आहे.

शिक्षित होणे याचा अर्थ आजूबाजूच्या जगाचा शोध घेण्याचे, आणि त्याचबरोबर जरुर तर ते बदलण्याचे सामर्थ्य प्राप्त होणे अशा तऱ्हेने व्यक्तीला शिक्षित करणे, ज्या शिक्षणाला जमत नाही ते गतिरुद्ध शिक्षण आहे, अशी माझी गतिरुद्ध शिक्षणाची व्याख्या आहे.

ही गतिरुिद्ध शिक्षणव्यवस्था टिकण्याची नि दिवसेंदिवस अधिक घट्ट होण्याचे कारण अगदी स्पष्ट आहे आणि ते म्हणजे ही व्यवस्था अनेकांना अत्यंत सोयीची आहे. उदाहरणार्थ, सरकारला ती सोयीची आहे. कारण, त्यातून सरकारला आव्हाने निर्माण होण्याच्या शक्यता दुरावतात. ही व्यवस्था खाजगी शिक्षणसंस्थांना सोयीची आहे कारण, ती चालवण्यासाठी कोणतीही बौद्धिक, वैचारिक किंवा प्रयोगात्मक गुंतवणूक करावी लागत नाही. ती शिक्षणसंबंधित दोन्ही महत्त्वाच्या घटकांना म्हणजे शिक्षक आणि पालक यांना सोयीची आहे. शिक्षकांची सोय अशी आहे की ती विलक्षण अल्पश्रमी आहे; आणि पालकांना पाल्यांच्या शिक्षणाबाबत कोणतीही

दैनंदिन जबाबदारी पार पाडावी लागत नसल्यामुळे, ती पालकांनाही सोयीची आहे. ती बहुसंख्य विद्यार्थ्यांनाही सोयीची ठरत आली आहे, कारण, ती परीक्षांसाठी, परीक्षांपुरता, आणि केवळ अल्पकालच स्मृतीत ठेवण्याचा अभ्यास करण्याची अपेक्षा विद्यार्थ्यांकडून करते. तरीही ही व्यवस्था याच समाजात कुणाला तरी सोयीची नाही, याचे भान आपण ठेवले पाहिजे. ही व्यवस्था आयुष्यभर गुलाम म्हणून जगू पाहणाऱ्यांना सोयीची खचितच आहे. ती सोयीची नाही ती, स्वतंत्र विचारशक्ती, नेमकी विवेकशक्ती आणि खमकी संघर्षवृत्ती मिळवू पाहणाऱ्या अशा सुजाण नागरिकाला. बारकाईने पाहिल्यास असेही लक्षात येईल की ही आजची गतिरुद्ध शिक्षणव्यवस्था आणखीही कुणाकुणाला आजच विलक्षण गैरसोयीची आणि म्हणून निरुपयोगी ठरत आहे.

सर्वच स्तरांवरील वार्षिक परीक्षांमधून नापास हे बिरुद प्राप्त करणाऱ्या वीस टक्क्यांपासून पन्नास ते साठ टक्क्यांपर्यंतच्या विद्यार्थ्यांना ही व्यवस्था सोयीची नाही. केवळ गणिती नि भाषिक बुद्धिमत्तांच्या पल्याड असणाऱ्या विविध बुद्धिमत्ता उपजत असणाऱ्या असंख्य 'हुशार' पण तशी मान्यता नसलेल्या विद्यार्थ्यांना. त्याचबरोबर ज्यांना प्रवाहाबरोबर वाहायचे नाही अशा धडपड्या मुलांना. आणि ज्यांचे आयुष्य पिढ्यान्‌पिढ्या विविधांगी शोषणांनी झाकोळलेले आहे अशा समाजगटांच्या नवजात पिढीला, ही व्यवस्था सोयीची नाही; आणि म्हणून (त्यांच्यासाठी) आपण ती नाकारली पाहिजे.

### *परिवर्तनाला धोका*

आज फार मोठा प्रयत्न होतो आहे तो, आजच्या समाजातील 'सोयवाला गट' हा 'गैरसोयवाल्या गटा'ला आपल्यात ओढण्याचा प्रयत्न करतो आहे; आणि ही गोष्ट मला फार धोक्याची वाटते आहे. कारण, त्याने शिक्षणातील परिवर्तनाची शक्यताच दुरावणार आहे. समाजातील उघड आणि प्रच्छन्न अशी गुलामीची अवस्था टिकण्याचा धोका त्यात आहे आणि एकसंध, न्यायी, संपन्न समाजाचे चित्र धूसर होण्याचा धोकाही आहे.

### *असा प्रयत्न कोण करीत आहे ?*

यात पहिला मान द्यायचा तो सरकारला. आज शिक्षणाचा हक्क सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न असो, त्यासाठी सर्वशिक्षा अभियान असो, पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचे गाजर असो, वस्तीशाळांचा वा महात्मा फुले हमी योजनेचा कंत्राटी व्याप असो किंवा मुलींना-सर्वांच्याच मुलींना मोफत शिक्षणाचे आमीष असो; हजेरीसाठी रूपया देण्याचे नाटक असो अथवा अंगणवाड्यातील खिचडी वाटप असो वा शाळाशाळांतील न शिजविलेल्या किंवा शिजविलेल्या तांदुळाचे वाटप असो, हे सर्वच देखाव्याचे उपाय शिक्षणापासून वंचित असणारांना वाईट आणि निरुपयोगी शिक्षणाकडे वळविण्याचा खटाटोप करीत आहेत. यांनी फार तर खरी वा खोटी पटसंख्या वाढेल पण मुलांना शिक्षण मिळणार नाही.

मुलांना काय किंवा त्यांच्या पालकांना काय शिक्षण चांगले हवे आहे आणि त्यासाठी शाळा चांगल्या हव्या आहेत. हे 'प्रोब'रिपोर्टने दाखवून दिले आहे. आज, मुलांनी (वा मुलींनीही) शाळेत जाऊन शिक्षित होऊ नये, असे म्हणणारा पालक विरळाच आहे; तरीही मुले शाळेत जाऊ इच्छित नाहीत कारण, शिक्षण मुलांच्या गरजांप्रमाणे त्यांना आकर्षित करणारे नाही. ते आनंददायी नाही, ते कृतिशील नाही, ते स्वतंत्र विचारशक्तीला वाव देणारे नाही, ते सर्जनशीलता जागवणारे नाही, एवढेच नव्हे तर, साधे नागरिकत्त्व जोपासणारे किंवा माणसांनी माणसांशी माणसांप्रमाणे वागावे याचे भान देणारे हे शिक्षण नाही.

दुसरा प्रयत्न आहे तो धर्माभिमानी लोकांचा. धर्माचा जो राजकीय खेळ चालला आहे, त्याविषयी मी आत्ता बोलत नाही. धर्माभिमानी लोकांचा जो शिक्षणावर कब्जा बसविणे चालू आहे, ती बाब मला अधिक चिंतेची वाटत आहे. मी स्वत: धर्म ही गोष्ट कालबाह्य मानतो. म्हणून मी स्वत:ला धर्मातीत मानतो. देवा-धर्मात समाजाचा फार मोठा वेळ व पैसा फुकट जात आहे. तरुणांचे मन निरर्थक गोष्टींमध्ये गुंतवल्यामुळे त्यांची वास्तव व अपेक्षित उत्पादकता घटत आहे, आणि ही गोष्ट कुटुंबांना नि समाजाला आर्थिक विपन्नावस्थेत ठेवण्याची शक्यता आहे. नव्या पिढीला हा धोका सांगितला पाहिजे. धर्मकारणाने सामान्य माणसाचे अर्थकारण धोक्यात येण्याचा संभव युवकांनी समजावून घेतला पाहिजे. धर्मकारणाने समाजपरिवर्तनाची वाटच धूसर होत आहे, हे युवकांनी समजावून घेतले पाहिजे.

### *शिक्षणाची निरर्थकता*

एक महत्त्वाची गोष्ट अशी की, आजचे शिक्षण शिकणाऱ्याच्या हाती फारसे काही लागू देत नाही. तारुण्याची ऐन उमेदीची कित्येक वर्षे घालवूनही आजची शिक्षणव्यवस्था स्वतंत्र विचारशक्ती, ज्ञानमयता आणि आयुष्यात येणाऱ्या प्रश्नांची आव्हाने स्वीकारून ते सोडविण्याची क्षमता देत नाही, किंवा सामान्य नैतिक नागरिकत्वही ते निर्माण करीत नाही. याचे कारण, मला दिसते ते असे की, एक आज्ञाधारक गुलामांचा वर्ग शिक्षणातून निर्माण व्हावा, म्हणजे त्याच्या मनावर ताबा मिळविणे सहज शक्य व्हावे, वाहत्या राजकीय-धार्मिक वाऱ्यांप्रमाणे त्याला वळवता यावे - वाकवता यावे, या भूमिकेतून आजची शिक्षण रचना काम करते आहे. त्यामुळे निरर्थकटाय-सहित गणवेश, पायात बूट, ओळीत मांडलेली बाके, त्यावर ओळीत बसलेली मुले, परीक्षांत गुंतवलेली मने आणि शिस्तीचा अतिरेक या गोष्टींचा वेगळा अर्थ काय लावणार ?

### *शिक्षकांची गुलामसदृश उदासीनता*

शिक्षणासारख्या ज्ञानप्रसाराच्या नि ज्ञाननिर्मितीच्या क्षेत्रातील शिक्षकांची ही गुलामसदृश उदासीनता हा शिक्षणव्यवस्थेतला सर्वात मोठा प्रश्न झाला आहे. अडचण आहे ती ही की

असा स्वत:च स्वतंत्र विचाराचे इंद्रिय हरवलेला शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्र विचारशक्तीची प्रेरणा कशी रुजवणार ?

शिक्षक आणि सरकार यांच्यातील संबंध तीन स्तरांवर आढळतो. एक, अभ्यासक्रमाचे निर्माते – दाते म्हणून सरकारशी असलेला संबंध. दोन, सरकार म्हणजे सरकारी अधिकारी पर्यवेक्षण करीत असल्यामुळे शिक्षक हे अधिकाऱ्यांमध्ये 'सरकार' पाहणार, पर्यवेक्षणाच्या घटनेमुळे त्यांचा सरकारशी संबंध बांधला गेला आहे. आणि तीन, सर्वात महत्त्वाचा संबंध म्हणजे पैशाने बांधून दिलेला संबंध. सरकार शिक्षकांचे वेतन देते; यातून 'देता-घेता' असा संबंध सरकार व शिक्षक यांच्यामध्ये निर्माण होतो. मालक-मजूर असा संबंध यातून तयार होतो.

धोरणकर्ते, पर्यवेक्षणकर्ते आणि वेतनकर्ते हे तिन्ही या सरकार-शिक्षक संबंधाचे पायाभूत आधार असल्यामुळे वरच्या सारखा केवळ 'मालक-मजूर' असा कराराने बद्ध असा व्यावहारिक संबंध केवळ राहत नाही तर तो त्याच्याही खालच्या पातळीवर जातो. मध्ययुगीन काळातील सरंजामदार-गुलाम असा हा संबंध प्रत्यक्षात होतो. शिक्षक हे व्यावहारिक पातळीवर वेठबिगार असल्यासारखेच असतात. वेठबिगार याचा अर्थ असा की, मालकाने सांगितलेले काम करायचे, सांगितलेलेच फक्त करायचे आपणहून दुसरे काहीही करायचे नाही आणि आपल्या स्वत:च्या कामाबद्दल काय, किंवा मिळालेल्या आज्ञांबद्दल काय स्वतंत्रपणे विचार अजिबात करायचा नाही. सरकारला विरोध करायचा नाही की, सरकारच्या कोणत्याही निर्णयाबद्दल शंकाही घ्यायची नाही. सरकारला काही सुचवायचेही नाही मग, सरकारला त्याचे काही चुकले म्हणून सांगण्याचे तर धाडसच करायचे नाही. त्यामुळे एकूणच आपल्या कार्याबद्दल, कार्यक्षेत्राबाबत शिक्षकवर्ग उदासीन झाला आहे.

हल्ली शिक्षकांच्या संघटना असतात; त्या संघर्ष करतात तो अधिक पैशांसाठी आणि शिक्षकांवरील अन्यायांसाठी. शाळांवरील अन्याय हा त्यांना आपल्या पेशावरील अन्याय वाटत नाही; विद्यार्थ्यांवरील अन्याय हा त्यांना आपल्यावरील अन्याय वाटत नाही. कारण, त्यांची बांधिलकी, विद्यार्थ्यांशी, शाळांशी किंवा शिक्षणाच्या दर्जाशी नाही.

### *शिक्षक-विद्यार्थी संबंध*

शिक्षक-सरकार संबंध ज्यातऱ्हेने घट्ट बांधला गेला आहे, तीच एक शिक्षणक्षेत्राची समस्या आहे, असे आपण पाहिले आहे. परंतु शिक्षक-विद्यार्थी हा संबंध घट्ट बांधला गेलेला नसतो ही आणखी एक वेगळीच समस्या आहे. आजचे शिक्षक हे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सरकारचे नोकर ठरल्यानंतर त्यांची बांधिलकी सरकारशी असते. विद्यार्थ्यांशी नसते. 'विद्यार्थ्याला जे आणि जसे हवे तसे (शिक्षण) देणारा तो शिक्षक', असे न घडता, 'शिक्षक जे आणि जसे

(शिक्षण) देईल ते घेणारा तो विद्यार्थी', अशी एक नवी शिक्षक-विद्यार्थी संबंधांची रचना तयार झाली आहे. आणि मग वर्गात शिक्षक हुकुमशहा होतो. त्याने आज्ञा द्यायच्या नि विद्यार्थ्यांनी आज्ञाधारक होऊन त्या पाळायच्या, एवढेच काम विद्यार्थ्यांकडे येते. एक प्रकारे विद्यार्थ्यांचे रूपांतर गुलामांमध्ये होते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. स्वयंप्रेरणेने शिक्षण, स्वतंत्र विचारशक्तीचा विकास करणारे शिक्षण असे शिक्षणाचे स्वरूप त्यामुळेच निर्माण होत नाही.

विद्यार्थ्यांची शिक्षकांबद्दलची भावना भीतीची असते, प्रेमाची नसते ही गोष्ट शिक्षणाची हानी करणारी ठरते. ज्याप्रमाणे देवाच्या भीतीने माणसे नीतिमान होत नाहीत, तद्वतच शिक्षकाच्या भीतीने विद्यार्थी सुशिक्षित होत नाहीत. भीतीची प्रेरणा ही नकारार्थी (Negative) प्रेरणा आहे; ती विद्यार्थ्यांच्यात शिकण्याची आवड निर्माण करू शकत नाही. शिस्त, शिक्षा, भीती, आज्ञाधारकपणा आणि स्पर्धा हे आजच्या शिक्षणातील 'पंचमहाराक्षस' आहेत. त्यांनीच शिक्षणाचे सारे वातावरण प्रदुषित करून टाकले आहे. त्यामुळे 'शिक्षकाने माझे आयुष्य घडवले' असे म्हणण्याची संधी आजच्या विद्यार्थ्याला क्वचितच मिळते. शाळा सोडून काही वर्षे झाल्यानंतर आपले शिक्षक लक्षातही राहत नाहीत, इतपत आता विद्यार्थ्यांच्या लेखी शिक्षकांचे स्थान खाली आले आहे.

*विषमतेचा प्रश्न*

केवळ गरिबीमुळे विषमता स्वीकारावी लागणे किंवा केवळ आपण खेड्यामध्ये जन्माला आलो म्हणून शिक्षणाच्या चांगल्या सोयींना वंचित व्हावे लागणे, ही या देशाला नामुष्कीची गोष्ट आहे. घटनेच्या जाहीरनाम्यात सांगितलेल्या प्रतिष्ठा नि संधीच्या समानतेच्या आदर्शाला काळीमा फासणारी ही गोष्ट आहे. आज अस्तित्वात असलेली शिक्षणव्यवस्था ही केवळ विषमता टिकवून ठेवते एवढेच नाही तर ती विषमता वाढवत आहे.

घटनेमध्ये मूलभूत हक्कांच्या प्रकरणात १५ व्या कलमात, समतेच्या हक्काचे विवरण आले आहे. कोणाही व्यक्तीला धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्माचे ठिकाण यावरून भेदभाव केला जाऊ नये, असे म्हटले आहे. समतेचा असा हक्क हा व्यक्तिगत मूलभूत हक्क मानला गेला आहे. परंतु आपल्या देशात खेड्यात जन्माला येणे आणि म्हणून खेड्यात प्राथमिक शिक्षण घ्यावे लागणे, म्हणजे शिक्षणाच्या किमान सोयींनाही वंचित होणे होय. शहरांतील शिक्षणाच्या तुलनेत खेड्यांतील शिक्षणाच्या सोयी-सुविधा अत्यल्प आहेत. फार मोठी विषमता शहर आणि खेडी यांमध्ये याबाबतीत आहे. सर्वांसाठी शालांत परीक्षा एकच आहे. परंतु त्याची तयारी करणारी प्रथमपासूनची शिक्षणाच्या सोयी-सुविधांची उपलब्धता असमान आहे. प्रयोगशाळा, ग्रंथालये, क्रीडांगणे, सांस्कृतिक कार्यक्रम यांच्या सुविधा खेड्यांमध्ये जवळजवळ नाहीतच. अगदी संडास-मुत्री आणि स्वच्छ - शुद्ध पिण्याच्या सोयीदेखील नाहीत. हीच विषमता शिक्षकांच्या आणि

व्यवस्थापनाच्या स्तरांवरही आहे. शिक्षकांच्या वेतनात समानता आणली. पण शिक्षकांच्या दर्जामधील दरी कशी काय भरून काढणार ? एकूणच खेड्यांमधील शिक्षणाचा दर्जा चिंता करावी एवढा कमी आहे.

अलिकडे म्हणजे १९७६ साली ४२ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. त्यातली एक तरतूद असे सांगते की निकोप पद्धतीने आणि स्वतंत्रतेच्या नि आत्मसन्मानाच्या वातावरणात मुलांना आपला विकास साध्य करता यावा, अशा तऱ्हेच्या संधी नि सुविधा त्यांना पुरविण्यात येतील. अर्थात ४१ व्या कलमाने यास काही प्रमाणात छेद दिला आहे. त्यात, सरकारला त्याच्या आर्थिक क्षमतेच्या प्रमाणात पण प्रभावी रीतीने शिक्षणाचा वगैरे हक्क अंमलात आणण्याची सोय ठेवली आहे. परंतु १९९२ सालच्या एका खटल्यात मात्र कर्नाटक उच्च न्यायालयाने, यासंदर्भात आपले स्पष्ट आदेश असे नोंदले आहेत की, सरकारने एकदा का कायद्याने वा शासकीय कृतीने शिक्षणाच्या सोयी पुरवल्याच, तर मग समानतेचे तत्व डोळ्यांसमोर ठेवावेच लागेल.

आज खेड्यातील किंवा त्यातही वंचितांच्या मुलांच्या शिक्षणाबाबत सरकारची भूमिका केवळ किमानतेचा आग्रह धरणारी आहे, समानतेचा नाही. महात्मा फुले यांच्या नावाने योजना आखून अल्पवेतनावर अल्पशिक्षितांना नि अप्रशिक्षितांना नेमून कोणत्याही मूलभूत सोयी नसलेल्या वस्तीशाळा उघडणे, ह्या गोष्टी, समाजाच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचाच प्रकार आहे. वास्तविक समानतेचे तत्व अंगिकारणे म्हणजे, केवळ शाळा सुरू करणे नव्हे, तर प्रत्येक स्तरावरील शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व भौतिक नि शैक्षणिक सुविधांनी परिपूर्ण अशी शाळा, सर्व ठिकाणच्या सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे. हे न करता, शाळेत मुलांना येती करणे, आल्यावर टिकती करणे आणि टिकलीच तर शिकती करणे शक्य होणार नाही. आज जगातील अनेक देशांच्या तुलनेत भारतात, शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागात नि मुलांच्या तुलनेत मुलींना शिक्षणाच्या अल्प नि अपुऱ्या सोयी प्राप्त होत आहेत. आणि सरकार, मग ते कोणत्याही स्तरावरचे असो किंवा कोणत्याही पक्षाचे असो, शिक्षणाच्या समानतेच्या वल्गना करुन समाजाची फसवणूक तर करीतच आहे, पण आत्मवंचनाही करीत आहे, आणि तीही अत्यंत निर्लज्जपणे.

शिक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीला आयुष्यातील किती वर्षे शिक्षण घेण्याची वेगवेगळ्या देशात संधी मिळते, हे पाहण्यासारखे आहे. जगातील विविध देशांमधून पंधरा वर्षावरील प्रौढांना तोवर किती वर्षाचे शिक्षण सरासरीने मिळाले आहे याची आकडेवारी पाहिली तर असे दिसून येते की सुमारे पन्नास देशांत ५ ते ६ वर्षे, ३८ देशांत ७ ते ८ वर्षे, ५४ देशांत ९ ते १० वर्षे, १९ देशांत ११ ते १२ वर्षे आणि १६१ देशांत १२ पेक्षा जास्त वर्षे शिक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीची

खर्च होतात. भारतात हे प्रमाण अत्यल्प आहेच पण दुर्दैवाची बाब अशी की, गरिबांच्या बाबतीत तर ते अगदी नगण्यच आहे. उदाहरणार्थ, राष्ट्रीय नमुना पाहणी संस्थेच्या (एन.एस.एस.ओ.) १९९८ साली प्रसिद्ध झालेल्या १९९५-९६ सालच्या आकडेवारीनुसार भारतातील हे प्रमाण ४.२६ वर्षे इतके आहे. अर्थात यावरून एवढेच लक्षात येईल की, अनेक देशांपेक्षा भारतात लोकांना शिक्षणाच्या संधी कमी प्रमाणात मिळतात. यासंधीचे ४.२६ वर्षे हे ग्रामीण व शहरी, १५ वर्षांवरील मुले व मुली यांचे एकत्रित सरासरी प्रमाण आहे. त्यांची वेगवेगळी फोड केली तर एक वेगळेच परिमाण आपल्यासमोर येते. ग्रामीण भागासाठी हे प्रमाण ३.२९ इतके तर शहरी भागासाठी हे ६.९७, म्हणजे दुप्पटीपेक्षा थोडेसे जास्त आहे. ग्रामीण भागातील १५ वर्षांवरील मुलांना सरासरीने सुमारे सव्वातीन वर्षांने शिक्षण प्राप्त केलेले असते. परंतु त्यातही सर्वात गरीब अशा वीस टक्के कुटुंबातील मुलांनी केवळ २.३० एवढ्याच वर्षाचे शिक्षण घेतलेले असते. त्यातही याच सर्वात गरीब गटांतील मुलींना तर जेमतेम ०.८६ म्हणजेच सरासरीने एक वर्षाचेही शिक्षण प्राप्त होत नाही. म्हणजे या देशात शिक्षण हे गरिबांसाठी नाहीच, असे विधान केले तर ते मुळीच वावगे ठरणार नाही. वाढत्या उत्पन्नाबरोबर व वाढत्या खर्चाबरोबर शालेय शिक्षणाचा लाभ घेण्याची वर्षे वाढतात. याचाच अर्थ असा की गरिबांपेक्षा श्रीमंतांनाच या देशात शिक्षणाचे लाभ अधिक प्रमाणात प्राप्त होतात. या देशात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे नसल्याचाच हा परिणाम म्हणता येईल.

बालशिक्षणाचा, प्राथमिक नि माध्यमिक शिक्षणाचा दर्जा जेव्हा समान नसतो तेव्हा अर्थातच, पुढील शिक्षणाच्या क्षेत्रात तसेच सामाजिक- आर्थिक व्यवहारांच्या क्षेत्रात संधींची समानता कधीही येऊ शकणार नाही.

शिक्षण ही जोवर "देण्या'ची वस्तू मानली जातेय तोवर ते वर्तनवादी दृष्टिकोणाच्या शृंखलेतून बाहेर पडणार नाही; ती जर 'घेण्या'ची वस्तू मानली तर मग आपली विचाराची दिशाच मुळी रचनावादी दृष्टिकोणात परावर्तित होते. शिक्षण ही एक व्यक्तिगत बाब आहे. व्यक्तीच्या उत्स्फूर्ततेची नि स्वयंप्रेरणेची ती गोष्ट आहे. तिचा आशय आहे तो व्यक्तीच्या स्वतंत्र विचारशक्तीला फुलविण्याचा; तिच्यातील सौंदर्यमूल्य जपण्याचा; तिच्या भावभावनांना सहकाराच्या मूल्यामध्ये परावर्तित करण्याचा. व्यक्तीची सामाजिकता ही अशी व्यक्तीच्या विवेकशक्तीकडून समाजधारणेकडे जाणारी असते. आणि प्रभावी अनुभवाधारित शिक्षण हे सारे घडवू शकते.

## शिक्षणातील परिवर्तनाच्या दिशेने

शिक्षणात वरवरच्या सुधारणा करुन शिक्षणाचे प्रश्न सुटणार नाहीत. तसे प्रयत्न प्रत्येक शिक्षणविषयक समितीने सुचविले आहेत, आणि अनेक नवनवीन कार्यक्रमाने सादर केले आहेत. (युनिसेफ, ब्लडबँकर) त्याने शिक्षणाचे कोणतेच प्रश्न सुटले नाहीत. प्रश्न सुटायचे असतील

तर, शिक्षणात आमूलाग्र परिवर्तन हे त्यावरील उत्तर आहे. आणि शिक्षणात परिवर्तन करायचे असेल तर एक, शिक्षणाविषयीचा दृष्टिकोणच बदलून घेतला पाहिजे. वर्तनावादी व्यवस्थेच्या जागी रचनावादी व्यवस्था आणावी लागेल. दोन, शिक्षक - विद्यार्थी संबंधांबाबत नवीन शिक्षणाभिमुख अशी भूमिका घ्यावी लागणार आहे. तीन, दर्जात्मक शिक्षणासाठी शैक्षणिक वातावरणांतील विषमता नाहीशी करायला हवी आहे. चार, समान शिक्षणाची जबाबदारी सरकारने आणि सरकारवर अंकुश ठेवण्याची जबाबदारी समाजाने घ्यायला हवी. पाच, आंतरराष्ट्रीय नि राष्ट्रीय स्तरावर मान्य करण्यात आलेल्या बालकाच्या हक्काला रचनात्मक आशय दिला पाहिजे.

### *१. वर्तनवादाकडून रचनावादाकडे*

आज शिक्षणव्यवस्थेत सरकार सर्वस्वी महत्त्वाचे मानले जाते. तेच धोरणे ठरवणार, तेच त्यांच्या तज्ज्ञांकडून अभ्यासक्रम ठरवून घेणार आणि तेच त्यांची अंमलबजावणी करणार. म्हणजे पहिले महत्त्व सरकारला, दुसरे व्यवस्थापनाला. शिक्षक हे या व्यवस्थापनाचे प्रतिनिधी म्हणून काम करणार. त्यामुळे त्यांची बांधिलकी व्यवस्थापनाशी, पर्यायाने सरकारशी. या उतरंडीत शिक्षकांना, प्रतिनिधी या नात्याने तिसरे स्थान आहे. आणि मग चौथे म्हणजे अखेरचे स्थान विद्यार्थ्यांना.

वर्तनवादी शिक्षणपद्धतीमध्ये येणारा हा अपरिहार्य असा दोष आहे. यात सर्वाधिकारी शासन सर्व शिक्षणाची अंग-प्रत्यंगे नियंत्रित करीत असते. आणि शालाव्यवस्थापन आणि शिक्षकवर्ग हा त्यांच्या आज्ञांनुसार सरकारी शिक्षण 'राबवत' असतो. त्यामुळे कोणत्याच स्तरावर कल्पकतेला, प्रयोगशीलतेला, नवनिर्मितीला वाव राहत नाही. या व्यवस्थेत विद्यार्थ्याला कृतिशील (Active) सहभाग (Roll) दिलेला नसतो. शिक्षण ही येथे 'देण्या'ची गोष्ट मानली आहे. आणि विद्यार्थ्यांचे काम केवळ 'दिलेले घेण्या'चे असे मानले जाते. त्यामुळे त्याला सर्वात कमी महत्त्व ओघानेच येते. परिणाम असाही होतो की वर्गात प्रत्यक्षपणे आपणहून शिकण्याचा विद्यार्थ्यांचा नैसर्गिक ओढा आणि त्याला शिकविण्यासाठी वरून लादली जाणारी धोरणे यांमध्ये फार मोठे अंतर निर्माण होते. त्यामुळे सरकारच्या अपेक्षा विद्यार्थी पूर्ण करू शकत नाहीत आणि विद्यार्थ्यांच्या अपेक्षांना नि गरजांना सरकारी शिक्षण पुरेसे पडत नाही. शिक्षक विद्यार्थ्यांच्यात उत्साह निर्माण करू शकत नाहीत; विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊ शकत नाहीत. शिक्षणाची वर्गरचना शिक्षककेंद्री होऊन, विद्यार्थ्यांना केवळ ऐकून शिकण्याचाच एकमेव मार्ग खुला राहतो. रचनावादी शिक्षण हे बालकेंद्री शिक्षण असल्यामुळे प्राधान्य वर्गातील मुलांना असते. शिक्षण विद्यार्थ्यांभोवती गुंफले जाते.

अशा तऱ्हेच्या रचनावादी शिक्षणाचे नमुने, आज महाराष्ट्रातही उपलब्ध आहेत. सरकार जे करू शकत नाही, करीत नाही, ते आज शिक्षणाच्या क्षेत्रात काही स्वेच्छाकार्य संस्था करताहेत.

उदाहरणार्थ, अधिक मुलांना शाळेत येती करणे, गळती थांबवण्यासाठी प्रयत्न करणे, मुलांबरोबर अधिक संख्येने मुलींना शिक्षण प्रवाहात आणणे, बालमजुरांना कामांकडून शिक्षणाकडे वळवणे, खेड्यांमधून अधिकाधिक बालवाड्या काढून, वंचित मुलांना बालशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, शिक्षणाच्या वर्गातील पद्धतींविषयी प्रयोग करणे, नवनवीन शैक्षणिक साधनांची निर्मिती नि वापर करणे, शिक्षण विषयक प्रगतीशील विचारांचा प्रसार करणे, प्रशिक्षण करणे आणि अल्पप्रमाणात का होईना, परंतु, शिक्षणविषयक अभ्यास नि संशोधन सातत्याने करणे,इ. स्वेच्छासंस्थांच्या या कार्याकडे आज, सरकार केवळ पूरक कार्य म्हणून बघते; किंवा सरकारला आपल्या तथाकथित शिक्षण विकासाच्या योजना राबविण्यासाठी. स्वेच्छाकार्यांनी मदत करावी असे वाटते. सरकारला या स्वेच्छाकार्यातील शिक्षणसंस्थांकडून शिकण्यासारखे बरेच आहे, पण सरकारची मानसिकता अजूनही सरंजमशाहीच आहे.

*२. शिक्षक – विद्यार्थी शिक्षणाभिमुख संबंध*

शिक्षकाचा विद्यार्थ्यांशी शिक्षणाभिमुख असा कोणता संबंध असू शकतो ? खरा संबंध असायला हवा तो परस्पर विश्वासाचा, नि हा विश्वास ज्यातून निर्माण होतो त्या परस्पर प्रेमाचा. विनोबा म्हणतात, शिक्षकाने विद्यार्थ्यांची आई झाले पाहिजे. यात मातृप्रेमाची मुलाला घडविण्याची क्षमता सांगितली आहे आणि ती शिक्षकाकडून अपेक्षिलेली आहे. पण, मला तरी ही अपेक्षा 'युटोपियन' वाटते. अनैसर्गिक आणि स्वप्नाळू वाटते. व्यावहारिक पातळीवर दुसरा एक संबंध असू शकतो आणि आज घसरत्या दर्जाच्या शिक्षणाला तो संबंध काहीसा सावरू शकतो. तो म्हणजे कर्तव्यभावनेचा संबंध. व्यवसायिक नीतीमत्तेचे निधान असलेला हा संबंध. आपण आपला शिकविण्याचा व्यवसाय प्रामाणिकपणे करावा, विद्यार्थ्यांचे हित सदोदित नजरेसमोर ठेवून, त्यानुसार आपल्या वागण्या-बोलण्यात नि शिकविण्यात लवचिकता ठेवावी आणि आपण आपले कर्तव्य आपल्या मती-शक्तीनुसार करतो आहोत, याचे आत्मिक समाधान लाभावे, या दिशेने हा संबंध कार्यान्वित होऊ शकतो. परंतु, हा संबंध निर्माण होण्याची प्राथमिक अट आहे ती, म्हणजे, शिक्षक होणाराने आपल्याला अत्यंत आवडीचा व्यवसाय म्हणून या पेशात उतरले पाहिजे. आज असे शिक्षक फारच थोडे असतील. एक अल्पवेळाची कायम स्वरूपी, चांगले धन देणारी आणि आपल्याकडून प्रत्यक्षात कोणत्याही अपेक्षा न ठेवणारी अशी ताणरहित नोकरी म्हणूनच या पेशाकडे बहुसंख्य लोक वळतात. त्यामुळे, अशा तऱ्हेचा कर्तव्यभावनाधारित संबंध शिक्षक व विद्यार्थी यांच्यात निर्माण होणे दुरापास्त दिसते.

परावर्तित शिक्षणामध्ये तिसराच एक संबंध शिक्षक-विद्यार्थी यांना परस्परांना धरून ठेवू शकेल आणि मग शिक्षणव्यवस्थेचे शीर्षासन होऊन, विद्यार्थी केंद्री शिक्षण अंमलात येऊ शकेल असे वाटते. हा संबंध आहे आव्हान निर्मितीचा संबंध. जेव्हा शिक्षकाला प्रत्यक्ष वर्गामधील

दैनंदिन काम बौद्धिक आणि भावनिक आव्हानाचे वाटेल तेव्हाच शिक्षक शिक्षणप्रक्रियेला मनापासून खिळून राहील आणि आनंद घेऊन आपले जीवन कृतार्थ करील.

एखादे कार्य आव्हानात्मक वाटण्यासाठी त्या कामात नित्यनूतनता असावी लागते. प्रयोगशीलता असावी लागते. आणि मुख्य म्हणजे सर्जनशीलता असावी लागते. रोजचे शिकवणे हा उपचार न राहता त्याला नित्य नव्या विचाराचे अधिष्ठान मिळाले तर शिक्षकाला आपला व्यवसाय खचितच आव्हानाचा वाटेल. आव्हानांचे ताण हे सुखदायक ताण असतात, असे अलीकडचे मेंदूविषयक संशोधन सांगते.

वर्गामधील शिक्षणाची पद्धती ही या आनंददायक ताणांशी संबंधित अशी पद्धती असते. विद्यार्थ्यांचे शिक्षण त्यांच्यासमोर ठेवलेल्या आव्हानात्मक प्रश्नांनी सुरू होते. समोर ठाकलेल्या प्रश्नांशी सर्वांगाने भिडून, त्यांची उत्तरे शोधण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया म्हणजे शिक्षण असते. ज्याक्षणी उत्तर मिळते, त्या क्षणी जसे त्या प्रश्नाशी भिडणे संपुष्टात येते, तसेच तत्संबंधित शिक्षणाची प्रक्रियाही समाप्त होत असते. प्रश्नाकडून उत्तराकडे जाण्याची, आपणहून जाण्याची प्रक्रिया मुलांचे मन खिळवून ठेवते आणि अशा एकाग्र मनाची अवस्था ही आनंददायक अवस्था असते. विद्यार्थ्याला शिक्षण आनंददायी ठरते ते या अर्थाने.

विद्यार्थ्यांना असे आव्हानात्मक प्रश्नांमध्ये गुंतवून ठेवणे यात शिक्षकाची कल्पकता साठवलेली आहे. विद्यार्थ्यांपुढे कोणते प्रश्न ठेवावेत, ते कसकशा रूपांत ठेवावेत, कोणत्या विद्यार्थ्याला कोणती आव्हाने सजग करतील आणि पेलतील, यांचा शोध शिक्षकाने घ्यायचा असतो. हा असा शोध घेणे हेच शिक्षकापुढील आव्हान असते. प्रश्नांशी एकरूप होऊन विद्यार्थी, आपला आपणच, चुका करीत करीत उत्तरांच्या दिशेने मार्गक्रमण करीत जात असताना, त्याच्या गरजेनुसार त्याला सहाय्यभूत होणे, हे शिक्षकाचे काम असते. प्रत्येक विद्यार्थी वेगळा, त्याची बुद्धिमत्तेची क्षेत्रे वेगळी, जगाची ओळख करून घेण्याची म्हणजे ज्ञानप्राप्तीची त्याची पद्धत त्याच्या विशिष्ट प्रकारच्या बुद्धिमत्तेशी जोडलेली. म्हणजेच प्रत्येक विद्यार्थ्याचा कल वेगळा, गती वेगळी, विशिष्ट वेळेची मनस्थिती वेगळी. अशावेळी या सगळ्या परिस्थितीशी सर्वांगाने भिडणे, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी सातत्याने नवनवी आव्हाने ठेवणे, हेच कार्य शिक्षकाला आव्हानात्मक परिस्थितीत नेऊन सोडते. बहुवर्ग बहुश्रेणी अशी पन्नास साठ विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये, एका मुलाकडून दुसऱ्या मुलाकडे अशी शिक्षकाची नजर सतत फिरत असते आणि मुलांच्या प्रगतीचे, त्यांमध्ये व्यक्तिगत पातळीवर येणाऱ्या अडथळ्यांचा वेध घेत राहते. शिक्षकाला अशावेळी आपली कल्पकता पणाला लावावी लागते; नव्हे, लावण्याची संधी मिळते. त्याला आव्हानात्मक ताणांना तोंड द्यावे लागते. आणि वर्गातील मुलांच्या संख्येपेक्षाही जास्त अशा लहान लहान प्रश्नांना भिडण्याची कसरत त्याला करावी लागते. ही अशी असणारी बौद्धिक

कसरत ही शिक्षकाला आनंदी करीत असते. शिक्षकाच्या दृष्टीने सारी शिक्षणप्रक्रिया आनंदी ठरते ती अशी.

### *३. वातावरणातील विषमता व शैक्षणिक परिवर्तन*

शिक्षणाच्या बाजारात गुणवत्तेविषयी बरेच लोक बऱ्याच प्रमाणात बोलत असतात. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधींच्या बाबत मागणीच्या मानाने पुरवठा मर्यादित ठेवून, प्रवेश परीक्षांमधील गुणांना अनिवार्य महत्त्व दिले जाते. येथे गृहित असे धरले आहे की, प्रवेश परीक्षांमध्ये अधिक गुण मिळविणारा किंवा मिळविणारी त्या विशिष्ट शिक्षणासाठी अधिक लायक असते. अलीकडे पी.एच.डी.साठी पदव्युत्तर स्तरावर ७०% गुण असण्याची अट ठेवावी अशी सूचना सर्व विद्यापीठांचे कुलपती – राज्यपाल यांनी केली आहे. येथेही परीक्षांचे गुण पुढील शिक्षणासाठीची लायकी ठरवतात असे गृहित आहे. वास्तविक संशोधनासाठी लागणारी बुद्धिमत्ता आणि पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी लागणाऱ्या बुद्धिमत्ता नि कौशल्ये अगदी वेगळी असतात. त्यामुळे अगदी तृतिय श्रेणीत उत्तीर्ण होणाराही उत्तम संशोधक होऊ शकतो. पण या शैक्षणिक सत्याची जाण नसल्याने अशी विधाने अधिकारावरील व्यक्ती करतात. आज प्रवेशाची अट म्हणून असलेल्या परीक्षांतील गुण आणि ते विशिष्ट शिक्षण घेण्यासाठी लागणारी बुद्धिमत्ता नि कौशल्ये यांमधील सहसंबंध निश्चितपणे सांगणारे अभ्यास उपलब्ध नाहीत. परंतु उलट दिशेच्या अनुमानाने गेले तर असे दाखवून देता येईल की जर त्या विशिष्ट उच्च शिक्षणात उत्तीर्णांचे प्रमाण नेहमीच शंभर टक्के नसेल, म्हणजेच तेथेही परीक्षांतून प्रवेश घेतलेली मुले अनुत्तीर्ण होत असतील तर, मग, प्रवेश परीक्षांतील हुषारी आणि त्या विशिष्ट अभ्यासक्रमात यशस्वी होण्यासाठी लागणारी बुद्धिमत्ता नि कौशल्ये यांचा सहसंबंध असतोच, असे म्हणता येणार नाही. मग अशावेळी प्रवेश मिळालेला गुणानुक्रमाने शेवटचा विद्यार्थी आणि त्याच्या पाठोपाठचा पण प्रवेश न मिळालेल्यांमधील अनुक्रमाने पहिला विद्यार्थी यांच्यात गुणात्मक फरक आहे असे आपण का मानावे ?

उच्च शिक्षणाच्या बाजारात जेथे राखीव जागा मागासलेल्यांसाठी ठेवल्या आहेत तेथेही केवळ राखीव जागांची मर्यादित संख्या आणि मागणी करणारांची मोठी संख्या यामुळे, वर उल्लेखिल्याप्रमाणेच, सर्व तार्किक दोष संभवतात. मात्र या राखीव जागांच्या संदर्भात, सवर्णांकडून, नेहमीच एक आक्षेप घेतला जातो. तो असा की, राखीव जागांच्यामुळे सवर्णांमधील अधिक गुणवत्ता असलेले विद्यार्थी डावलून, कमी गुणवत्ता असलेल्यांना प्रवेश दिला जातो. परीक्षांतील गुणांवरच गुणवत्ता जोखण्यामुळे असे विधान केले जाते. जर असे सिद्ध होत असेल की त्या विशिष्ट उच्च अभ्यासक्रमात सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होताहेत आणि नापास होणाऱ्यांमध्ये

मात्र राखीव जागांवरील विद्यार्थ्यांचाच भरणा आहे, तर कदाचित उपर्युक्त तार्किकतेला वास्तवाचे अधिष्ठान आहे असे म्हणता येईल. एरवी, खुल्या नि राखीव जागांसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांमधील प्रवेशपरीक्षांमधील गुणांमधील फरक हा गुणवत्तेमधील फरक मानता येणार नाही.

राखीव जागा आणि त्या भरणारे विद्यार्थी यांच्याबाबतचे एक सामाजिक अंग विचारात घेण्यासारखे आहे. अलीकडच्या बुद्धिमत्तेबाबतच्या संशोधनांतून एक गोष्ट स्पष्टपणे पुढे आली आहे. ती अशी की, जी मुले लहानपणी बौद्धिक वातावरणापासून वंचित असतात, त्यांना योग्य तऱ्हेने विकसीत होण्यास वाव मिळत नाही. शिवाय अनारोग्य, कुपोषण अशांच्या प्रादुर्भावाने आणि घरांतून प्रोत्साहन न देणारे वातावरण असले तर मुलांना विकासाच्या संधी नाकारल्यासारखे होते. आपल्या देशांत खेड्यांतील आणि त्याहीपेक्षा खेड्यांच्या शाळांमधील वातावरणच मुलांच्या बौद्धिक विकासाच्या आड येत असते. एकप्रकारे खेड्यातील असंख्य मुलांचे बौद्धिक कुपोषण होत असते. गावागावांतून बौद्धिकतेचे पोषण करणारे वातावरण नाही, आणि ती उणीव भरून काढण्याची क्षमता शाळांमध्येही नाही. अशा ठिकाणच्या विद्यार्थ्यांचा दर्जा कमीच असणार हे उघड आहे. शारीरिक कुपोषणाच्या इतकाच हा बौद्धिक कुपोषणाचा प्रश्न महत्त्वाचा मानला पाहिजे. गांधीजींनी संपन्न खेड्यांची कल्पना मांडताना, तेथे अगदी स्वतःचे कवीदेखिल असतील असे म्हटले होते. आज एकूणच समाज बौद्धिकतेच्या शिदोरीचे अवमूल्यन करीत चालला आहे, या पार्श्वभूमीवर तर हा बौद्धिक कुपोषणाचा प्रश्न अधिक तीव्रतेने उठून दिसतो. निदान शाळांतून तरी बौद्धिक वातावरण निर्माण करायला हवे आहे. आणि याची सारी जबाबदारी शाळा चालविणाऱ्या सरकारची आणि त्यांच्या उतरंडीमधील लहान-मोठ्या अधिकाऱ्यांची नि प्रत्यक्ष शिक्षकांची असते. प्रत्येक शाळेच्या पातळीवर तर नाहीच, पण निदान प्रत्येक गावाच्या स्तरावर तरी वाचनालय, वैज्ञानिक प्रयोगशाळा, क्रीडासोयी असाव्यात ! पण सरकारच्या धोरणामध्ये असा प्रस्तावच नाही. शहरे आणि खेडी यांच्यातील शैक्षणिक आणि बौद्धिक वातावरणांतील विषमता अपरिवर्तनीय आहे, असेच मानून सरकारचा सारा व्यवहार चालतो. आणि मग लोकप्रक्षोभ होऊ नये म्हणून शाळांतून, शिक्षण देण्याऐवजी तांदूळ देणे, तांदूळ शिजवून देणे असे मलमपट्टीचे उपाय केले जातात. शाळा हे बौद्धिक व्यापाराचे केंद्र असले पाहिजे. त्याला वाण्याचे दुकान वा खाणावळ करण्याची जरुरी नाही. प्रोबच्या अलीकडच्या अहवालाने हे स्पष्टपणे आपल्यापुढे आणलेच आहे की, खेड्यांतील जवळजवळ सर्वच पालकांना आपली मुले आणि मुलीही शिकाव्यात असेच वाटते. पण, शाळा शिक्षण देत नाहीत, म्हणून पालकांकडून मुले शाळेत पाठविली जात नाहीत; आणि शाळांतील वातावरण अस्वच्छ, उदासीन, अनाकर्षक आणि भावनिक नि बौद्धिक आव्हानात्मक हवा पुरविणारे नसते, म्हणून मुले स्वतःही शाळेत जाऊ इच्छित नाहीत. त्यातूनही जी मुले शाळेत जातात त्यांना, त्यांच्या मेंदूच्या क्षमतांना, विकासात्मक खाद्य पुरवतील अशा गोष्टी शाळा पुरवत नाही, त्यांचे बौद्धिक कुपोषण होत

राहते; आणि मग सहजपणेच त्यांना उच्च शिक्षणाच्या संधी घेता येत नाहीत; ते त्यांपासून वंचित राहतात.

मुलांचे शिक्षण आजूबाजूच्या वातावरणांतून संपन्न होणार असेल तर 'शिक्षणासाठी वातावरणनिर्मिती' महत्त्वाची ठरणार आहे. खेड्यांमधून गरीब माणसे असतात, मागासलेली असतात असे मानून नव्हे, तर खेड्यांमधून संपन्नतेने शिक्षण होण्यासाठी लागणारे वातावरण मागासलेले असते, हे लक्षात घेऊन, शिक्षणविषयक संधींचा नि या संधींच्या समानतेचा प्रश्न समोर उभा केला पाहिजे.

### *४. सरकारची व समाजाची जबाबदारी*

आपण समाजातील वंचितांच्या शिक्षणाचा विचार करणार असू तर तो केवळ त्यांना शाळेत आणण्यापाशी मर्यादित करून चालणार नाही. शाळेपर्यंत पोचणारी मुले तेथे टिकल्याशिवाय आणि शिकल्याशिवाय, शाळांचे कार्य पूर्ण होत नाही. प्रोब अहवालाने अलीकडेच दाखवून दिले आहे की, 'शाळा चांगली नाही' हेच मुले शाळेत न जाण्याचे आणि गेलीच तर तेथे टिकून न राहण्याचे प्रधान कारण आहे. आणि 'चांगली शाळा' याची व्याख्या करताना, 'शास्त्राला अनुसरून शिक्षण देणारी शाळा' हा त्यातील एक प्रमुख घटक मानला पाहिजे. हे शास्त्र म्हणजे, मूल कसे शिकते, हे दाखवून देणारे मानसशास्त्र आणि या मानसशास्त्रावर आधारलेले असे रचनावादी दृष्टिकोण देणारे शिक्षणशास्त्र होय.

चांगल्या शिक्षणाची व्याख्या करीत असताना, आणखी एक घटक दुर्लक्षून चालणार नाही. शाळेतील शिक्षणाचे रूप जसे विद्यार्थ्यांना खिळवून ठेवणारे असायला हवे, तद्वतच, शाळेचे बाह्यरूपही मुलांना आकर्षित करणारे असे असायला हवे. शाळा ही अंतर्बाह्य चांगली असेल तर विद्यार्थ्यांचे शिक्षण चांगले होते. शाळेची इमारत, तेथे असाव्यात अशा भौतिक व शैक्षणिक सोयी सुविधा (वाचनालय, प्रयोगशाळा, क्रीडांगणे इ.) यांचा किमान दर्जा हाच कमाल दर्जाचा असायला हवा. तेथे कोणतीही तडजोड असता कामा नये.

येथे सरकारच्या शिक्षणविषयक जबाबदाऱ्यांचा प्रश्न येतो. एकदा, सरकारने सर्वांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली की, समान दर्जाने शिक्षण देण्याची जबाबदारी ही त्यापासून वेगळी नाही. श्रीमंतांचे शिक्षण श्रीमंती पद्धतीने आणि गरिबांचे शिक्षण गरिबी पद्धतीने करणे ही विषमता लोकशाहीच्या मूळ समानतेच्या - समानसंधीच्या तत्त्वांना काळिमा फासणारी गोष्ट आहे; एवढेच नव्हे तर या देशाचे सुजाण नागरिक म्हणून आपल्यालाही ती लाजिरवाणी गोष्ट आहे. या गैरव्यवस्थेत परिवर्तन करायचे असेल तर प्रथमतः शिक्षण म्हणजे, बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण ही सरकार आणि संबंधित समाज यांच्या एकत्रित जबाबदारी मानली गेली पाहिजे. सरकारने समान नि उच्च दर्जाच्या भौतिक नि शैक्षणिक सेवा-सुविधा पुरविण्याची

प्राथमिक जबाबदारी पेलली पाहिजे आणि त्यासाठी शिक्षणावरील खर्चाची मर्यादा राज्यउत्पन्नाच्या सहा टक्के एवढी करून आपली स्वीकारलेली जबाबदारी पार पाडली पाहिजे; त्यातलाही अधिक वाटा हा ज्या वयात मुलांचे कायमस्वरुपी शिक्षणाचे, खांब रोवले जातात त्या वयातील शिक्षणावर खर्च केला पाहिजे. परंतु, शिक्षण हा मतदानासाठी राजकीय मुद्दा होऊ शकत नाही, आणि त्यामुळे सरकारचा शिक्षणावरील खर्च कधी वाढत नाही; उलट इतर मुंद्दे जसजसे पुढे येत जातात, तसतसा तो कमी होत जातो, असे ड्रेझ आणि सेन यांनी म्हटले आहे आणि ते खरेच आहे.

समाजाची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. शाळांमधील शिक्षणावर कठोर अंकुश ठेवून, सरकारी शाळा गावच्या मुलांचे नुकसान करीत असेल तर त्याला जाब विचारण्याची प्राथमिक जबाबदारी, समाजाने निश्चित स्वरूपाची यंत्रणा उभी करून, उचलली पाहिजे. किंबहुना आजच्या परिस्थितीत तर समाजाची जबाबदारी अधिकच मोठी आहे. शाळेतील शिक्षण अंतर्बाह्य बदलण्यासाठी – शिक्षणातील परिवर्तनासाठी – सरकारला वेठीस धरून, सरकारच्या प्राथमिक जबाबदाऱ्या पार पाडायला लावल्या पाहिजेत. सरकार उदासीन राहत असेल तर समाजाला अधिकच प्रभावीपणे कार्यरत व्हायला हवे आहे; सरकार बदमाशी करीत असेल तर सरकारचे अस्तित्वच धोक्यात आणले पाहिजे.

*५. शिक्षण : मूलभूत हक्क*

आंतरराष्ट्रीय स्तरावर 'बालकहक्का'ची सनद निर्माण झाल्यानंतर राष्ट्रीय तसे राज्यांच्या पातळीवरही यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी, भारताने, सनदेवर स्वाक्षरी करून स्वीकारलेली आहे.

ही जबाबदारी पार पाडत असताना, घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांतील ४५ व्या कलमाप्रमाणे बालशिक्षण (०-६ वयोगट) आणि प्राथमिक शिक्षण (६-१४ वयोगट) या दोन्हींची मूलभूत हक्क मान्य करणे आणि तो प्रत्यक्षात अंमलांत आणणे हे सुजाणपणाचे व प्रगतीचे पाऊल ठरेल.

केवळ मूलभूत हक्क मान्य करून सर्वांसाठी, म्हणजे सर्वांचा प्रवेश सुकर व्हावा एवढाच विचार डोळ्यांसमोर ठेवून अल्पखर्ची, अल्पसुविधा असलेल्या नि अल्पदर्जाचे शिक्षण करणाऱ्या शाळा काढणे, शहाणपणाचे ठरणार नाही. मूलभूत हक्कात, शिक्षणाचा 'पूर्ण' हक्क अभिप्रेत असला पाहिजे. त्याचबरोबर तो समानतेने प्राप्त झाला पाहिजे, तरच भारतीय राज्यघटनेच्या जाहीरनाम्यात दिलेल्या संधींच्या समानतेचा आशय प्रत्यक्ष व्यवहारात उतरू शकेल. असा शिक्षणाचा पूर्ण हक्क समानतेने उपलब्ध होणे याचा अर्थ, 'वंचितांचे शिक्षण' या पुस्तिकेत मी मांडला आहे. तो असा :

१. कोणतीही आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती शिक्षणाच्या आड न येणे;
२. वयानुसार, गरज असेल ते शिक्षण घराज़वळ उपलब्ध होणे;
३. त्या त्या पातळीवर दर्जेदार व मूल्याधिष्ठित शिक्षण प्राप्त होणे;
४. कोणत्याही कारणामुळे शिक्षणात खंड न पडता शिक्षण पुरे करता येणे;
५. प्रत्येक बालकाला आपला कल व आपली गती यांनुसार शिक्षण पुरे करता येणे;
६. शैक्षणिक वर्षात कायद्याने ठरवून दिलेला शिक्षणाचा कालावधी पूर्णपणे वापरला जाणे;
७. शिक्षणाची ठरविलेली उद्दिष्टे गाठली जाण्यासाठी आवश्यक त्या सर्व शैक्षणिक व भौतिक सुविधा पूर्णांशाने उपलब्ध होणे.

या सात गोष्टी, कोणतीही तडजोड न स्वीकारता, जर शासनाकडून करवून घेतल्या तरच आपण, शिक्षणाची पूर्ण संधी समानतेने सर्वांना प्राप्त करून दिली असे म्हणता येईल.

एका गावात एकापेक्षा अधिक शाळा असतील तर त्यांच्यासाठी समायिक अशाही वाचनालयाचा किंवा प्रयोगशाळा नि क्रीडांगणांसारख्या सुविधा उपलब्ध करता येतील. सर्वांसाठी शालान्त परीक्षा एकच पण, उपलब्ध सोयींमध्ये मात्र विलक्षण विषमता, असे चित्र हे केवळ मागास विद्यार्थ्यांवर अन्याय करणारेच आहे असे नव्हे, तर ते घटनेच्या समान हक्कांच्या आश्वासनाच्या विरोधीही आहे. त्यामुळे प्रत्येक गावात पूर्ण वेळची, पूर्ण क्षमतेची, शाळा असणे, आणि तिचा लाभ गावातील सर्व मुलांना मिळणे, याला दुसरा कुठलाही पर्याय असू शकत नाही. म्हणूनच आजचे वस्तीशाळांसारखे पर्याय, शासनाच्या सोयीचे असले तरी मुलांचे शिक्षण पूर्णांशाने करण्यासाठी पुरेसे खचितच नाहीत.

सर्व शिक्षणसोयींनी युक्त अशी इमारत, विद्यार्थ्यांना केंद्रीभूत ठेवून, त्यांना स्वयंशिक्षणाच्या संधी उपलब्ध करवून देणारे शैक्षणिक उपक्रम व शैक्षणिक साधने, शिकविण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या शिकण्यासाठी सहाय्य करणारा शिक्षक, आणि शाळांवर जबरदस्त अंकुश ठेवणारी पालक-समाजाची जागरूकता, ही चांगल्या शिक्षणाची व्याख्या होऊ शकेल. शासनाला अशा शिक्षणासाठी, खर्चाची तरतूद करावी लागेल. मग त्यासाठी सरकारला आपल्या खर्चाची प्राधान्ये बदलून शिक्षणाला अधिक वरचे स्थान द्यावे लागेल.

शिक्षणाने समाज प्रगल्भ होऊ शकत असेल तर समाजाने प्रगल्भ शिक्षणाची आंस धरायला हवी.

■ ■ ■

## प्रा.रमेश पानसे यांची ग्रंथसंपदा

| | |
|---|---|
| १) भारताची दुसरी गुलामी | प्रोग्रेसिव्ह रिसर्च प्रकाशन |
| २) विकास विचार | प्रोग्रेसिव्ह रिसर्च प्रकाशन |
| ३) स्वदेशी विकासनीती | प्रोग्रेसिव्ह रिसर्च प्रकाशन |
| ४) शिक्षण : आनंदक्षण | युनिसेफ प्रकाशन |
| ५) विचारफुले | साकेत प्रकाशन |
| ६) आम्ही कुणीही नाही (कविता) | प्रज्ञा प्रकाशन |
| ७) लहान मुलांच्या पालकांसाठी | ग्राममंगल प्रकाशन |
| ८) लहान मुलांच्या शिक्षिकांसाठी | ग्राममंगल प्रकाशन |
| ९) नूतन बालशिक्षणाचा वैचारिक इतिहास | बालशिक्षण संशोधन व विकास केंद्र |
| १०) ताराबाई मोडक चरित्र व कार्य | बालशिक्षण संशोधन व विकास केंद्र |
| | ळशिक्षण परिषद अध्यक्षीय ाण (१९९८) |
| | ळशिक्षण परिषद अध्यक्षीय ाण (१९९९) |
| | ळशिक्षण परिषद अध्यक्षीय ाण (२०००) |
| | ळशिक्षण परिषद अध्यक्षीय ाण (२००१) |
| | ळशिक्षण परिषद अध्यक्षीय ाण (२००२) |
| | ठी संशोधन मंडळ प्रकाशन |

RP026

# शिक्षणविषयक जबाबदारी

चांगल्या शिक्षणाची व्याख्या करीत असताना, आणखी एक घटक दुर्लक्षून चालणार नाही. शाळेतील शिक्षणाचे रूप जसे विद्यार्थ्यांना खिळवून ठेवणारे असायला हवे, तद्वतच, शाळेचे बाह्यरूपही मुलांना आकर्षित करणारे असे असायला हवे. शाळा ही अंतर्बाह्य चांगली असेल, तर विद्यार्थ्यांचे शिक्षण चांगले होते. शाळेची इमारत, तेथे असाव्यात अशा भौतिक व शैक्षणिक सोयी सुविधा (वाचनालय, प्रयोगशाळा, क्रीडांगणे इ.) यांचा किमान दर्जा हाच कमाल दर्जाचा असायला हवा. तेथे कोणतीही तडजोड असता कामा नये.

येथे सरकारच्या शिक्षणविषयक जबाबदाऱ्यांचा प्रश्न येतो. एकदा, सरकारने सर्वांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली की, समान दर्जाने शिक्षण देण्याची जबाबदारी ही त्यापासून वेगळी नाही. श्रीमंतांचे शिक्षण श्रीमंती पद्धतीने आणि गरिबांचे शिक्षण गरिबी पद्धतीने करणे ही विषमता लोकशाहीच्या मूळ समानतेच्या - समानसंधीच्या तत्त्वांना काळिमा फासणारी गोष्ट आहे; एवढेच नव्हे तर या देशाचे सुजाण नागरिक म्हणून आपल्यालाही ती लाजिरवाणी गोष्ट आहे. या गैरव्यवस्थेत परिवर्तन करायचे असेल, तर प्रथमत: शिक्षण म्हणजे, बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण ही सरकार आणि संबंधित समाज यांची एकत्रित जबाबदारी मानली गेली पाहिजे. सरकारने समान नि उच्च दर्जाच्या भौतिक नि शैक्षणिक सेवा-सुविधा पुरविण्याची प्राथमिक जबाबदारी पेलली पाहिजे आणि त्यासाठी शिक्षणावरील खर्चाची मर्यादा राज्य उत्पन्नाच्या सहा टक्के एवढी करून आपली स्वीकारलेली जबाबदारी पार पाडली पाहिजे; त्यातलाही अधिक वाटा हा ज्या वयात मुलांचे कायमस्वरूपी शिक्षणाचे खांब रोवले जातात त्या वयातील शिक्षणावर खर्च केला पाहिजे. परंतु, शिक्षण हा मतदानासाठी राजकीय मुद्दा होऊ शकत नाही, आणि त्यामुळे सरकारचा शिक्षणावरील खर्च कधी वाढत नाही, उलट इतर मुद्दे जसजसे पुढे येत जातात, तसतसा तो कमी होत जातो, असे ड्रेझ आणि सेन यांनी म्हटले आहे आणि ते खरेच आहे.

समाजाची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. शाळांमधील शिक्षणावर कठोर अंकुश ठेवून, सरकारी शाळा गावच्या मुलांचे नुकसान करीत असेल तर त्याला जाब विचारण्याची प्राथमिक जबाबदारी, समाजाने निश्चित स्वरूपाची यंत्रणा उभी करून उचलली पाहिजे. किंबहुना आजच्या परिस्थितीत तर समाजाची जबाबदारी अधिकच मोठी आहे. शाळेतील शिक्षण अंतर्बाह्य बदलण्यासाठी - शिक्षणातील परिवर्तनासाठी - सरकारला वेठीस धरून, सरकारच्या प्राथमिक जबाबदाऱ्या पार पाडायला लावल्या पाहिजेत. सरकार उदासीन राहात असेल, तर समाजाला अधिकच प्रभावीपणे कार्यरत व्हायला हवे आहे. सरकार बदमाशी करीत असेल, तर सरकारचे अस्तित्वच धोक्यात आणले पाहिजे.

मुद्रक : ज्ञानविलास प्रेस, पुणे २. अक्षररचना : श्वेता ग्राफिक्स, पुणे

RF